

नाशिकमध्ये जूनमध्ये भाकपाचे अधिवेशन नाशिक आज

# उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



सिटीलिंक कार्यालयाबाहेर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०४ ■ नाशिक, शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे

### धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका



**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांना अर्धांग-वायूचा झटका आला होता. त्यांना बोलताही येत नसल्याची माहिती राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली आहे. बीडच्या कार्यक्रमाला धनंजय मुंडे गैरहजर राहिल्याचा प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली. धनंजय मुंडे यांना नुकतीच बेल्स पाल्सीची लागण झाली होती. त्यातून ते बरे झाले होते. यानंतर परळीत कामालादेखील लागले होते. यानंतर आता धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना बोलता येत नसल्याचं बाबासाहेब पाटील यांनी सांगितले आहे. ते फॅशन शोला दिसले असतील. जवळच्या माणसाने आग्रह केला त्यामुळे गेले असतील, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

### यूपीआय व्यवहारांवर जीएसटी लागणार

**मुंबई :** दोन हजार रुपयांपेक्षा अधिकच्या यूपीआय व्यवहारांवर जीएसटी लावण्याचा सरकारचा विचार आहे. करातून होणारी कमाई वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. अधिकाधिक डिजिटल व्यवहारांना अर्थव्यवस्थेत आणून त्यातून महसूल वाढवण्याचा विचार सरकारकडून सुरू आहे. नवा प्रस्ताव मंजूर झाल्यास २ हजार रुपयांपेक्षा अधिकच्या यूपीआय व्यवहारांवर १८ टक्के जीएसटी लागेल. मार्चमध्ये देशभरात यूपीआयच्या माध्यमातून २४.७७ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. यूपीआय व्यवहारांवर जीएसटी लागण्याची शक्यता असल्यानं ग्राहक आणि लहान व्यापारी, व्यावसायिक चिंतेत आहेत.

### बांगर यांच्या मुलीचा क्रिकेटपटूवर आरोप

**मुंबई :** संजय बांगर या सीनियर क्रिकेटरची मुलगी अनायानी एक मुलाखतीदरम्यान एका माजी भारतीय क्रिकेटपटूवर गंभीर आरोप केले आहेत. एक माजी दिग्गज भारतीय खेळाडू तिच्याशी संबंध असल्याबद्दल बोलत असे. एवढेच नाही तर काही खेळाडू स्वतःचे अश्लील फोटोही पाठवत असत. हा खेळाडू नक्की कोण? याबद्दल नाव उघड केलेले नाही. अनाया आधी मुलगा होती पण तिच्या शारीरिक हालचाली लक्षात घेता तिने तिचे लिंग बदलण्याचा निर्णय घेतला. यानंतर ती मुलापासून मुलीत रूपांतरित झाली. अनाया बांगर ही काही काळापासून लंडनमध्ये राहत होती. भारत सोडण्यामागचे कारण म्हणजे लिंग बदलणे आणि शिक्षण हेही होते. आता ती काही दिवसांपूर्वी भारतात आली आहे. ती इथे येताच मीडिया हाऊसला मुलाखत देत आहे.

### विजयसिंह महाडिक यांचे निधन

**सांगली :** अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे संस्थापक, मराठा आरक्षण समन्वय समितीचे राज्याध्यक्ष, जिल्हा परिषद अभियंता संघटनेचे संस्थापक विजयसिंह महाडिक (वय ६७) यांचे अपघाती निधन झाले आहे. महाडिक हे घराच्या छतावर सकाळी गेले असता उन्हाच्या तीव्रतेने चक्कर आल्याने तोल जाऊन ते तिसऱ्या मजल्यावरुन थेट खाली कोसळले. गंभीर इजा झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# अपघातग्रस्त रुग्णांना मिळणार एक लाखापर्यंत कॅशलेस उपचार

## महागडे उपचार समाविष्ट करण्यासाठी समिती गठित

**मुंबई : अपघातग्रस्त रुग्णांना एक लाखापर्यंत कॅशलेस उपचार देण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या आरोग्य खात्याने घेतला आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही आबिटकर यांनी दिला आहे.**





राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा आरोग्यमंत्री आबिटकर यांनी घेतला. बैठकीदरम्यान मंत्री आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवडप्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी /-...४

### केंद्राकडून दीड लाखाची मदत

रस्ते अपघातामधील जखमींसाठी कॅशलेस उपचार योजना लागू न केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला फटकारले होते. दरम्यान, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना कॅशलेस उपचार देण्यासाठी १४ मार्च २०२४ रोजी कॅशलेस उपचार योजना हा पायलट प्रकल्प सुरू केला. यानंतर ७ जानेवारी २०२५ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लवकरच देशभरात तो सुरू करण्याची घोषणा केली. या योजनेंतर्गत देशात कुठेही रस्ते अपघात झाल्यास केंद्र सरकारतर्फे जास्तीत जास्त दीड लाखाची मदत केली जाणार आहे.



# दगडूशेठ गणपतीला ५० लाख फुलांची सजावट

## २२० कारागिरांनी दोन दिवस राबत सजवले मंदिर

**पुणे :** येथील श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ व अखिल भारतीय वारकरी मंडळातर्फे वासंतिक उटी व मोगरा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मोगऱ्याच्या ५० लाख फुलांसह लिली, झेंडू, जास्वंद, गुलाब, चाफा यांसारख्या फुलांनी मंदिराचा गाभारा व सभामंडपात आकर्षक सजावट करण्यात आली आहे. फुलांच्या सजावटीमुळे गाभाऱ्यातील गणरायाचे रूप अधिकच मनोहारी दिसत होते. मंदिरात विविध सुवासिक फुलांची श्रीमंती पाहायला मिळाली. दोन दिवसांपासून पुष्प सजावटीची तयारी तब्बल १४० महिला व ८० पुरुष कारागीर करीत होते. यंदाच्या पुष्प सजावटीमध्ये ३००० गुलाब बंडल, १५०० लिली बंडल, १४०० किलो झेंडू, १५०० किलो शेवंती, १००० किलो गुलछडी, २० हजार चाफा, १०० किलो गुलाब पाकळी तसेच कमळ, जाई-जुई, जास्वंद यांसह अनेक प्रकारची फुले वापरण्यात आली होती. गणरायाच्या चांदीच्या मूर्तीला उटीचे लेपन करण्यात आले. तसेच मोगरा महोत्सवासह वासंतिक उटीचे भजन अखिल भारतीय वारकरी मंडळातर्फे करण्यात आले होते.

# जगन मोहन रेड्डी यांची ८०० कोटींची संपत्ती जप्त

## मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीची कारवाई



**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद युनिटने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांची २७.५ कोटी रुपयांची शेअर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. यासोबतच दालमिया सिमेंट्स भारत लिमिटेडची ३७७.२ कोटी रुपयांची जमीनही जप्त करण्यात आली आहे.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मालमत्तेची एकूण किंमत ७९३.३ कोटी रुपये आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर १४ वर्षांनी ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) २०११ मध्ये नोंदवलेल्या जुन्या प्रकरणाच्या आधारे ईडीने ही कारवाई केली आहे. त्या प्रकरणात डीसीबीएलने भारती सिमेंट कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणूक केली होती. जगन मोहन रेड्डी यांचे कार्मेल एशिया होल्डिंग्स लिमिटेड, सरस्वती पॉवर अँड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि हर्षा फर्ममधील शेअर्स जप्त करण्यात आले आहेत. २०१३ मध्ये सीबीआयने वाय. एस. जगन मोहन रेड्डी, डीसीबीएल आणि इतर काही जणांविरुद्ध /-...४

# 'एमआयएम' शहराध्यक्षासह ३८ जण अटकेत

## पोलिसांवर दगडफेक प्रकरणात राजकीय मंडळींचा सहभाग

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

- समाजकंटकांची ओळख पटविण्याचे काम सुरू
- अनेक संशयित बाहेरगावातील
- ७७ दुचाकींच्या कागदपत्रांवरून शोध
- हल्ल्याच्या वेळी कार्यरत मोबाइल डेटा गोळा करणार

काठेगल्लीतील सातपीर दर्गा हटविण्याची कारवाई करताना सुमारे दीड ते दोन हजार समाजकंटकांच्या जमावाने पोलिसांवर दगडफेक करून वातावरण चिघळविण्याचा प्रयत्न मंगळवारी (दि. १५) केला होता. यात सुमारे २१ पोलिस कर्मचारी जखमी झाले होते. नियोजित कट करून समाजकंटकांनी दगडफेक केल्याचे उघड झाले आहे. घटनास्थळावर सापडलेल्या सुमारे ९० दुचाकींच्या मालकांचा शोध घेऊन पोलिसांनी आता धाडसत्र राबवण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत तब्बल ३८ जणांना अटक केली असून, काल एमआयएम पक्षाचा नाशिक शहराध्यक्ष मुक्तार शेख याला अटक करण्यात आली आहे.

सर्व संशयितांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, या दगडफेकीतील 'मोहरे' पोलिसांनी हेरले असून, त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. मालेगाव, धुळे, संगमनेर आदी ठिकाणी पोलिसांची पथके फरार संशयितांचा शोध घेत आहे.

सातपीर दर्ग्याचे अतिक्रमण काढण्यापूर्वी पखाल रोड व उस्मानिया चौकात दीड ते दोन हजार समाजकंटकांच्या जमावाने पोलिसांवर दगडांचा मारा केला होता. त्यात २१ पोलीस गंभीर जखमी झाले होते. पोलिसांनी प्रसंगावधान दाखवून जमावाला पांगविण्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या. या प्रकरणाची दखल गृह खात्याने घेतली असून, आतापर्यंतच्या तपासात पोलिसांना भक्कम पुरावे मिळाले आहेत. तांत्रिक विश्लेषणावर भर देण्यात आला आहे. जमावाने परिसरातील वीजपुरवठा खंडित केल्याने सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करताना पोलिसांना अडचणी येत आहेत. एवढ्या मोठ्या /-...४

# नियोजित वधूचे अफेअर उघड; आयकर अधिकाऱ्याची आत्महत्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



साखरपुड्याच्या कार्यक्रमात नियोजित वधूने तिच्या प्रियकराला मिठी मारल्यानंतर प्रेमप्रकरण उघडकीस आल्यानंतर वराने लग्नाला नकार दिला. त्यामुळे हुंडा प्रकरणात अडकविण्याची धमकी देत वधूने ब्लॅकमेल केल्यामुळे नाशिकमध्ये कार्यरत आयकर अधिकारी असलेल्या नवरदेवाने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. काल (दि.१८) हा विवाह होणार होता. मात्र, विवाहापूर्वीच वराने आत्महत्येसारखे /-...४

### नियोजित वधूसह प्रियकर फरार


आयकर अधिकारी असलेल्या हरेकृष्ण पांडे यांनी नियोजित वधूकडून, लग्न कर, नाही तर खोट्या पोलिस केसमध्ये अडकवण्याची सातत्याने धमक्या दिल्याने टोकाचे पाऊल उचलल्यानंतर अंबड पोलिसांत मोहिनी पांडे, तिचा प्रियकर सुरेश पांडे आणि त्याचा साथीदार मुनेंद्र पांडे या तिघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या फरार असलेल्या या तिघांचा नाशिक पोलिसांकडून शोध सुरू आहे.

# धनंजय मुंडेंच्या आमदारकीविरुद्ध देशमुख न्यायालयात धाव घेणार

**बीड :** बीडमधील निलंबित पोलीस निरीक्षक रणजित कासले यांनी धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. त्यावरून, परळी मतदारसंघातील शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे विधानसभा उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी न्यायालयात दाद मागणार असल्याचे म्हटले. तसेच, एकट्या रणजित कासलेंना १० लाख दिले असतील तर बाकीच्यांना किती दिले, असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

धनंजय मुंडे यांनी ईव्हीएमपासून दूर जाण्यासाठी दहा लाख रुपये दिल्याचे कासले यांनी म्हटले होते. परळी विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे आणि राजेसाहेब देशमुख एकमेकांविरोधात उभे होते. यात देशमुख यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. आता, कासले यांच्या आरोपानंतर देशमुख पुढे आले असून, या प्रकरणाच्या चौकशीसाठी ते न्यायालयात धाव घेणार आहेत. तर, यापूर्वीच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंच्या निवडीविरुद्ध न्यायालयात दाद मागितली आहे. विधानसभा निवडणुकांवेळी परळी मतदारसंघात ईव्हीएमसोबत छेडछाड करण्यात आली, त्यासाठीच /-...४

### रणजित कासलेंना हॉटेलमधून अटक



बीडमधील निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले हे गुरुवारी (दि. १८ ) संध्याकाळी पुण्यात दाखल झाले होते. मी आधी पुणे पोलीस किंवा बीड पोलिसांकडे स्वत:ला सरेंडर करणार आहे, असे त्यांनी सांगितले. मात्र, आत्मसमर्पण करण्याआधीच त्यांना बीड पोलिसांनी पुण्यातील स्वारगेट परिसरात असणाऱ्या हॉटेलमधून शुक्रवारी (दि. १८) पहाटे ताब्यात घेतले आहे. दिल्लीवरून पुण्यात आल्यानंतर कासले पुण्यात मुक्कामी होते.

हिंदी भाषा सक्तीवरून पवारांचा ठाकरेंना टोला

# काही लोकांना उद्योग नाहीत, उगाच वाद घालत बसतात





**पुणे :** नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील शाळांमध्ये पहिली इयत्तेपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या सरकारच्या निर्णयाला मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी विरोध केला आहे. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज ठाकरे यांना अप्रत्यक्षपणे टोला लगावला. सध्या समोरच्या राजकीय पक्षांना मुद्दा राहिलेला नाही. त्यामुळे ते उगाच वाद घालत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

अजित पवार म्हणाले, मराठी आपली मातृभाषा आहेच. त्याबद्दल कोणाचे दुमत नाही. प्रत्येक राज्याला आपली मातृभाषा असते त्याविषयी आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळा असतो. तो टिकला पाहिजे.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा पंतप्रधान मोदी यांनी दिला. खूप वर्षे दिल्लीत हे प्रकरण पडून होतं, ते कोणी करण्याचे धाडस दाखवले नाही. ते एनडीए सरकारने, मोदीसाहेबांनी दाखवले. आता मराठी भाषा भवन मरीन ड्राइव्हला चांगल्या प्रकारची वास्तू तयार करण्याचे /-...४

# हिंदीविरोधी आंदोलनातूनही राज ठाकरे माघार घेतील

## सदावर्तेंचा मनसेप्रमुखांवर आरोप



**मुंबई :** राज्यात पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्यात येत आहे, पण आम्ही हे खपवून घेणार नाही, असा इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्यानंतर ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

सदावर्ते म्हणाले, राज ठाकरे यांनी जे ट्विट केले त्यांच्या भूमिकेची मी निंदा करतो, त्यांचा निषेध करतो. तुमच्या धमक्यांना आम्ही संविधानाने उत्तर देऊ. लहान वयात मुलांना ज्ञान मिळवण्याची संधी उपलब्ध होत आहे, तर तुम्ही त्याला विरोध का करत आहेत? हे दु:ख नेमकं कशाचे आहे? नेत्यांची लेकरं इंग्रजी शाळेत शिकणार आणि सामान्यांच्या लेकरांनी काय स्थानिक शाळेत शिकायचे का? राज ठाकरे यांच्या मनसेसारख्या अनेक पाट्या गल्लीबोळात पाहायला मिळतात. मात्र, याचा अर्थ असा नाही की, तुम्ही मुलांच्या प्रगतीच्यामध्ये याल. या स्टाईलने, त्या स्टाईलने चालणार नाही. राज ठाकरेंचा अत्यंत बालिश विचार आहे. क्रांतिकारी जन्मावा पण शेजाऱ्याच्या घरात, म्हणजेच आपली मुलं शिकावी इंग्रजीच्या शाळेत आणि गरिबांची, /-...४

# परीक्षेदरम्यान बळजबरीने जानवं आणि रक्षासूत्र काढले

## कर्नाटकमध्ये सीईटी परीक्षेतील प्रकार; शिक्षणमंत्र्यांनी घेतली दखल

**नवी दिल्ली : सीईटी परीक्षेवेळी सर्व राज्यांमध्ये अनेक कठोर नियमांचे पालन केले जाते. यामुळे काही राज्यांमध्ये सीईटी परीक्षेदरम्यान वादाला तोंड फुटल्याच्या घटना समोर येत आहेत. कर्नाटकातील शिवमोगा येथे सीईटी म्हणजेच कॉमन एन्ट्रन्स टेस्टदरम्यान परीक्षा केंद्रावर काही विद्यार्थ्यांना जानवं आणि मनगटावरील धार्मिक धागा काढण्यास सांगण्यात आले. त्यावरून आता वादंग निर्माण झाले आहे.**

शिवमोग्गा येथील आदि चुंचुंगिरी पीयू कॉलेज कॅम्पसमध्ये ही घटना घडली. सीईटी परीक्षा देण्यासाठी आलेल्या परीक्षार्थींची कसून तपासणी सुरू होती. तीन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर थांबवण्यात आले. त्यांच्या अंगावरील जानवं आणि हातावर बांधलेला संरक्षक धागा काढण्यास सांगण्यात आले. धार्मिक धागा परीक्षेच्या आड येत नव्हता, त्यामुळे आम्हाला परीक्षेला जाऊ द्या, असे विद्यार्थी सांगण्याचा प्रयत्न करत होते. पण सुरक्षारक्षक ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. जानवं आणि कलावा काढा तरच प्रवेश मिळेल यावर सुरक्षारक्षक ठाम होते. यातील तिसरा विद्यार्थी धागा न काढण्यावर ठाम होता. त्यामुळे विद्यार्थी आणि सुरक्षारक्षकांतील वाद वाढत गेला आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ही घटना १६ एप्रिल रोजी घडली. ज्यामध्ये संबंधित विद्यार्थ्याला सुमारे १५ मिनिटे गेटवर थांबवण्यात आले. अखेर रक्षकांनी त्याच्या हातातील संरक्षक धागा काढला आणि यानंतरच परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली. अखिल कर्नाटक ब्राह्मण सभेने या घटनेचा निषेध केला. त्यांनी तत्काळ जिल्हा दंडाधिकाऱ्यांची भेट घेत कारवाईची मागणी केली.

### तपासाअंती दोषींवर होणार कारवाई

कर्नाटकचे उच्च शिक्षणमंत्री एम. सी. सुधाकर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना सांगितले की, कार्यकारी संचालकांकडून अहवाल मागितला आहे. परीक्षांसाठी काही निश्चित प्रोटोकॉल आहेत. जे प्रत्येक संस्था पाळते. पण त्यात जानवं किंवा मनगटातील धागा काढून टाकण्याचा कोणताही उल्लेख नाही. तपासात हे खरे ठरले तर दोषी लोकांवर कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले.

# नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी पुण्यात काँग्रेस-भाजप कार्यकर्ते भिडले

**पुणे :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना देण्यात आलेल्या नोटिशीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने खडकी रेल्वे स्टेशनवर लोणावळा-पुणे लोकल ट्रेन अडवून आपला रोष व्यक्त केलो.

दरम्यान, एकीकडे काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरले असताना दुसरीकडे पुण्यातील भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवनची वाट धरल्याने काँग्रेस आणि भाजप समर्थक आमने-सामने आले होते. त्यामुळे तणावाची परस्थिती निर्माण झाली होती. पुण्यातील बालगंधर्व चौकात हा राडा झाल्याने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काँग्रेस भवनमध्ये आम्ही जाणारच, राहुल गांधी-सोनिया गांधी यांना अटक करा, अशी भूमिका भाजप समर्थकांनी केली आहे. तर, काँग्रेस समर्थकही काठ्या घेऊन रस्त्यावर उतरले होते.

काँग्रेस भवनावर भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी अडवले. काँग्रेसने २००० कोटी रुपयांचा घोटाळा केला असून, आता फेक नॅरेटिव्ह /-...४

## महत्त्वाचे

### सटाणा शहरातील रिंगरोडला झाडाझुडपांचे साम्राज्य

**सटाणा :** शहरातील नववसाहतीतील मंजुळे पेट्रोलपंपाशेजारून जाणाऱ्या रिंगरोडला असलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या कडेला झाडाझुडपांचे साम्राज्य पसरले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक फिरण्यासाठी याच जॉगिंग ट्रॅकचा वापर करतात. या रस्त्यावर अनावश्यक झाडेझुडपे वाढले आहेत. रात्रीच्या वेळेस फिरायला जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीती निर्माण होत आहे. पालिका प्रशासनाने सदरच्या जॉगिंग ट्रॅकसह परिसरातील रस्त्यावर वाढलेली झुडपे काढावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अभिमन्यूनगरमध्ये देखील मुख्य रस्त्यावर काटेरी झुडपे रस्त्याच्या मध्यभागीपर्यंत आल्याने वाहनचालकासह पायी फिरणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहरात असलेल्या जॉगिंग ट्रॅक, सार्वजनिक मोकळे भूखंड हे स्वच्छता करण्याचे व ते स्वच्छ ठेवण्याचे काम नगर परिषद प्रशासनाचे आहे. यासाठी सटाणा शहरवासीयांचा वर्षाला लाखो रुपये खर्च होतो आहे, परंतु प्रशासनाला आपल्या जबाबदारीचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. पालिका प्रशासनाने तत्काळ स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक झाडेझुडपे काढून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी साई सावली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत कोठावदे यांनी केली आहे.

### निफाडला रविवारी भीमगीतांचा कार्यक्रम

**निफाड :** डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त निफाड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रविवारी (दि.२०) सायंकाळी सुप्रसिद्ध गायक जितू देवरे व स्टार प्रवाह मी होणार सुपरस्टार फेम वर्षा एखंडे यांचा भीमगीतांचा कार्यक्रम होणार असल्याचे आयोजक नितीन खडताळे, विकास जगताप, उदय गांगुर्डे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश लोंढे उपस्थित राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून भुषण लोंढे, शंकरराव वाघ, राजाभाऊ शेलार, अनिल पा. कुंदे, नंदलाल चोरडिया, शिवाजीराजे ढेपले, अभिजित चोरडिया, मधुकर शेलार, ॲड. प्रविण ठाकरे, ॲड. शिवाजी भोई, प्रदीप गांगुर्डे, विनोद शिंदे, आसिफ पठाण, स्वप्निल अहिरे आदी उपस्थित राहणार आहेत.

### सहकारी बोर्डाच्या संचालकपदी जाधव

**दिंडोरी :** नाशिक जिल्हा सहकारी बोर्डाच्या दिंडोरी तालुका संचालकपदी कादवा कारखान्याचे संचालक बाळासाहेब जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नाशिक जिल्हा सहकारी बोर्डाच्या निवडणुकीत दिंडोरी तालुक्यातून संचालकपदासाठी बाळासाहेब जाधव यांचा एकमेव अर्ज आला होता. त्यामुळे त्यांची निवड बिनविरोध झाली. बाळासाहेब जाधव यांच्या निवडीबद्दल अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ, कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे, खासदार भास्कर भगरे, डॉ. सुनील ढिकले, डॉ. संजय पाटील यांच्यासह कादवा संचालक, दिंडोरी सोसायटीचे सर्व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**दिंडोरी :** भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने दुचाकीचालक ठार झाला. मंगेश संजय शिंदे (२६, रा. शिंदेमळा, म्हसरुळ, पंचवटी) हा युवक दुचाकी (एमएच १५ जेव्ही ६४०५) होंडा शाईन मोटारसायकलवरून नाशिक-पेठ हायवेवर चाचडगाव शिवारात स्मशानभूमीजवळ मार्गक्रमण करत असताना भरधाव अज्ञात वाहनाने या दुचाकीला धडक दिली. या अपघातात मंगेश शिंदे याचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक वैद्यकीय मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला. चालकाविरोधात दिंडोरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### कारच्या धडकेत युवकाचा मृत्यू

**वणी :** वणी-सापुतारा रस्त्यावरील जामले फाटा येथे रस्ता ओलांडणाऱ्या युवकास ईको कारने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. पोपट जयराम गांगुर्डे (रा. जामलेवणी, ता. कळवण) हा युवक वणी-सापुतारा रस्त्यावरील जामले फाटा येथून पायी रस्ता ओलांडत असताना सापुतारा बाजूकडून भरधाव ईको कार (एमएच ०१ बीजी ३०१६) ने त्याला धडक दिली. या अपघातात पोपट गांगुर्डे यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**वणी :** वणी-दिंडोरी रस्त्यावरील कृष्णगाव शिवारात खंडेराव मंदिर परिसरात अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पायी जाणाऱ्या इसमाचा मृत्यू झाला आहे. अज्ञात वाहनचालकाविरोधात वणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकी घसरून चालक ठार

**दिंडोरी :** दुचाकी घसरून चालकाचा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. राहुल साठेरा (नांदड गाव, ता. इगतपुरी) हा युवक दुचाकी (एमएच १५ डीएच ६५७५) वरून नाशिक-पेठ रस्त्यावरून जात होता. उमराळे शिवारात हॉटेल गंगासागरजवळ दुचाकीवरील नियंत्रण सुटले व दुचाकी स्लीप होऊन राहुल त्या खाली दबला गेला. या अपघातात त्याचा मृत्यू झाला.

# लासलगाव ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा

## कोरोनाकाळात दहा ते पंधरा लाख रुपये खर्च करून ऑक्सिजन प्लांट

**लासलगाव : समीर पठाण**

**लासलगाव परिसरात ग्रामीण भागातील रुग्णांसाठी गेल्या २६ वर्षांपासून लासलगाव ग्रामीण रुग्णालयाची सेवा अद्ययावत असून, आता या ग्रामीण रुग्णालयास माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नातून पन्नास खाटांचे उपजिल्हा रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. लवकरच या रुग्णालयाच्या बांधकामास सुरुवात होणार आहे.**

परिसरातील रुग्णांना लासलगाव ग्रामीण रुग्णालयात दर्जेदार सेवा मिळते. कोरोनाकाळात दहा ते पंधरा लाख रुपये खर्च करून ऑक्सिजन प्लांट या ठिकाणी उभारण्यात आला होता. ड्युरॅसील लिक्विड मेडिकल ऑक्सिजन २५० लिटरचा पुरवठा होत होता. ३५ मोठे व ३० लहान ऑक्सिजन सिलिंडर २० बेडला सेंट्रल ऑक्सिजन पुरवठा लाइनने जोडलेले आहे. कोरोनाकाळात पाच व्हेंटिलेटर होते. कोरोना लाट ओसरल्यानंतर येथे आयसीयू नसल्यामुळे व्हेंटिलेटर वरिष्ठ कार्यालयाकडे पुन्हा पाठवण्यात आले आहेत. सध्या दोन्ही प्लांट व्यवस्थित सुरू आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेत ३५० रुग्णांनी या ठिकाणी उपचार घेतले. त्यात एकही रुग्ण दगावला नाही, मात्र दुसऱ्या लाटेत ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे ३५ रुग्ण मृत्युमुखी पडले. या काळात २४ तास ९०० रुग्णांना सेवा देण्यात आली होती. या ग्रामीण रुग्णालयात २७ कर्मचाऱ्यांना मान्यता आहे. त्यात २४ कर्मचारी सध्या कार्यरत असून, दोन वैद्यकीय अधिकारी व एक दंतचिकित्सक जागा रिक्त आहे. या रुग्णालयात वर्षभरात ३८,५०० बाह्य रुग्णांची तपासणी झाली आहे तर २९३४ आंतर रुग्णांची तपासणी झाली आहे. १९०० चौरस मीटर विस्तारित जागेत ३६८ बाळंतपण, २५२ शस्त्रक्रिया तर ५७५९ रुग्णांनी एक्स-रे सेवेचा लाभ घेतला आहे. या रुग्णालयात हिपॅटायटिस बी, रेबीज, पोलिओ, बीसीजी, स्नेक बाइट, टी टी, सोनोग्राफी सुविधा, भूलतज्ज्ञ विभाग सध्या कार्यरत आहे. इमर्जन्सी केसमध्ये १०२ ॲम्बुलन्सची सुविधा असून, विषबाधा, अपघात, स्नेक बाइट व इतर मेडिकल सुविधा तत्काळ उपलब्ध करून दिल्या जातात. नव्याने सुरू झालेले शवविच्छेदन कक्ष कार्यान्वित झाला असून, आतापर्यंत ३० शवविच्छेदन करण्यात आले आहे.




या ठिकाणी आलेल्या रुग्णांचे ई-सुश्रुत अंतर्गत बाह्यरुग्ण विभागात डिजिटल रेकॉर्ड ठेवले जातात तसेच माता व बालक आरोग्य सुविधा अंतर्गत गरोदर पूर्व तपासणी, प्रसूती, बालक तपासणी उद्दिष्टांपेक्षा जास्त झालेले आहे. यात आमचा जिल्हात चौथा क्रमांक आलेला आहे.

**– डॉ. बाळकृष्ण अहिरे,** वैद्यकीय अधीक्षक, लासलगाव ग्रामीण रुग्णालय

### ग्रामीण रुग्णालयात सुविधांचा अभाव

येथे दररोज रुग्णांची गर्दी जास्त असते तसेच रुग्णालयाच्या आवारात पार्किंगची सुविधा नाही. पावसाळ्यात पावसाचे पाणी रुग्णालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात साचते. बाजूला असलेल्या नाल्याला पावसाळ्यात पूर आल्यानंतर रुग्णालयाच्या चोहो बाजूने पाणी वेढलेले असते. वॉल कंपाउंड केल्यास हा त्रास कमी होईल. रुग्णालयाला ३५० बेडशीटची गरज आहे, मात्र ९० बेडशीट उपलब्ध आहेत तेच धुवून परत वापरले जातात. रुग्णालयाच्या परिसरात झाडीझुडपे वाढलेले आहेत. भिंतीचे प्लास्टर निघालेले आहे. रंगरंगोटी जीर्ण झाले आहे. स्लॅबचे प्लॅस्टर निघालेले आहे. स्लॅब गळतीचा प्रश्न आहे. टाइल्स निघालेल्या अवस्थेत आहे. वैद्यकीय अधीक्षक यांनी तीन वेळा या कामासाठी पीडब्ल्यूडीकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

या रुग्णालयात सुविधा चांगल्या प्रकारे दिल्या जातात. आमचा मागील अनुभवसुद्धा चांगला आहे. माझ्या दोन्ही बहिणींचे येथेच बाळंतपण झालेले आहे. नर्स सुविधा चांगली आहे. पेशंटची व्यवस्थित काळजी चांगली घेतली जाते.

**– वैष्णवी हसेवाड,** गर्भवती महिला, लासलगाव

मी आपत्कालीन रुग्णसेवेसाठी डॉक्टर्स लोकांना मदत करतो. डॉक्टर सल्ल्याप्रमाणे ट्रीटमेंट, प्रसूती मदत, पेशंटची निगराणी माझ्याकडून केली जाते.

**– ऋषिकेश उगले,** अधिपरिचारक, ग्रामीण रुग्णालय, लासलगाव

माझा दोन दिवसांपूर्वी अपघात झालेला आहे. मला येथे दाखल केले. मध्यरात्री डॉक्टर सेवा उपलब्ध करण्यात आली. माझ्या तब्येतीचा धोका आता टळलेला आहे.

**– शंकर पालवे,** अपघातग्रस्त, वेळापूर

# शब्दांचा सन्मान, संवेदनांचा गौरव

## चांदवडी रुपय्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांचा सत्कार

**चांदवड : वार्ताहर**

चांदवडच्या सांस्कृतिक परंपरेत मानाचा तुरा रोवणारा चांदवडी रुपय्या साहित्य कलारसिक मंडळाचा पुरस्कार वितरण सोहळा सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात झाला. 'शब्दांचा सन्मान, संवेदनांचा गौरव' या ब्रीदवाक्याप्रमाणे हा सोहळा साहित्य आणि समाजप्रबोधनाचा एक सुंदर संगम ठरला.

दुपारी साहित्यरसिकांच्या उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या सभागृहात कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंडळाचे सचिव कवी सागर जाधव जोपूळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि साहित्याच्या सामर्थ्यावर प्रकाश टाकला. अध्यक्ष रावसाहेब जाधव यांनी मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. शांताराम हांडगे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शन सागर जाधव जोपूळकर यांनी केले. जयश्री वणवे यांच्या पसायदानाच्या मधुर गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष,



सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजेंद्र मलोसे यांनी अध्यक्षीय भाषणात समकालीन साहित्याची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी साहित्यिकांनी निर्भयपणे सत्याचा आवाज बुलंद करण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे, साहित्य अकादमी युवा पुरस्कारविजेते कवी ऐश्वर्य पाटेकर यांनी चांदवडच्या साहित्यिक वातावरणाचे कौतुक केले. चांदवडी रुपय्या युवा वाङ्मय पुरस्कार २०२५ संयुक्तपणे मंचर येथील कवी तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या 'जळताना भुई पायतळी' आणि ठाणे येथील कवी गीतेश गजानन शिंदे यांच्या 'सीसीटीव्हीच्या गर्द छायेत' या काव्यसंग्रहांना प्रदान करण्यात आला. या दोन्ही कवींनी मातीतील वेदना आणि शहरी जीवनातील गुंतागुंतीच्या भावनांना आपल्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त केले आहे. सार्वजनिक वाचनालय वाङ्मय पुरस्कार २०२५ सांगली येथील कवी धनाजी घोरपडे यांच्या 'जामिनावर सुटलेला काळा घोडा' या काव्यसंग्रहाला प्रदान करण्यात आला. त्यांच्या कवितेतील जीवनाच्या विविध रंगांच्या दर्शनाने उपस्थितांना विचार करण्यास प्रवृत्त केले. चांदवडी रुपय्या साहित्य प्रेरणा पुरस्कार २०२५ नाशिकचे उपक्रमशील लेखक व कार्यकर्ते जी. पी. खैरनार यांना त्यांच्या साहित्य चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदानासाठी प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे अनेकजण साहित्य क्षेत्राकडे आकर्षित झाले आहेत. चांदवडी रुपय्या सामाजिक प्रेरणा पुरस्कार-२०२५ चांदवड तालुक्यातील रेणुका महिला भजनी मंडळ यांना त्यांच्या भजन आणि भारुडांच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक प्रबोधनाच्या कार्यासाठी प्रदान करण्यात आला.

पुरस्कार निवड समितीमध्ये कवी विवेक उगलमुगले, संजय गोरडे आणि प्रकाशक व कवी संदीप देशपांडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या साहित्यिक जाणिवेमुळे पुरस्कारांची गुणवत्ता अधिक वाढली. याप्रसंगी रवींद्र देवरे, जनार्दन आवा देवरे, विजय निरभवणे, सविता दरेकर, वैशाली शिंदे, माया ठोके, बाळा पाडवी, अविनाश वाघ, सुभाषकाका कोल्हार, गौबा शिंदे, स्वप्नील वाघ, विलास पोतदार, विष्णू थोरे, शिवराज पाटील, अभिषेक गांगुर्डे, संदीप गुजराथी, वंदना गांगुर्डे, गंगाधर सोनवणे, संगीता बिरारी, जयश्री वणवे, मोनाली शिंपी, रुपाली कोतवाल, वाल्मीक सोनवणे, रघुनाथ आहेर आणि सार्वजनिक वाचनालयाचे पदाधिकारी यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी उपस्थित होते.



शेरी वार्षी सोसायटीचे नवनियुक्त चेअरमन शिवाजी पवार यांचा सत्कार करताना सोसायटीचे संचालक मंडळ. (छाया : विनोद देवरे)

# शेरी वार्षी सोसायटीच्या चेअरमनपदी शिवाजी पवार

**देवळा : वार्ताहर**

तालुक्यातील शेरी वार्षी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी शेरी येथील शिवाजी पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

देवळा येथील साहाय्यक निबंधक कार्यालयात सहकार अधिकारी ज्ञानेश्वर अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी चेअरमनपदासाठी शिवाजी गोविंद पवार यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर अहिरे यांनी चेअरमनपदी शिवाजी पवार यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. यावेळी सोसायटीच्या व्हा. चेअरमन मीराबाई सोनवणे, संचालक विजय सोनवणे, दिनकर पवार, जयराम सोनवणे, भिला जाधव, कृष्णा सोनवणे, ललित सोनवणे, धना सोनवणे, संतोष जैन, गौतम बच्छाव, संस्थेचे सचिव पुंडलिक आहेर आदींसह सुनील शिंदे, नंदू पवार, सतीश पवार, भाऊसाहेब पवार उपस्थित होते. नवनियुक्त चेअरमन शिवाजी पवार यांचे आ. डॉ. राहुल आहेर, नाफेडचे संचालक केदा आहेर, देवळा बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, सोसायटीचे माजी चेअरमन गुलाबराव पवार यांनी अभिनंदन केले.

# कॅनॉल बागाईतदार संघाच्या उपाध्यक्षपदी कदम

**ओझर : वार्ताहर**

येथील कॅनॉल बागाईतदार सहकारी संघाच्या उपाध्यक्षपदी नंदकुमार कदम यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ परशराम शेलार यांनी आवर्तन पद्धतीने राजीनामा दिल्याने सहकार संस्था निफाडचे सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली. उपाध्यक्षपदासाठी नंदकुमार कदम यांच्या व्यतिरिक्त एकही नामांकन न आल्याने निवडणूक अधिकारी कांतीलाल गायकवाड यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी संघाचे विद्यमान अध्यक्ष



माणिकराव बोरस्ते व नवनिर्वाचित उपाध्यक्ष नंदकुमार कदम यांच्या हस्ते निवडणूक अधिकारी कांतीलाल गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला तसेच संचालक मंडळातर्फे नंदकुमार कदम यांचा सत्कार करण्यात आला. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून संघाचे व्यवस्थापक निवृत्ती गोटीराम शिंदे यांनी पाहिले. या बैठकीस संचालक सुदाम पाटील, मोहन पाटील, सुरेश कदम, संतोष बोरस्ते, राजाराम कातकाडे, देवीदास चौधरी, तानाजी जाधव, अजित कदम, हर्षल मोरे, विलास शिंदे, बाळासाहेब जाधव, बाळकृष्ण झाल्टे, धोंडिराम जाधव, बाळासाहेब हिरे, कावेरीताई मोगल, अलकाताई मोरे आदी उपस्थित होते.

# जैन मुनींवर हल्ला करणाऱ्यावर कारवाई करावी

## येवल्यात सकल जैन समाजाचे पोलिसांना निवेदन

**येवला : प्रतिनिधी**

मध्य प्रदेशमधील कछला गावात जैन मुनींवर हल्ला करणाऱ्या आरोपींवर, गावगुंडांवर कडक कारवाई करण्यात येऊन त्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी, या मागणीचे निवेदन येवला येथील सकल जैन समाजाने पोलिस निरीक्षक धीरज महाजन यांना दिले.

मध्य प्रदेश येथील कछाला या गावामध्ये जैन संतमुनी शैलेश मुनीजी बलभद्रमुनी व मुनीद्रमुनी हे १३ एप्रिल रोजी रात्रीच्या वेळेस तेथील मंदिरात विश्राम करण्यासाठी थांबले होते. तेथे रात्री १० ते ११ वाजेच्या सुमारास चिचोगड येथील गावगुंडांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यांना काठ्यालाठ्यांनी जबर मारहाण करण्यात आली. तसेच त्यांना मंदिरातून उचलले व त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. भ्याड हल्ला करणाऱ्या या आरोपींवर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. याप्रसंगी ओसवाल समाजाचे



अध्यक्ष सतीश समदडिया, उपाध्यक्ष अरुण सोनी, दिनेश बाफणा, रवींद्र बाफणा, विजय संचेती, सुयोग श्रीश्रीमाळ, जीवन चंडालिया, हर्षल छाजेड, मधुसूदन राका, जितेश जैन, रोशन भंडारी, कांतिलाल गादिया, रितेश शिंगी, मयूर बोरा, सुरेश बंब आदींसह जैनबांधव उपस्थित होते.

# चांदवड तहसील कार्यालयाची विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्र मोहीम

**चांदवड : वार्ताहर**

लवकरच परीक्षेचे निकाल जाहीर होणार असून, महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची धावपळ होऊ नये, यासाठी तहसील कार्यालय विशेष मोहीम राबवणार आहे. या मोहिमेंतर्गत उत्पन्न दाखला, वय व अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला आणि नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र बनवण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

साधारणतः निकालानंतर जून आणि जुलै महिन्यात या प्रमाणपत्रांसाठी तहसील कार्यालयात विद्यार्थ्यांची आणि पालकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दाखले मिळवण्यासाठी बराच वेळ लागतो. ही गैरसोय टाळण्यासाठी चांदवड महसूल विभागाने छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत हे विशेष नियोजन केले आहे. विद्यार्थ्यांसाठी अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे आणि भरलेले अर्ज आपल्या शाळेत जमा करायचे आहेत. शाळा विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या अर्जांचे नमुने उपलब्ध करून देईल. शाळा जमा केलेले अर्ज संबंधित ई-सेवा केंद्रचालकांकडे पाठवतील आणि त्यांच्यामार्फत प्रमाणपत्रे तयार करून ती पुन्हा शाळेमार्फतच विद्यार्थ्यांमध्ये वितरित केली जातील. यामुळे विद्यार्थ्यांना तहसील कार्यालयात खेटे मारायची गरज भासणार नाही.

ही मोहीम मंडळनिहाय राबवण्यात येणार असून, यासाठी मंडळामधील कार्यरत ई-सेवा केंद्र आणि शाळा यांनी समन्वय साधून कामकाज करावे, असे आवाहन तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी केले आहे. तसेच, गटशिक्षणाधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि सर्व ई-सेवा केंद्रचालक यांनीही यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे सूचित करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टळणार असून, त्यांना वेळेत आवश्यक प्रमाणपत्रे मिळण्यास मदत होईल, असा विश्वास तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

# उष्णतेपासून जनावरांची काळजी घ्यावी

## पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मोटेगावकरांचे पशुपालकांना आवाहन

**लासलगाव : वार्ताहर**

**गेल्या चार-पाच दिवसांपासून उष्णतेचा पारा वाढला आहे. या उन्हाचा माणसाला त्रास होतो, तसाच तो जनावरांनाही होतो. त्यामुळे पशुपालकांनी या वाढत्या उष्णतेपासून आपापल्या जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दत्ता मोटेगावकर यांनी पशुपालकांना केले आहे.**

या उष्णतेमुळे जनावरांनाही उष्माघाताचा त्रास होऊ शकतो. एकीकडे औषधांवरही खर्च होतो व दुसरीकडे दूध उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो. उन्हाळ्याच्या दिवसांत अपुरा चारा व निकृष्ट आहारामुळे जनावरे अशक्त बनून त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते. उन्हाळ्यात गुरांना हिरवा चारा मिळत नाही. जनावरांना दिवसभरात लागणारा चारा एकाचवेळी देण्याऐवजी समान विभागणी करून तीन ते चार वेळेस द्यावा. चाऱ्याची नासाडी टाळण्यासाठी त्याची बारीक कुट्टी करावी. चारा तसाच टाकला तर ३० टक्के वाया जातो. हिरवा चारा उपलब्ध असल्यास वाळलेल्या चारा यांचे मिश्रण करावे. वाळलेल्या गवतावर किंवा कडब्यावर मिठाचे किंवा गुळाचे पाणी शिंपडल्याने जनावरे अधिक आवडीने चारा खातात. अति उष्णतेचा जनावरांच्या आहारावर, दूध उत्पादनावर व प्रजननक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो, म्हणून जनावरांना रांजणातील पाणी पाजावे. उन्हाळ्यात अपुरा चारा व निकृष्ट आहारामुळे जनावरे अशक्त बनून त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते व ते विविध रोगांना बळी पडतात. म्हणून पशुतज्ज्ञांकडून वेळीच जनावरांना लाळ खुरकूत, घटसर्प, फऱ्या रोगाची लस टोचावी. परोपजीवी जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतुनाशक औषधे पाजावीत. जनावरांचा गोठा व परिसर स्वच्छ असावा. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावल्याने जनावरे आजारी पडणार नाहीत.



जनावरांसाठी सावली व चारापाणी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गुरांना जपण्यासाठी त्यांचे लसीकरण करून घेण्यासोबतच त्यांचा उन्हापासून बचाव करणेही गरजेचे आहे. जनावरांना लाळ्या खुरकूत, घटसर्प, फऱ्या रोगाची लस टोचावी. परोपजीवी जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतुनाशक औषधे पाजावीत. गाभण जनावरे व दूध उत्पादक जनावरांची विशेष काळजी घ्यावी. जनावरांचा गोठा व परिसर स्वच्छ असावा. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावावी.

**– डॉ. दत्ता मोटेगावकर,** पशुवैद्यकीय अधिकारी



# महावितरण लकी डिजिटल ग्राहक योजनेचे विजेते जाहीर

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**

महावितरण कंपनीच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेच्या माध्यमातून सलग तीन महिने ऑनलाइन पद्धतीने वीजबिल भरणा करणाऱ्या ग्राहकांमधून लकी ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात आली.

महावितरणने ग्राहकांना डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना आणली होती. विजेते ठरवण्यासाठी लकी ड्रॉ पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. ग्राहकांना उत्तम प्रतिसाद मिळाल्याने ही योजना यशस्वी ठरली. या योजनेतून पिंपळगाव बसवंत उपविभागांतर्गत खालील विजेते निवडण्यात आले. जयंतीलाल छाजेड, सुभाष सोनवणे, नर्मदाबाई वडजे या सर्वांना मोबाईल फोन भेट देण्यात आले. तर किसन पवार, विजय कराटे हे स्मार्ट वॉचचे विजेते ठरले. याप्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता रहिंज, पिंपळगाव बसवंत उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता उमेश पाटील, निफाड उपविभागाचे श्री नागरे, चांदवड उपविभागाचे सूर्यवंशी व लासलगाव उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता बागूल उपस्थित होते.



# भाजपा युवा मोर्चातर्फे काँग्रेस कमिटीसमोर आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसच्या प्रमुख नेत्या व राज्यसभा सदस्य सोनिया गांधी यांचे नाव ईडीने मनी लाँडरिंग प्रकरणातील आरोपपत्रात दाखल केले आहे. हे आरोपपत्र नॅशनल हेराल्ड खटल्यासंदर्भातील आहे. त्यामुळे भाजपा युवा मोर्चा नाशिकच्या वतीने काँग्रेस भवन समोर निषेध आंदोलन करण्यात आले. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे दोषी आढळले आहेत. त्यामुळे सरकार आणि न्यायव्यवस्थेने त्वरित अटक करावी, अशी मागणी केली. यावेळी सागर शेलार, युवा मोर्चा नाशिक शहर सरचिटणीस प्रशांत वाघ, प्रवीण भाटे, हर्षद जाधव, संदीप शिरोळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य यश बलकवडे, शहर उपाध्यक्ष पवन उगले, प्रवीण पाटील, गौरव घोलप, गौरव बोडके, अक्षय गांगुर्डे, अविनाश पिंपरकर, उमेश मोहिते, अमित चव्हाण, बाळकृष्ण शिरसाठ, विकास एखंडे, मुफ्फदल पेंटर, आदित्य सोनवणे, श्रीराज कान्नव, रोशन ठोके, शुभम काळे, भूषण शहाणे, सचिन निकम, महेश कुलकर्णी, आकाश मोरे, प्रतीक कमोद, कुलदीप, नितीन पाटील उपस्थित होते.

# भाजपाच्या आंदोलनाचा आकाश छाजेड यांच्याकडून निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याबरोबर दि. १८ रोजी शहर काँग्रेस आघाडी विभागप्रमुखांची बैठक मुंबई येथे होत असताना, अचानकपणे शहरातील पंधरा-वीस भाजपाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवन येथे निदर्शने केली.

नेमकी शहरातील काँग्रेसचे पदाधिकारी मुंबई येथे असताना संधी साधत पदाधिकाऱ्यांचे अनुपस्थितीमध्ये हा भ्याड निषेधाचा कार्यक्रम सत्ताधारी भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला. काँग्रेस पदाधिकाऱ्यांना माहिती दिली असती तर अतिशय चोख उत्तर भाजपच्या कार्यकर्त्यांना मिळाले असते, असे शहराध्यक्ष आकाश छाजेड म्हणाले.

शहरातील राजकारण अतिशय दूषित होत चालले आहे. यापूर्वी कधीही विविध पक्षांच्या कार्यालयावर निदर्शने करण्याची वेळ कुठल्याही पक्षावर आली नव्हती. नाशिकच्या संस्कृतीला न शोभणारी गोष्ट आहे. परंतु यापुढे असे घडल्यास त्यांना जागा दाखवण्याची हिंमत आमच्यामध्ये आहे. आणि जशास तसे उत्तर लवकरच देण्यात येईल, असा इशाराही आकाश छाजेड यांनी दिला.

## जाहीर नोटीस

तमाम नागरिकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, **मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेकडील १०० दिवस कृती आराखडयातील सप्तसूत्री कार्यक्रम नियोजित करण्यात आला आहे, सदर कार्यक्रमा अंतर्गत शहर वाहतूक शाखा युनिट १ कडील एकूण १६ दुचाकी वाहने खराब स्थितीत व काही दुचाकींचे सांगाडे हे बेवारस स्थितीत आडगळीत पडलेले असल्याचे आढळून आलेले आहे. सदर वाहनांचे टायर्स, सिट, रबरी सुट्टे भाग, प्लॅस्टिकचे सुट्टे भाग हे उन्हामुळे खराब होत आहेत. ही वाहने खराब वाहने, सांगाडे अशीच राहिल्यास एप्रिल/मे मधील अवकाळी पावसाने व मान्सुनमधील पावसाने निकामी होण्याची शक्यता आहे.

सदर बेवारस, खराब वाहने व वाहनांचे सांगाडयांनी शहर वाहतूक शाखा, युनिट २ आवारातील मोठी जागा व्यापलेली असून त्यांची नैसर्गिकरित्या क्षती होवुन त्यांचे अवमुल्यन होवुन ते निरूपयोगी होण्याची शक्यता आहे. सदर वाहनाचे खराब सांगाडयाचे अनुषंगाने प्राप्त माहिती **nashikcitypolice.gov.in** यावर **दिनांक १०/०४/२०२५** रोजी पासून ते **दिनांक २०/०४/२०२५** पावेतो प्रसारीत करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने निर्गती झालेल्या नादुरूस्त, खराब झालेले दुचाकी वाहने व वाहनांचे सांगाडे वगळून उर्वरित वाहनांचा **दिनांक २२/०४/२०२५** रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा युनिट क्र.२ आवारात दुपारी **१२.३० वाजता** सदर नादुरूस्त वाहने, वाहनांचे सांगाडे आहे त्या स्थितीत जाहिर लिलाव करण्याचे नियोजित केलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसव्दारे आवाहन करण्यात येते की, ज्या कोणास सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी सहा.पोलीस आयुक्त शहर वाहतूक शाखा नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा युनिट २ नाशिक शहर येथे **दिनांक २२/०४/२०२५** रोजी **सकाळी १२.३०** वाजेपावेतो समक्ष हजर होवुन लिलाव प्रक्रियेत सहभागी व्हावे. विहीत नमुन्यातील अर्जात माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करून सदर लिलाव प्रक्रियेत **दिनांक २२/०४/२०२५** रोजी सहभागी व्हावे, तरी नमूद कालावधीनंतर कोणतेही अर्ज/ तक्रार यांची दखल घेण्यात येणार नाही.

**जाहीर नोटीस दिनांक :- १८/०४/२०२५**

**ठिकाण :- सहा.पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक युनिट क्र. २,**

**मा. सविनय सादर**

**(पद्मजा बढे)**
**सहा. पोलीस आयुक्त**
**शहर वाहतूक शाखा,**
**नाशिक शहर**

# आज बोटावर मोजण्याइतकेच क्रांतिकारक परिचित : मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

चाफेकर बंधूंच्या बलिदानातून देशात क्रांतिकारकांची मोठी फळी उभी राहिली. मात्र, आज बोटावर मोजण्याइतकेच क्रांतिकारक परिचित आहे, अशी खंत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

क्रांतिवीर चाफेकर बंधूंच्या वाड्यातील संग्रहालयाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री जयकुमार रावळ, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आ. प्रशांत बंब, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, क्रांतिवीर चाफेकर स्मारक समितीचे अध्यक्ष गिरीश प्रभुणे, महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. चापेकर बंधुंनी क्रांतिकार्याबरोबरच समाज सुधारणांचेही कार्य केल्याचे गौरवपूर्ण उद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. ते म्हणाले, स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचायला हवा. त्यासाठी चापेकर स्मारकाला विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या तर संस्कार होतील. चापेकर बंधुंचे स्मारक हे अप्रतिम आणि प्रेरणा देणारे असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, स्वातंत्र्यवीरांच्या त्याग, बलिदान आणि समर्पणातूनच देश घडला आहे.

# 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या रावसाहेब थोरात सभागृहात पार पडलेल्या या कार्यशाळेत ऑनलाइन एमआयएस प्रणालीचे महत्त्व व अचूक नोंदणी कशी करावी? यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणीय संकटांवर मात करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. गावपातळीवर बदल घडवण्यासाठी माझी वसुंधरा अभियान हे प्रभावी माध्यम ठरत असून, त्यांनी उपस्थित सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना किमान ५ झाडे लावण्याचे आवाहनही यावेळी केले. ग्रामपंचायतींच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रणालीबाबत माहिती देण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणारे मोडाळे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी हनुमान दराडे यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय, 'पंचमहाभूत' - पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश याबाबत जिल्हा तज्ज्ञ रवींद्र बराथे यांनी पर्यावरणाचे विविध पैलू समजावून सांगितले. यावेळी जिल्ह्यातील सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व डेटा एंट्री ऑपरेटर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, माझी वसुंधरा अभियानात नाशिक जिल्हा परिषदेने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली असून, मागील वर्षी नाशिक जिल्ह्याने राज्यस्तरावर १४ पुरस्कार पटकावले आहेत. यावर्षीही सर्व ग्रामपंचायतीकडून पोर्टलवर वेळेवर आणि अचूक माहिती भरली जावी यासाठी सतत पाठपुरावा व मार्गदर्शन सुरू असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

## बेवारस/स्क्रॅप वाहनांचा होणार लिलाव

बेवारस वाहनांचा/स्क्रॅप वाहनांचा मा. पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा/ मुख्यालय नाशिक शहर यांचे आदेशाने **१६** दुचाकी वाहनांचा लिलाव होणार आहे. ज्या कोणास सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. २ येथे **दिनांक २२/०४/२०२५ रोजी सकाळी १२.३०** वाजेपावेतो समक्ष हजर होवुन लिलाव प्रक्रियेत सहभागी व्हावे. या वाहनांचा लिलाव एकत्रितपणे करण्यात येणार आहे. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस या वाहनांचा वापर करता येणार नाही. या वाहनांचे सुटे भाग वेगळे करून वापरता येतील. सदर दुचाकींचा चेसीस क्रमांक नष्ट करता येणार नाही. चेसीस क्रमांक सहाय्यक पोलीस आयुक्त शहर वाहतूक शाखा/शहर वाहतूक शाखा युनिट २ येथे लिलावानंतर **५** दिवसांत जमा करावा लागणार आहे. **दिनांक. २१/०४/२०२५** अनामत रक्कम/ डिपॉझिट जमा करावे, अशी माहिती सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.

## जाहीर नोटीस

तमाम नागरिकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, **मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेकडील १०० दिवस कृती आराखडयातील सप्तसूत्री कार्यक्रम नियोजित करण्यात आला आहे, सदर कार्यक्रमा अंतर्गत शहर वाहतूक शाखा युनिट क्र. १ कडील बेवारस मुद्देमाल निर्गती करण्याचे अनुषंगाने आढावा घेतला असता सहा.पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/ शहर वाहतूक शाखा युनिट क्र. १ कडील एकूण **१६** दुचाकी वाहने ही शहर वाहतूक शाखा युनिट २ येथे एकूण १६ वाहने खराब स्थितीत व काही दुचाकींचे सांगाडे हे बेवारस स्थितीत आडगळीत पडलेले असल्याचे आढळून आलेले आहे. सदर वाहनांचे टायर्स, सिट, रबरी सुट्टे भाग, प्लॉस्टिकचे सुट्टे भाग हे उन्हामुळे खराब होत आहेत. ही वाहने खराब वाहने, सांगाडे अशीच राहिल्यास एप्रिल/मे मधील अवकाळी पावसाने व मान्सुनमधील पावसाने निकामी होण्याची शक्यता आहे.

सदर बेवारस, खराब वाहने व वाहनांचे सांगाडयांनी शहर वाहतूक शाखा, युनिट २ आवारातील मोठी जागा व्यापलेली असून त्यांची नैसर्गिकरित्या क्षती होवुन त्यांचे अवमुल्यन होवुन ते निरूपयोगी होण्याची शक्यता आहे. सदर वाहनाचे खराब सांगाडयाचे अनुषंगाने प्राप्त माहिती **nashikcitypolice.gov.in** यावर **दिनांक १०/०४/२०२५** रोजी पासून ते **दिनांक २०/०४/२०२५** पावेतो प्रसारीत करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने निर्गती झालेल्या नादुरूस्त, खराब झालेले दुचाकी वाहने व वाहनांचे सांगाडे वगळून उर्वरित वाहनांचा **दिनांक २२/०४/२०२५** रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा युनिट क्र.२ आवारात दुपारी **१२.३० वाजता** सदर नादुरूस्त वाहने, वाहनांचे सांगाडे आहे त्या स्थितीत जाहिर लिलाव करण्याचे नियोजित केलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसव्दारे आवाहन करण्यात येते की, ज्या कोणास सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी सहा.पोलीस आयुक्त शहर वाहतूक शाखा नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा युनिट २ नाशिक शहर येथे **दिनांक २२/०४/२०२५** रोजी **सकाळी १२.३०** वाजेपावेतो समक्ष हजर होवुन लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्जात माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करून सदर लिलाव प्रक्रियेत **दिनांक २२/०४/२०२५** रोजी सहभागी व्हावे, तरी नमूद कालावधीनंतर कोणतेही अर्ज/ तक्रार यांची दखल घेण्यात येणार नाही.

**जाहीर नोटीस दिनांक :- १८/०४/२०२५**

**ठिकाण :- सहा.पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक युनिट क्र. २,**

**मा. सविनय सादर**

**(पद्मजा बढे)**
**सहा. पोलीस आयुक्त**
**शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर**

## महत्त्वाचे

### पालघरला टीडीएफचे २६ ला राज्य अधिवेशन शिवाजी निरगुडे, शिरसाठ यांना पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडीचे अर्थात टीडीएफचे राज्य अधिवेशन २६ एप्रिल रोजी शिक्षणमहर्षी स. तू. कदम विद्यालय पालघर येथे होणार असल्याची माहिती सहकार्यवाह डी. एस. पाटील यांनी दिली. सकाळी शोभायात्रा, १० वाजता ध्वजारोहण होईल. त्यानंतर अधिवेशनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडीचे राज्याध्यक्ष जी. के. थोरात अध्यक्षस्थानी असणार आहेत. अधिवेशनास प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणमंत्री दादा भुसे, पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक, रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, पदवीधर आमदार निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, शिक्षक आमदार किशोर दराडे, जयंत आसगावकर, ज.मु. अभयंकर, खासदार हेमंत सावरा, खासदार भास्करराव भगरे, शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रतापसिंह, शिक्षण उपसंचालक संपत सूर्यवंशी उपस्थित राहणार आहेत. हे अधिवेशन दोन सत्रात संपन्न होणार आहेत. पहिल्या सत्रात उद्घाटन, ज्येष्ठ पत्रकार प्रसन्न जोशी यांचे मार्गदर्शन होणार आहे. त्यानंतर जीवन गौरव पुरस्कार व शिक्षक पुरस्कारांचे वितरण होणार आहे. दुसऱ्या सत्रात शैक्षणिक परिसंवाद होणार आहे. या अधिवेशनात नाशिक विभागातून जीवनगौरव पुरस्कार शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे तर गुणवंत शिक्षक पुरस्कार त्र्यंबक डोंगरे, शिक्षकेतर पुरस्कारात भाऊसाहेब शिरसाठ यांची निवड करण्यात आली आहे.

### अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या पाच गायी आणि दोन बैलांची सुटका

**चांदवड : वार्ताहर** चांदवड तालुक्यातील निमोण येथे प्राणी फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी फिल्मी स्टाईलने सुमारे दहा किलोमीटर पाठलाग करत एका बोलोरो पिकअपमधून अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या पाच गायी आणि दोन बैलांची सुटका केली. या प्रकरणी पोलिसांनी पिकअपचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, ३ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्राणी फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांना गुप्त माहिती मिळाली होती की चांदवड-दुगाव मार्गे एक बोलोरो पिकअप जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणार आहे. त्यानुसार संतोष केंदळे, धीरज परेराव, रितेश राजपूत, मयूर जाधव, गौरव मते आणि समर्थ सोनवणे यांच्यासह दहा ते बारा कार्यकर्ते रात्रीच्या वेळी या वाहनाच्या मागावर होते. दुगावजवळ संशयित पिकअप दिसताच कार्यकर्त्यांनी पाठलाग सुरू केला आणि रस्त्यात खिळे टाकून पिकअप पंक्चर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पंक्चर झालेल्या अवस्थेतही चालकाने दुगाव ते निमोणपर्यंत वेगात गाडी चालवली. अखेर निमोणजवळ पिकअपचे चारही टायर फुटल्याने कार्यकर्त्यांनी गाडी अडवली, परंतु चालक फरार झाला. या घटनेची माहिती मिळताच निमोणचे पोलिस पाटील हिरामण देवरे यांनी चांदवड पोलिसांना कळवले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाच गायी आणि दोन बैलांची सुटका केली. पोलिसांनी ३ लाख ५२ हजार रुपयांचे पिकअप वाहन जप्त केले आहे पोलिस शिपाई संतोष लोखंडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बी. व्ही. सांगळे आणि शिवनाथ शेळके या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेची निवडणूक

**नाशिक:** जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठीची निवडणूक शनिवार दिनांक ३ मे २०२५ रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अन्नपूर्णा हॉल, नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे होणार आहे. निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. मनीष लोणारी हे काम पाहणार आहेत. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ४ मे रोजी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान पॅव्हेलियन हॉल, गोल्फ क्लब त्र्यंबक रोड, नाशिक येथे होणार आहे. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे आजीव सभासद एकूण ३११२ असून, ६९ क्लब सभासद आहेत.

फॉर्म नं.१४
(नियम ३३(२) )पहा
सर्व संमत माध्यमातून

**वसुली अधिकारी कार्यालय – I/II**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)**
पहिला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डींग, प्लॉट नं. ३०/ए, वाशी नवी मुंबई– ४००७०३

**मागणी नोटीस**

**बँका आणि वित्तीय संस्था अधिनियम, १९९३ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या द्वितीय अनुसूचीचा नियम २ आणि कर्ज वसुलीच्या कलम २५ ते २८ अंतर्गत सूचना.**
**आरपी नं. ५८/२०१९**
**बँक ऑफ बरोडा**
**वि.**
**श्री. पोपट चंदर मालेकर व इतर**

प्रति,
**यांचे कायदेशीर वारस**
**(सीडी २). श्री. कचरू पंढरीनाथ पाटील.**
मु. पोस्ट: निळवंडी, ता. दिंडोरी, जिल्हा – नाशिक,

१. याद्वारे सूचित करण्यात येते की, पीठासीन अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जारी केलेल्या पुनर्प्राप्ती प्रमाणपत्रानुसार. ओए/१५१२/२०१६ मध्ये कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी–३) रु. २०,६९,९१२.०० (रुपये वीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे बारा फक्त) पेंडेंट लाइट आणि भविष्यातील व्याज सोबत ११% म्हणजेच २८.११.२०१६ पर्यंत १,३०,०००.०० रुपये (रुपये एक लाख तीस हजार फक्त) ची वसुली होईपर्यंत आणि इतर प्रतिवादींसोबत संयुक्तपणे आणि वेगळ्या पद्धतीने प्रमाणपत्र कर्जदार–२ च्या कायदेशीर वारसांवर देय आहे.
२. आपणास नोटीस मिळाल्याच्या १५ दिवसांच्या आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे न केल्यास बँका आणि वित्तीय संस्था अधिनियम १९९३ आणि त्याअंतर्गत नियमांतर्गत वसुली केली जाईल.
३. पुढील आदेशाच्या सुनावणीच्या तारखेला किंवा त्याआधी आपणास तुमच्या मालमत्तेचे तपशील प्रतिज्ञापत्रावर जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत.
४. पुढील कार्यवाहीसाठी आपणास खालील स्वाक्षरी करणार यांच्यासमोर दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.
५. वर नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त, आपण देय देण्यास देखील जबाबदार असाल:
अ) प्रमाणपत्र/अंमलबजावणी कार्यवाहीच्या या सूचनेनंतर लगेच सुरू होणाऱ्या कालावधीसाठी व्याज देय राहील.
ब) या नोटीस आणि वॉरंट आणि इतर प्रक्रियेच्या सेवेच्या संदर्भात सर्व खर्च, शुल्क आणि खर्च आणि इतर सर्व कार्यवाही करण्यासाठी घेतलेल्या देय रक्कम वसूल केली जाईल.

माझे सही व ऋणवसुली कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि. ०४/०४/२०२५.

सील

**सही/– (दीपा सुब्रमण्यन)**
**वसुली अधिकारी–I**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)**

फॉर्म नं.१४
(नियम ३३(२) )पहा
सर्व संमत माध्यमातून

**वसुली अधिकारी कार्यालय – I/II**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)**
पहिला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डींग, प्लॉट नं. ३०/ए, वाशी नवी मुंबई– ४००७०३

**मागणी नोटीस**

**बँका आणि वित्तीय संस्था अधिनियम, १९९३ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या द्वितीय अनुसूचीचा नियम २ आणि कर्ज वसुलीच्या कलम २५ ते २८ अंतर्गत सूचना.**
**आरपी नं. १७८/२०१९**
**बँक ऑफ बरोडा**
**वि.**
**सौ. राधाबाई आनंदा तुंगार व इतर**

प्रति,
**यांचे कायदेशीर वारस**
**सीडी २. श्री. चिमणराव आनंदा तुंगार**
रा. मु.पो. :– दहिवी ता. दिंडोरी, जि. –नाशिक. –४२२२०२
**यांचे कायदेशीर वारस**
**सीडी ५. श्री. रमेश लहानू राऊत.**
**यांचे कायदेशीर वारस**
**सीडी६. श्री. दौलत लहानू राऊत.**
रा. मु.पो. अहिवंतवाडी, ता. दिंडोरी, जिल्हा–नाशिक – ४२२२१५

१. याद्वारे सूचित करण्यात येते की, पीठासीन अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जारी केलेल्या पुनर्प्राप्ती प्रमाणपत्रानुसार. ओए/१५२३/२०१६ मध्ये कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी–३) रु. २०,६८,५७५.०० (रुपये वीस लाख अडूसष्ट हजार पाचशे पंच्याहत्तर फक्त) पेंडेंट लाइट आणि भविष्यातील व्याज सोबत ११% म्हणजेच २८.११.२०१६ पर्यंत १,३०,०००.०० रुपये (रुपये एक लाख तीस हजार फक्त) ची वसुली होईपर्यंत आणि इतर प्रतिवादींसोबत संयुक्तपणे आणि वेगळ्या पद्धतीने प्रमाणपत्र कर्जदार–२ च्या कायदेशीर वारसांवर देय आहे.
२. आपणास नोटीस मिळाल्याच्या १५ दिवसांच्या आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे न केल्यास बँका आणि वित्तीय संस्था अधिनियम १९९३ आणि त्याअंतर्गत नियमांतर्गत वसुली केली जाईल.
३. पुढील आदेशाच्या सुनावणीच्या तारखेला किंवा त्याआधी आपणास तुमच्या मालमत्तेचे तपशील प्रतिज्ञापत्रावर जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत.
४. पुढील कार्यवाहीसाठी आपणास खालील स्वाक्षरी करणार यांच्यासमोर दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.
५. वर नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त, आपण देय देण्यास देखील जबाबदार असाल:
अ) प्रमाणपत्र/अंमलबजावणी कार्यवाहीच्या या सूचनेनंतर लगेच सुरू होणाऱ्या कालावधीसाठी व्याज देय राहील.
ब) या नोटीस आणि वॉरंट आणि इतर प्रक्रियेच्या सेवेच्या संदर्भात सर्व खर्च, शुल्क आणि खर्च आणि इतर सर्व कार्यवाही करण्यासाठी घेतलेल्या देय रक्कम वसूल केली जाईल.

माझे सही व ऋणवसुली कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि. ०४/०४/२०२५.

सील

**सही/– (दीपा सुब्रमण्यन)**
**वसुली अधिकारी–I**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)**

## बेवारस/स्क्रॅप वाहनांचा होणार लिलाव

बेवारस वाहनांचा/स्क्रॅप वाहनांचा मा. पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा/ मुख्यालय नाशिक शहर यांचे आदेशाने **०६** दुचाकी व **०१** ऑटोरिक्षा वाहनांचा लिलाव होणार आहे. ज्या कोणास सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३ येथे **दिनांक २२/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३०** वाजेपावेतो समक्ष हजर होवुन लिलाव प्रक्रियेत सहभागी व्हावे. या वाहनांचा लिलाव एकत्रितपणे करण्यात येणार आहे. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस या वाहनांचा वापर करता येणार नाही. या वाहनांचे सुटे भाग वेगळे करून वापरता येतील. सदर दुचाकींचा व ऑटोरिक्षा चेसीस क्रमांक नष्ट करता येणार नाही. चेसीस क्रमांक शहर वाहतूक शाखा युनिट क्र. ३ नाशिक शहर येथे लिलावानंतर **पाच** दिवसांत जमा करावा लागणार आहे. **दिनांक. १९/०४/२०२५** रोजी अनामत रक्कम डिपॉझिट जमा करावे. अशी माहिती सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.

## जाहीर नोटीस

तमाम नागरिकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, **मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेकडील १०० दिवस कृती आराखडयातील सप्तसूत्री कार्यक्रम नियोजित करण्यात आला आहे, सदर कार्यक्रमा अंतर्गत सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर/शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३ कडील बेवारस मुद्देमाल निर्गती करण्याचे अनुशंगाने आढावा घेतला असता शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३ येथे एकूण **०६** दुचाकी मोटार सायकल व **०१** ऑटोरिक्षा वाहने खराब स्थितीत व काही दुचाकीचे व ऑटोरिक्षाचे सांगाडे हे बेवारस स्थितीत आउगळीत पडलेले असल्याचे आढळून आलेले आहे.

सदर बेवारस, खराब वाहने व वाहनांचे सांगाडयांनी शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३ आवारातील मोठी जागा व्यापलेली असून त्यांची नैसर्गिकरित्या क्षती होवुन त्यांचे अवमुल्यन होवुन ते निरूपयोगी होण्याची शक्यता आहे. हे असेच पडून राहिल्यास सदर वाहनांचे, खराब वाहनांचे सांगाडयाचे अनुषंगाने प्राप्त माहिती **nashikcitypolice.gov.in** यावर **दिनांक १८/०४/२०२५** रोजी पासून ते **दिनांक २०/०४/२०२५** पावेतो प्रसारीत करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने निर्गती झालेल्या नादुरूस्त, खराब झालेले दुचाकी वाहने, ऑटो रिक्षा व वाहनांचे सांगाडे वगळून उर्वरित वाहनांचा **दिनांक २२/०४/२०२५** रोजी शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३, पाथर्डी फाटा, नाशिक शहर आवारात **सकाळी १०.३० वाजता** सदर नादुरूस्त वाहने, ऑटो रिक्षा, वाहनांचे सांगाडे आहे त्या स्थितीत जाहिर लिलाव करण्याचे नियोजित केलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसव्दारे आवाहन करण्यात येते की, ज्या कोणास सदर लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३, पाथर्डी फाटा, नाशिक शहर येथे **दिनांक २२/०४/२०२५** रोजी **सकाळी १०.३०** वाजेपावेतो समक्ष हजर होवुन लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्जात माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करून सदर लिलाव प्रक्रियेत **दिनांक २२/०४/२०२५** रोजी सहभागी व्हावे, तरी नमूद कालावधीनंतर कोणतेही अर्ज/ तक्रार यांची दखल घेण्यात येणार नाही.

**जाहीर नोटीस दिनांक :- १८/०४/२०२५**

**ठिकाण :- शहर वाहतूक शाखा, युनिट क्र. ३, पाथर्डी फाटा, नाशिक शहर**

**(पद्मजा बढे)**
**सहा. पोलीस आयुक्त**
**शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर**

# 'संदीप'च्या मेगा जॉब फेअरमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांना नोकरी



**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी यासाठी संदीप फाउंडेशनकडून मेगा जॉब फेअरचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी या मेगा जॉब फेअरमध्ये सॉफ्टवेअर, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाइल, इलेक्ट्रॉनिक्स, कन्सल्टिंग, सर्व्हिस, कन्स्ट्रक्शन अशा उद्योगात कार्यरत सुमारे २५० हून अधिक कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे ३००० विद्यार्थ्यांना नोकरी मिळेल, असा विश्वास अध्यक्ष डॉ. संदीप झा यांनी व्यक्त केला.

जागतिक दर्जाचे शिक्षण दिल्यानंतर विद्यार्थ्यांना चांगली नोकरी मिळवून देण्यासाठी संदीप फाउंडेशन व संदीप युनिव्हर्सिटीने नेहमीच पुढाकार घेतला असून संदीप फाउंडेशन अंतर्गत असलेली विविध महाविद्यालये तसेच संदीप विद्यापीठातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना १०० टक्के प्लेसमेंट देण्यात यश आले आहे. जॉब फेअरमध्ये नाशिक, पुणे, मुंबई, नागपूर, नोएडा, बंगलुरू तसेच गुजरात मधील कंपन्यांनी सहभाग घेतला असून या जॉब फेअरचे हे चौथे वर्ष आहे.

अभियांत्रिकी, व्यवसपन, औषध निर्माणशास्त्र, कायदा, विज्ञान, वाणिज्य आणि पदवी व पदव्युत्तर, डिप्लोमा विद्यार्थी, १२ वी, आयटीआय यामध्ये गेल्या दोन वर्षात उत्तीर्ण झालेल्या तसेच २०२५ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी या जॉब फेअरमध्ये सहभाग नोंदवला. राज्यातील विविध भागातील सुमारे ६५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली होती. या संधी व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना बायोडाटा कसा बनवावा, चांगला इंटरव्यू कसा द्यावा याबाबत देखील मार्गदर्शन करण्यात आले. आजमितीला संदीप फाउंडेशन व संदीप युनिव्हर्सिटीच्या नाशिक कॅम्पसमध्ये जवळपास १६००० विद्यार्थी शिक्षण घेत असून, संस्थेच्या बिहारमधील सिजौल येथे असलेल्या कॅम्पसमध्ये जवळपास ४००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. घेतात. यामध्ये देशातील तसेच विदेशातील विद्यार्थ्यांचा समावेश असून विद्यार्थ्यांना स्किल बेस्ड शिक्षण मिळावे तसेच जागतिक स्तराचे अनुभव मिळण्यासाठी संदीप तर्फे अनेक विदेशी संस्था व विद्यापीठांसोबत करार केले असल्याचे देखील डॉ. संदीप झा यांनी नमूद केले. नोकरीसोबतच विद्यार्थ्यांना उद्योजक म्हणून पुढे येण्यासाठी संदीप फाउंडेशनतर्फे मार्गदर्शनसुद्धा करण्यात येते. संस्थेचे माजी प्राचार्य स्व. डॉ. मिलिंद पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एका सेमिनार हॉलचे नामकरण त्यांच्या नावाने करण्यात आले.

पान १ वरून

## अपघातग्रस्तांना एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार

आदेश दिले. या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री आबिटकर यांनी यावेळी संबंधितांना दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान ५ रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे सांगितले.

## जगन मोहन रेड्डी यांची संपत्ती जप्त

गुन्हा दाखल केला होता. जगन रेड्डी, त्याचे जवळचे सहकारी व्ही. विजया साई रेड्डी, पुनित दालमिया यांनी रघुराम सिमेंट लिमिटेडमधील त्यांचे शेअर्स फ्रेंच कंपनीला विकण्याचा करार केला होता.

## एमआयएमच्या शहराध्यक्षासह ३८ जण अटकेत

प्रमाणात दगड, आले कसे? याचा शोध घेतला जात आहे. त्या दृष्टीने पोलीस या भागातील इमारतींच्या गच्चीवर जाऊन शोध घेत आहेत. तसेच या घटनेच्या काही दिवस अगोदर प्रक्षोभक विधाने करणाऱ्यांचे व्हिडीओ तसेच सोशल अकांउट चेक करीत आहेत. त्यात तथ्थ्यांश आढळताच कारवाई करण्यात येणार आहे. घटनास्थळावरुन जप्त केलेल्या दुचाकी मिळविण्यासाठी काहीजण पोलीस ठाण्यात गर्दी करत आहेत.द्वारका परिसरातील काठे गल्लीतील सातपीर दर्गा प्रकरणावरून उसळलेल्या दंगलप्रकरणी पोलिसांनी सुमारे १५०० हुन अधिक दंगलखोरांविरोधात गुन्हा दाखल केला असून, शनिवार रोजी अटकेत असलेल्या सर्व संशयितांना न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नारुटे यांनी दिली. या कारवाईदरम्यान ३० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले असून, तीन पोलिस वाहने देखील फोडण्यात आली. विशेष म्हणजे, नाशिकसह मालेगाव आणि धुळे येथून आलेल्या बाहेरील व्यक्तींनी स्थानिक मुस्लिम समाजाला भडकवत ही दंगल घडवून आणल्याचा संशय आहे.

## आयकर अधिकाऱ्याची आत्महत्या

टोकाचे पाऊल उचलल्याने वधूसह तिचा प्रियकर आणि अन्य एका संशयिताविरोधात अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुरकुले मंगल कार्यालयाजवळील इन्कम टॅक्स कॉलनीत हा प्रकार उघडकीस आला.पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार हरेराम पाण्डेय (रा. देवरिया, उत्तर प्रदेश) यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ हरेकृष्ण पाण्डेय याचा वाराणसी येथील मोहिनी नामक मुलीशी साखरपुडा झाला होता. या कार्यक्रमात तिने तिचा प्रियकर सुरेश पाण्डेय याला मिठी मारली होती. त्यानंतर तिचे प्रेमसंबंध हरेकृष्णला कळले. त्याने तू त्याला सोडून दे तरच मी लग्न करेल असे त्यांनी सांगितले. मात्र तिने मी त्याला सोडणार नाही. मात्र तू जर माझ्यासोबत लग्न केले नाही तर तुझ्यासह कुटुंबीयांवर हुंडा मागितल्याची तक्रार दाखल करेल. अशी धमकी दिली. यामुळे हरेकृष्ण वैफल्यग्रस्त झाला होता. त्यातून त्याने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली.याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## देशमुख न्यायालयात धाव घेणार

मला बाजूला करण्यात आले आणि नंतर अकाऊंटवर १० लाख रुपये देण्यात आल्याचे निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी म्हटले. तसेच, वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी धनंजय मुंडे यांची ऑफर होती असा दावाही त्यांनी पुन्हा एकदा केला. रणजीत कासले हे पुणे विमानतळावर आल्यानंतर त्यांना बीडच्या पोलिसांनी अटक केली आहे.

## उगाच वाद घालत बसतात

ठरवले आहे. सगळा आराखडा तयार आहे, निधीची कुठलीही कमतरता नाही. हे करत असताना जगात मॅक्झिमम भाषा इंग्रजी ही चालते. सध्या कुणाला उद्योग नाहीत, काम नाही, ते असले वाद घालतात. त्याच्यात ते वेळ घालवतात. इंग्रजी ही जगात सर्वत्र चालते, त्यामुळे तीदेखील आली पाहिजे.

## हिंदी विरोधी आंदोलनातूनही राज ठाकरे माघार घेतील

मजुरांची, शेतकऱ्यांची, कार्यकर्त्यांची मुले शिकावीत ती म्हणजे स्थानिक भाषेच्या शाळेत. हिंदी पत्रव्यवहारांची भाषा असू शकते. .

## पुण्यात काँग्रेस-भाजप कार्यकर्ते भिडले

पसरवण्यात येत आहे. सोनिया गांधी व राहुल गांधी यांना अटक करावी, अशी आमची मागणी असल्याचं भाजप समर्थकांचे म्हणणे होते.

**ग्रामपंचायत कार्यालय, आंबेबहुला, ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत आंबेबहुला, ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून दि. १८/०४/२०२५ ते २६/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत आंबेबहुला, ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, विल्होळी, ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०६/२०२४-२५ (द्वितीय प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विल्होळी ता. जि. नाशिक येथे 1) Under ground Drainage System at Vilholi Tal Dist Nashik 2) Under ground Drainage System at Vilholi Tal Dist Nashik विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून दि. १८/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत विल्होळी, ता. जि. नाशिक**

**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

--------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

--------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

--------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

--------------------

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर** ९८३४१०९३३७

--------------------

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**Name changed**

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

--------------------

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-८७८८०९२४१५**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

--------------------क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

✻ **मुंबई :** प्रभादेवी कुरणे चौक मार्गावरील बेस्टच्या बस क्रमांक १६७ मधून प्रवास करत असलेल्या तरुणीचा विनयभंग करण्यात आला. चालत्या बसमध्ये ही घटना घडली. या प्रकरणात इरफान हुसेन शेख याला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी इरफान शेख हा वांद्रे येथील रहिवासी आहे.

# महात्मा गांधी संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाला 'स्वायत्त दर्जा'

**नाशिक : प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाला 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्यात आला असून, यासंदर्भात पुणे विद्यापीठाचे अंतिम पत्र प्राप्त झाले आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (एसपीपीयू) यांनी स्वायत्तता प्रदान केली आहे. त्यामुळे महाविद्यालयाला आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे स्वतःचा अभ्यासक्रम तयार करणे शक्य होणार आहे.

याशिवाय, महाविद्यालयाला विविध प्रमाणपत्र, पदविका अभ्यासक्रमही सुरू करता येणार आहेत. नियामक मंडळ, विद्या परिषद, अभ्यास मंडळ, वित्त समिती आदींचे महाविद्यालयावर नियंत्रण असल्याने गुणवत्ता व पारदर्शी कारभारात वाढ होणार आहे. याच वर्षी नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार झालेल्या नॅक पुनर्मूल्यांकनामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्ता सिद्ध करून महाविद्यालयाने अव्वल स्थान प्राप्त केले आहे.

महाविद्यालयाने सलग दुसऱ्यावेळी नॅकची ए प्लस श्रेणी प्राप्त केली आहे. याबरोबरच महाविद्यालयाचे एनबीए क्रिडिटेशन झाले आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होणार असून, प्रत्यक्ष फायदा विद्यार्थ्यांना होत होणार आहे.

विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था, परिसंस्था, नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इत्यादींच्या अधीन राहून, येत्या शैक्षणिक वर्षापासून पुढील १० वर्षे कालावधीसाठी 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम तसेच या विभागातील परिपत्रकांमधील मार्गदर्शक तत्त्वे कॉलेजला बंधनकारक असणार आहेत.

संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, कोषाध्यक्षा डॉ.स्मिता हिरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. संतोष तांबे यांनी स्वायत्त दर्जा मिळाल्याबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे.

## शेतमाल चोरीला

**हिंगोली :** पिकविलेले हळद काढणी करून ठेवली. सकाळी हि हळद विक्रीसाठी नेणार होते. मात्र या पूर्वीच शेतात काढून ठेवलेली लाखो रुपयांची हळद चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. हिंगोलीच्या वसमत तालुक्यातील खुदनापूर शिवारात एक लाख ४० हजार रुपयांची हळद चोरट्यांनी लंपास केली आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. दत्तराव शेषराव तिडके असे हळद चोरीला गेलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याचे नाव असून तिडके यांनी वर्षभर काबाडकष्ट कष्ट करत शेतात हळदीचे उत्पादन घेतले होते. चांगले उत्पादन झालेली हळद काढणी करून ठेवली होती. सकाळी हि हळद मार्केटमध्ये विक्रीसाठी नेण्याचे नियोजन तिडके यांचे होते. दरम्यान बाजारपेठेत विक्री करण्यासाठी तिडके कुटुंबीयांनी शिजवून सुकायला ठेवली होती.

## नर्मदा परिक्रमा पूर्ण करणाऱ्या डॉ. बागडे यांचा सत्कार

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिक महानगरपालिकेचे सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. एस. बागडे यांनी वयाच्या ७०व्या वर्षी नर्मदा परिक्रमा पूर्ण करून ते नाशिकरोडला परतले आहेत. सुरुवातीपासूनच अध्यात्माची ओढ असलेले प.पू. गणेश बाबा व संत जनार्दन स्वामींचे शिष्य प.पू. माधवगिरीजी महाराज व प.पू. संतोषगिरीजी महाराज यांच्या कायम सान्निध्यात राहिलेले डॉ. बागडे यांनी शिंदे आरोग्य केंद्र व नंतर पळसे येथे तसेच महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी म्हणून जनसेवा केली. निवृत्तीनंतर त्यांनी एसएमबीटी हॉस्पिटल व कोपरगाव येथील हॉस्पिटलमध्येही उत्तम सेवा केल्याने ते सर्वश्रुत होते. वयाच्या ७० व्या वर्षी त्यांना नर्मदा परिक्रमा करण्याची प्रबळ इच्छा झाली.



तब्बल ३९६० किलोमीटरची नर्मदा परिक्रमा पायी ५ महिने २ दिवसांत अनवाणी पायांनी पूर्ण केली. परत आल्यावर त्यांचा सत्कार जनार्दन स्वामी आश्रमात प.पू. माधव गिरीजी महाराज व प. पू. संतोष गिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. पंचक येथील लक्ष्मी नारायण मंदिरात भक्त मंडळानेही त्यांना गौरविले. शिवाजी लोणारी, रमेश नागरे, दत्ताभाऊ दहिवाळ, मीनाताई सोनार यांनी पुष्पवृष्टी करून गौरव केला.

यावेळी भीमा आढाव, संजय बोडके, गिरीश उगले पाटील हे यावेळी उपस्थित होते. द्वारका जवळील गणेशबाबा मंदिरातही त्यांना गौरविण्यात आले.



# विघ्नेश्वर देवस्थान आयोजित मैफलीने भाविक मंत्रमुग्ध

**नाशिक : प्रतिनिधी**

गंगापूर रोडवरील श्री विघ्नेश्वर देवस्थान येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त भक्तिगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. बाबाज थिएटर आणि विघ्नेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने ही मैफल आयोजित करण्यात आली होती. औदुंबर भक्त मंडळ ट्रस्टच्या मार्गदर्शनांतर्गत ताल वैभव वाद्यमेळच्या सर्व गायक-वादक कलाकारांनी विविध भक्ती गीतांच्या माध्यमातून संगीत पुष्प बाप्पाच्या चरणी अर्पण केले. यात गायक कृष्णा जाधव, गायिका पल्लवी गायकवाड-पाटील यांनी विविध भक्तिगीते सादर केली. त्यांना संस्कृती हिरे, वैभव काळे, हितेश्वर पाटील, शिवम पगार, मनीष सोनवणे, वीरेंद्र काळे, पवन काळे, धनश्री काळे यांची संगीतसाथ लाभली. श्रद्धा कराळे हिने सूत्रसंचालन केले. बाबाज थिएटरचे प्रशांत जुन्नरे यांचे सहकार्य लाभले. औदुंबर भक्त मंडळ ट्रस्ट नाशिक यांचे विशेष मार्गदर्शन ताल वैभव वाद्यमेळच्या कलाकारांना लाभले. औदुंबर भक्त मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष भूषण काळे, सचिव गणेशभाऊ कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मनोज काळे यांनी आभार मानले.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**चांदवड : वार्ताहर** चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू येथे एकाची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तुषार संसारे असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू येथे राहणाऱ्या तुषार संसारे यांनी गुरुवार दि. १७ एप्रिल सकाळी सात वाजेच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने यासंदर्भात चांदवड पोलिसात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून, याप्रकारणी अधिक तपास पोलीस हवालदार सांगळे करीत आहेत.

# आरटीई तिसऱ्या फेरीला २१ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

शिक्षणहक्क कायद्यांतर्गत खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला असून, प्रवेशप्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीला दि.८ पासून सुरुवात झाली आहे. या फेरीसाठी १५ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु, आरटीई २५ टक्के प्रतीक्षा यादीतील दुसऱ्या फेरीच्या प्रवेशासाठी २१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही प्रतीक्षा यादीतील तिसऱ्या फेरीसाठी अंतिम मुदतवाढ असल्याचे प्राथमिक शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरावा आणि निश्चित केलेल्या कालावधीत सादर करावा. प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनमान्य शाळांमध्ये विनामूल्य शिक्षणाची संधी दिली जाणार आहे.

जिल्ह्यातील ४०७ शाळांमधील प्रवेशासाठी ५ हजार २९६ रिक्त जागांसाठी १७ हजार ३८५ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राथमिक शिक्षण विभागाला प्राप्त झाले आहेत. या अर्जांपैकी ६ हजार ७४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी ४ हजार ७७ विद्यार्थ्यांनी प्रवेशप्रक्रिया पूर्ण केली आहे. २१३ जणांचे अर्ज बाद करण्यात आले आहे. १ हजार ९८० विद्यार्थ्यांनी आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारला. ४७५ विद्यार्थी दुसऱ्या फेरीतील प्रतीक्षा यादीत आहेत. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेता यावे यासाठी प्राथमिक शिक्षण संचलनालयातर्फे आरटीई प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. आरटीई अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च राज्य सरकारकडून शाळांना देण्यात येतो.



# महानाट्यातून संभाजी महाराजांचा इतिहास उलगडणार : खा.कोल्हे

**नाशिक : प्रतिनिधी**

ज्ञानवर्धिनी प्रसारक मंडळ व तळ्याची वाडी कृषी पर्यटन केंद्रातर्फे शिवपुत्र संभाजी महानाट्याचे आयोजन दिनांक ३० एप्रिल ते पाच मेदरम्यान नाशिकमध्ये तपोवन साधू ग्राम मैदानावर गोपाळ पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. या महानाट्याची माहिती देणाऱ्या पुस्तकाचे नुकतेच खा. अमोल कोल्हे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

## माहिती पुस्तकाचे अनावरण

या महानाट्यात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रमुख भूमिका साकारणारे खासदार अमोल कोल्हे, डॉ. घनश्याम राव यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सभागृहात नाशिक शहरातील विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन शिवपुत्र संभाजी महानाट्य यशस्वी करण्याचे आवाहन केले.

यावेळी मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे, व्ही.एन. नाईक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत धात्रक, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजेंद्र निकम, ग्लोबल एज्युकेशन संस्थेच्या संस्थापिका विजयालक्ष्मी मणेरीकर, जयंत ढोके, सुनील ढगे, तृप्तीदा काटकर, सतीश पिसाळ, जयप्रकाश जातेगावकर, योगेश आडभाई, अपूर्व पाटील, राजेश भुसारे, गिरीश गर्गे, विनायक शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी शिवपुत्र संभाजी महानाट्याच्या माहिती पुस्तकाचे अनावरण खासदार अमोल कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार नचिकेत पाटील यांनी मानले.

गांवकरी



## महत्त्वाचे

### वृद्धाच्या बेवारस मृतदेहाबाबत आवाहन

**नाशिक :** टाकळी गावाजवळील महादेव मंदिरालगतच्या रस्त्यावर एक वृद्ध आजारी व अशक्तपणा आल्यामुळे रस्त्याच्या कडेला पडलेला होता. १०८ रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉ. अरविंद प्रजापती यांनी तपासून मयत घोषित केले. वृद्धाच्या अंगावर फुल बाहीचा राखाडी रंगाचे जॅकेट, आतमध्ये लाल रंगाचा टी शर्ट, मळकट व पांढऱ्या रंगाची पॅन्ट, डोक्याचे केस पांढरे, दाढी वाढलेली, वय अंदाजे साठ वर्षे या वर्णनाच्या व्यक्तीबद्दल कुणाला काही माहिती असल्यास हवालदार जगताप, नेमणूक सरकारवाडा यांच्याशी संपर्क करावा.



**नाशिक : राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदाचे नेमणूकपत्र सरपंच मोहनीश दोंदे यांना देताना जिल्हाध्यक्ष श्यामराव हिरे. समवेत प्रदेश कार्याध्यक्ष पुरुषोत्तम कडलग, जिल्हा कार्याध्यक्ष गणेश गायधनी, तालुकाध्यक्ष रामकृष्ण झाडे, शहराध्यक्ष बाळा निगळ, रतन चावला आदींसह पदाधिकारी. (छाया : सुनील पवार)**

### राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्षपदी दोंदे

**नाशिकरोड :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी मोहनीश दोंदे यांची निवड करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या आदेशान्वये प्रदेश कार्याध्यक्ष पुरुषोत्तम कडलग यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष श्यामराव हिरे यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे. निवडीचे जिल्हाकार्याध्यक्ष गणेश गायधनी, शहराध्यक्ष बाळा निगळ, त्र्यंबकेश्वर तालुकाध्यक्ष कैलास मोरे, सिंधी सेल प्रदेशाध्यक्ष रतन चावला, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रामकृष्ण झाडे यांनी स्वागत केले.




### मित्रमेळा परिवाराकडून बाबासाहेबांना अभिवादन

**नाशिकरोड :** मित्रमेळा परिवाराकडून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समाजसेविका सुमनबाई गवारे, शारदाबाई गायकवाड यांचा सत्कार माजी नगरसेविका डॉ. सीमा ताजने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेंद्र ताजने, उपमहानगरप्रमुख किरण डहाळे, विजय काळदाते, दत्ता आगळे, वनिता चंद्रमोरे, रमेश पाळदे, सागर वाकचौरे, उल्हास पगारे, सदामामा चव्हाण, सचिन सूर्यवंशी, महसूल सहाय्यक अधिकारी आशितोष पगारे, अरुण निरगुडे, किशोर आनप, शिंदे, मोहगाव विविध कार्यकारी सोसायटीचे माजी व्हा. चेअरमन नितीन साळवे, विलास थोरात, भाईदास चव्हाण, भूषण पगारे, सलीम पठाण, संजू हांडोरे, बाळासाहेब दंडगव्हाळ, विशाल पवार, सूरज शेखरे, अकबर पठाण, मंगेश पोरजे, नाना बर्वे, गोपी देवरे, बंटी निकम, शरद टिळे आदी उपस्थित होते.



### स्व. रामचंद्र काकड सर स्मृतिदिन साजरा

**पंचवटी :** मखमलाबाद येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. रामचंद्र काकड सर यांचा ६ वा स्मृतिदिन व एप्रिल महिन्यात वाढदिवस असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक सदस्यांचा अभीष्टचिंतन सोहळा अध्यक्ष रामदास पिंगळे यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रारंभी स्व. रामचंद्र काकड सरांच्या अर्धपुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला. ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. याप्रसंगी दामोदर मानकर, शंकरराव पिंगळे, गोकुळ काकड, पवार यांनी कै. काकड सरांच्या स्मृतींना उजाळा दिला. वाचनालयाची व ज्येष्ठ नागरिक संस्थेची स्थापना, निधी कमी असतानाही इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी कै. सरांनी सर्वांसह केलेले प्रयत्न, ध्येयनिष्ठ व तत्त्वनिष्ठ आचरण असलेल्या सरांच्या जीवनकार्याचा मान्यवरांनी आढावा घेतला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्यवाह सूर्यभान पवार यांनी केले. याप्रसंगी शिंदेबाबा, देवराम पवार, नरेंद्र मुळाणे, सुभाष तिडके, संदीप धात्रक, पोपट पालवे, देवराम पालवे, विजय पांगारकर, विजय गांगुर्डे, एकनाथ दिघे, सुधाकर राख, प्रताप काकड व कुटुंबीय, शेवाळे सर, ज्ञानेश्वर पिंगळे, आबा मुरकुटे व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. श्री. दुरगुडे सर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र सिरसाट, पाठक मॅडम, बाळू मानकर यांनी परिश्रम घेतले.



### घरकुल संस्थेस भरीव देणगी

**पंचवटी :** चांदशी येथील सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांनी पिंपळगाव बहुला येथील प्रौढ मानसिक दिव्यांग मुलींसाठी चालविण्यात येत असलेल्या घरकुल परिवार संस्थेस भेट देऊन भरीव देणगी दिली. तेथील मुलींचे हस्त कौशल्य आणि कलाविष्कार बघून सारेच थक्क झाले. कोणतेही शासकीय अनुदान न घेता दिव्यांग मुलींच्या पालन पोषणाची जबाबदारी चोखपणे पार पाडणाऱ्या संस्थेच्या व्यवस्थापनाचे करावे तितके कौतुक थोडे आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव माधव पाटील यांनी काढले.सहा महिलांच्या जोरावर २००६ मध्ये सुरू झालेल्या या संस्थेत आता ६२ महिला आहेत. येथे या महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. येथे त्यांना मैत्रिणी मिळतात. नृत्य संगीत योगा चित्रकला यांचे धडे त्यांना दिले जातात. त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो, असे या संस्थेच्या पदाधिकारी श्रीमती साधना देशमुख यांनी सांगितले. चेतना शंखपाळ आणि करुणा भिडे यांनीही संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. किशोर देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्वांनी यावेळी दिव्यांग महिलांशी संवादही साधला. प्रारंभी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष विजय बिरारी यांच्या हस्ते घरकुल परिवाराला मंडळातर्फे भरीव देणगीचा धनादेश श्रीमती साधना देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक मंडळाचे उपाध्यक्ष बी.बी.मोरे यांच्यातर्फे खाऊ आणि मिष्टान्नाचे वाटप करण्यात आले. यावेळी अरुण कोरडे, संभाजी शेवाळे, मंगलाताई शेवाळे, मोहन चंगेडे, शरद मंडलिक, भगीरथ मंडलिक उपस्थित होते.

# दहा वर्षांपासून हॉटेलचे फायर ऑडिटच नाही

## कारवाईसाठी युवासेना आक्रमक; महानगरपालिकेला निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

**पंचवटी परिसरात मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल रिलॅक्स इन चालवणाऱ्या व्यावसायिकाने सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले फायर ऑडिट पालिकेला सादर केलेले नाही. धक्कादायक म्हणजे या हॉटेलने दहा वर्षांत फायर ऑडिटच केले नसल्याची बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे. त्यामुळे याप्रकरणी महापालिकेने संबंधित हॉटेल व्यावसायिकावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी युवासेनेचे जिल्हाध्यक्ष रूपेश पालकर यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमनचे मुख्य वैद्यकीय अधिकारी संजय बैरागी यांच्याकडे युवासेना पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली.**

यावेळी युवासेनेचे जिल्हा समन्वयक ॲड. मिलिंद मोरे, युवासेना उपमहानगरप्रमुख संतोष रनमाळे, विभागप्रमुख पराग बिरारी, उपशहरप्रमुख शुभम घुले, पूर्व विधानसभा प्रमुख आकाश कोकाटे आदींसह उपस्थित होते. अग्निशमन अधिकारी बैरागी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, या हॉटेलमध्ये लोकांची मोठी वर्दळ असते. तसेच हॉटेल परिसराच्या अवतीभवती लोकवस्ती असून, गेल्या अनेक वर्षांपासून सदर हॉटेल सुरू आहे.

मात्र, शासकीय नियमानुसार फायर सेफ्टी तरतूद करण्यात आली आहे. त्याची पूर्तता या हॉटेल व्यावसायिकाने करणे आवश्यक असताना ती केलेली नाही. वेळोवेळी फायर सेफ्टी अहवाल प्रत्येक व्यावसायिकाने सादर करणे अनिवार्य असताना सदर हॉटेल रिलॅक्स इन यांनी फायर सेफ्टी ऑडिट केलेले नाही. केंद्रीय माहिती अधिनियम २००५ च्या तरतुदीन्वये ॲड. मिलिंद मोरे यांनी मनपाच्या अग्निशमन कार्यालयाकडे २० मार्चला अर्ज देऊन हॉटेल रिलॅक्स इन यांनी मागील १० वर्षांपासून फायर ऑडिटच केलेले नसल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. यावरून सदर हॉटेल रिलॅक्स इन यांनी शासनाची फसवणूक केलेली असल्याने सदर हॉटेलवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी युवासेनेने केली आहे.

## गर्दीचा फायदा घेत महिला प्रवाशाचे मंगळसूत्र लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



ठक्कर बाजार बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत एक महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रभागा रमेश गांगुर्डे (वय ६७, रा. उत्तमनगर, स्वामी समर्थनगर, नाशिक) ही महिला दि. १४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता ठक्कर बाजार बसस्थानकावरून नाशिक-कळवण बसने पिंपळगाव धूम येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना, गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १५ ग्रॅम वजनाचे, ५० हजार रुपये किमतीचे दोन पदरी सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## चारचाकीला धक्का लागल्याने एकास मारहाण; गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

दुचाकीचा चारचाकी वाहनाला धक्का लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादात अशोक स्तंभ परिसरातील विश्वा सोसायटीच्या पार्किंगमध्ये एका युवकाला तिघांनी मिळून बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, रोहित नरेंद्र बंब (वय २४, रा. विश्वा अपार्टमेंट, ५ वा मजला, प्लॉट क्र. ४३१/४, अशोक स्तंभ) हे त्यांची मोटारसायकल सोसायटीच्या गेटमधून बाहेर काढत असताना गेटबाहेर उभी असलेली काळ्या रंगाची एम.जी. हेक्टर कार ही त्यांच्या दुचाकीच्या पुढच्या टायरला थोडासा धक्का लागला. यामुळे कारचा चालक 'अंकुश' (पूर्ण नाव व पत्ता अद्याप अस्पष्ट) याने संतापून रोहित बंब यांना मारहाण केली. यावेळी अंकुशसोबत असलेले दोन अनोळखी इसम (वय अंदाजे २५ ते ३० वर्षे) यांनीदेखील रोहित यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची तक्रार दाखल झाली आहे. याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सरकारवाडा पोलीस करीत आहेत.

## पोलिस असल्याचे भासवून वृद्धेला घातला गंडा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



पोलिस असल्याचे भासवून दोन अनोळखी इसमांनी एका ७० वर्षीय वृद्ध महिलेला सुमारे २ लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने गंडवले. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी आर. श्यामला रवींद्रन (वय ७०, रा. आढावनगर, नाशिकरोड) या शिवमंदिरातून दर्शन घेऊन पायी घरी जात असताना, जेलरोड येथील रेणुका हॉस्पिटलजवळील सार्वजनिक गार्डन परिसरात दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. आम्ही पोलीस आहोत, तुम्ही गळ्यात एवढे सोने घालून का फिरताय? इथे अलीकडेच सोन्याच्या कारणावरून खून झालेला आहे. तुमचे दागिने आमच्याकडे द्या, आम्ही सुरक्षित ठेवतो, असे सांगत त्यांनी वृद्धेला विश्वासात घेतले. त्यानंतर त्या इसमांनी १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे ५६ ग्रॅमचे मंगळसूत्र, ३३ हजार रुपये किमतीच्या १२ ग्रॅम वजनाच्या बांगड्या आणि १२ हजार किमतीची ४ ग्रॅम वजनाची अंगठी कागदात गुंडाळून पर्समध्ये ठेवल्याचा बनाव केला. परंतु, प्रत्यक्षात पर्समध्ये फक्त रिकामा कागद ठेवून दोघेही मोटारसायकलवरून नारायण बापू चौकाच्या दिशेने पसार झाले.

या घटनेनंतर उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

> **नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन**
> कोणीही स्वतःला पोलिस म्हणून ओळख देत असेल तर त्यांच्या ओळखपत्राची खातरजमा करावी आणि कोणत्याही परिस्थितीत दागिने, रोकड किंवा अन्य मौल्यवान वस्तू कोणाकडेही न देता तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.
> **–जितेंद्र सपकाळे**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उपनगर पोलीस ठाणे

## सत्ताधारी पक्ष समाजात तेढ निर्माण करतात

### हर्षवर्धन सपकाळ : काँग्रेस विचारांनी सामना करणार

**नाशिक : प्रतिनिधी**

सत्ताधारी पक्षाकडून समाजामध्ये तेढ पसरवले जात आहे, मात्र काँग्रेस विचारांनी सामना करणार आहे, असे उद्‌गार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिळक भवन येथे काढले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नाशिक शहर-जिल्हा काँग्रेस कमिटी जयंती उत्सव समितीच्या वतीने भारताचे संविधान लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पेनाचा उपयोग केला, त्या पेनाची विश्वविक्रमी प्रतिकृती नाशिक येथे जयंतीच्या निमित्ताने उभारण्यात आली होती. ती प्रतिकृती प्रदेश काँग्रेस कमिटीच्या टिळक भवन या मुख्यालयात प्रदर्शित करण्यात आली.



हर्षवर्धन सपकाळ, बी. एम. संदीप यांच्या प्रमुख हस्ते या पेनाची प्रतिकृती प्रदर्शित करण्यात आली.

देशाचे संविधान लोकशाही टिकली पाहिजे याकरिता काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते कटिबद्ध आहेत, असे मत सपकाळ यांनी व्यक्त केले. पुढील काळामध्ये पेनाची प्रतिकृती पथनाट्याच्या माध्यमातून संविधानाचे महत्त्व पटावं म्हणून विविध महाविद्यालयांमध्ये काँग्रेसच्या वतीने प्रदर्शित करण्यात येणार आहे, अशी माहिती शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी दिली.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन प्रभारी गणेश पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव नाशिक शहराचे प्रभारी ब्रिजकिशोर दत्त, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे, नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, नाशिक शहर काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर, शहर काँग्रेसचे ज्येष्ठ उपाध्यक्ष संदीप शर्मा, नाशिक शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष स्वप्निल पाटील, नाशिक जिल्हा एनएसयूआयचे अध्यक्ष नाशिक जिल्हा अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष तनवीर तांबोळी, नाशिक शहर काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष गौरव सोनार, प्रदेश एनएसयूआयचे सचिव स्वरूप पिसे, शहर युवक काँग्रेसचे सरचिटणीस राहुल सूर्यवंशी, सेवा दलाचे उपाध्यक्ष धोंडीराम बोडके, नाशिकरोड सेवादल ब्लॉक अध्यक्ष उमेश चव्हाण, शहबाज मिर्झा उपस्थित होते.

## सव्वासात लाखांचा ऐवज माडसांगवी येथे लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील माडसांगवी येथे भरदिवसा घरफोडीची घटना घडून आली असून, अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सुमारे ७ लाख २४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची तक्रार दाखल झाली आहे. या चोरीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सुनील वसंत सोळसे (३३, रा. माडसांगवी, ता. नाशिक) हे दिनांक १७ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी ५.३० दरम्यान त्यांच्या पत्नी आणि कुटुंबीयांसह कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात न्यायालयीन सुनावणीसाठी पिंपळगाव बसवंत येथे गेले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ७.२४ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादीने दिलेल्या माहितीप्रमाणे, चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये २० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र (सोन्याचे पट्टे) अंदाजे किंमत ७०,००० रुपये,१० ग्रॅम वजनाचे झुब्बे व वेल - ३५,००० रुपये, ४ ग्रॅम वजनाची नथ - १४,००० रुपये, लग्नातील शालू व पाच साड्या - ५,००० रुपये,६,००,००० रुपये रोख रक्कम, ज्यामध्ये ५०० रुपयांच्या ८०० नोटा आणि १०० रुपयांच्या २००० नोटांचा समावेश होता. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चोरीची मोटारसायकल विकणारा अटकेत

### गुन्हे शाखा युनिट-२, इंदिरानगर पोलिसांची संयुक्त कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक शहरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, गुन्हे शाखा युनिट-२ आणि इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने कारवाई करत चोरीची मोटारसायकल विक्रीस आणणाऱ्या एकाला अटक केली. त्याच्याकडून चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा युनिट-२ चे सपोउनि प्रेमचंद गांगुर्डे व पोहवा चंद्रकांत गवळी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, कवटेकरवाडी परिसरात एक इसम चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी आणणार आहे. माहितीच्या आधारे प्रभारी पोलीस अधिकारी हेमंत तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पथकाने कवटेकरवाडी, पांडवलेणी परिसरात सापळा रचून संबंधित इसमाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव नितीन एकनाथ पवार (वय २०, रा. कवटेकरवाडी, नाशिक) असल्याचे सांगितले. त्याच्याकडून एमएच १५ इएन ६४७६ या क्रमांकाची, अंदाजे २५ हजार रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली.या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील पथक आणि गुन्हे शाखा युनिट-२ च्या अधिकाऱ्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

## थॅलेसेमियामुक्त अभियानास प्रारंभ

**नाशिक :** थॅलेसेमिया हा एक आनुवंशिक विकार आहे. या विकारावर अजून कोणतेही ठोस उपाय अस्तित्वात नाहीत. त्यामुळे या विकाराची रोखथाम करणे, हेच एक उपचारात्मक पाऊल आहे. हा विकार होऊच नये व त्याचा पुढे प्रसार होऊ नये, यासाठी तरुणांचे विवाहपूर्वी समुपदेशन होणे गरजेचे आहे. थॅलेसेमिया मायनर रुग्णाने दुसऱ्या मायनर रुग्णाशी लग्न केल्यास त्यांना होणाऱ्या अपत्याला थॅलेसेमिया हा विकार होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे विवाहपूर्वी तरुणांनी रक्ततपासणी करून घेणे आवश्यक आहे, असा मोलाचा सल्ला आश्रय संस्थेच्या आरोग्य विभागाचे सचिव प्रा. प्रकाश पांगम यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक व आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था, ठाणे यांच्यामध्ये करार करण्यात आला.

## पंचवटी परिसरात जुना वाडा कोसळला

### जीवितहानी नाही, दोघांना वाचविण्यात यश

**पंचवटी : वार्ताहर**

शहरातील पंचवटी परिसरातील एक जुना वाडा गुरुवारी मध्यरात्रीनंतर कोसळला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या वाड्यामध्ये अडकून पडलेल्या दोन जणांना वाचविण्यात प्रशासनाला यश मिळालेले आहे.

गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास पंचवटी परिसरामध्ये असलेल्या पेरीना आइस्क्रीम समोरील जुना झालेला वाडा हा मध्यरात्री अचानक कोसळला. याबाबतची माहिती पोलिस नियंत्रण कक्षाला मिळाल्यानंतर या घटनेची माहिती तातडीने पोलिसांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला दिली.

माहिती मिळताच तातडीने महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी वाड्यामध्ये प्रवेश केला. या ठिकाणी मंगल प्रकाश देवकर (६०), सागर उत्तम सोनवणे (३७) या दोघांना वाचविण्यात यश आले. या वाड्यामध्ये राहत असलेले अन्य नागरिक वाडा पडण्यापूर्वीच बाहेर पडलेले होते. काहीजण हा वाडा सोडून गेले होते. दोन जण झोपेमध्ये असल्यामुळे हे या वाड्यामध्ये अडकून पडले. तातडीने पोलिस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी केलेल्या मदतीमुळे या दोन जणांचे जीव वाचविण्यात यश मिळाले.



## स्थानिक स्वराज्य निवडणुकांत रंगणार एआय प्रचाराचा ट्रेन्ड

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये नुकत्याच झालेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्यात एआयचा वापर करून बाळासाहेबांच्या आवाजात सैनिकांना साद घालण्यात आली. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीत प्रचाराचा एआय ट्रेन्ड येण्याची शक्यता आहे.



निवडणुकीच्या प्रचारात वेगवेगळ्या प्रकारचे फंडे वापरण्यात येत असताना, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आणलेला व्हिडिओ प्रचार चांगलाच गाजला. त्यानंतर अनेक ठिकाणी असा प्रयोगही झाला. या प्रचाराला उत्तर देण्यासाठी नंतर अनेक पक्षांतर्फे हाच प्रकार वापरण्यात आला. प्रचारासाठी समाजमाध्यम मोठा पर्याय ठरल्यानंतर आधुनिक तंत्रज्ञानही राजकीय पक्षाच्या मदतीला धावले. आता आलेल्या आर्टिफिशियल तंत्रज्ञानाचा वापर करीत थेट दिवंगत नेत्यांच्या आवाजात सभा घेण्याचा प्रकार तामिळनाडूसह काही ठिकाणी झाल्यानंतर नाशिकमध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हा शिबिरात बाळासाहेब यांच्या हुबेहूब आवाजाचा वापर करीत सैनिकांना साद घातली होती. हा प्रयोग सैनिकांना चांगलाच भावला.

हा प्रयोग करताना शिंदेसेनेला बाळासाहेबांच्या आवाजात गद्दार संबोधले गेल्यानंतर शिंदेसेनेच्या वतीनेही त्याला प्रत्युत्तर देण्याची तयारी सुरू झाल्याची चर्चा असून, एआयच्या माध्यमातून बाळासाहेब आणि आनंद दिघे यांच्या आवाजात भाषण तयार करून ते सभांमध्ये लावण्यासह समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. नाशिकमध्ये बाळासाहेबांचे पूर्वीपासून असलेले आकर्षण पाहता नाशिकमध्ये शिंदेसेनेतर्फे असाच प्रकार उपयोगात आणला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य महापालिका निवडणुकांसह जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये या पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याची दाट शक्यता असून, त्याची सुरुवात उद्धव सेनेच्या शिबिरातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नाशिकरोडला प्रदर्शनाचा समारोप

**नाशिक :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या येथील एससी, एसटी ओबीसी अँड मायनॉरिटीज वेल्फेअर असोसिएशन आयएसपी सीएनपीच्या वतीने नाशिकरोड येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधत डॉ. आंबेडरकरांनी वापरलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनाच्या समारोप झाला. एसपीएमसी आयएलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक विजयरंजन सिंग व सीएनपीचे मुख्य महाप्रबंधक डॉ. डी. के. रथ उपस्थित होते. संस्थेचे जनरल सेक्रेटरी विकास बर्वे, कार्याध्यक्ष नितीन तेजाळे यांनी उपस्थितांना भारतीय संविधानाची प्रत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा भेट दिली. एसपी, एमसीआयएलच्या इतर युनिटपैकी नाशिक असोसिएशनच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाचन संस्कृतीवर अविस्मरणीय व ऐतिहासिक असा देखावा सादर केल्याने सर्व पदाधिकाऱ्यांचे यावेळी अभिनंदन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः वापरलेल्या विविध वस्तू प्रत्यक्ष बघणं हे आपलं भाग्यच असल्याचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक विजयरंजन सिंग यांनी म्हटले. कार्यक्रमाप्रसंगी महेंद्र चव्हाण, सुधीर गायकवाड, सचिन कांबळे, धनंजय काळे, देवीदास साळवे, सुनील रायकर, शरद धांडे, संतोष गांगुर्डे, रोहित कानडे, सुनील शेजवळ, प्रवीण जाधव, विजय भालेराव, लक्ष्मीकांत लोहारकर, शैलेश उदावंत, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### राष्ट्रीय नेमबाज रुही देवरेचा गौरव

**नाशिक :** नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स अ‍ॅण्ड नॉन-टीचिंग एम्प्लॉई को-ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे आयोजित विद्यार्थी गुणवंत पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज रुही देवरे हिचा विशेष सन्मान करण्यात आला. तिचा सत्कार खासदार राजाभाऊ वाजे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि आमदार सीमाताई हिरे यांच्या हस्ते करण्यात आला. रुही देवरे ही नाशिकची उगवती नेमबाज असून, तिने आपल्या कौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवला आहे. तिला राष्ट्रीय पदक विजेते व प्रशिक्षक संदीप पवार यांचे कुशल मार्गदर्शन लाभले आहे.




### वडाळा परिसरात डॉ. आंबेडकर जयंती

**वडाळागाव :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने सोमवार (दि.१४) रोजी वडाळासह परिसरातील प्रमुख रस्ते व चौकात निळे झेंडे व आकर्षक विद्युत रोषणाई लावून ठिकठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती ठेवून अभिवादन करण्यात आले. वडाळागावातील शिवसेना (उबाठा) शाखेतर्फे डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आला. यावेळी शिवसेना शाखाप्रमुख शेरूभाई शाह, शिवसेना शाखाप्रमुख अय्युब शाह, मुश्ताक शेख, सुंदर साळवे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. साईनाथनगर येथील शिवपंचायतन हनुमान मंदिर मित्रमंडळातर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे प्रमुख अ‍ॅड. संजय बधान व साईनाथनगर मित्रमंडळाचे अध्यक्ष सुधाकर चोपडे, सेवानिवृत्त पोलीस सहाय्यक पोलिस आयुक्त आर. आर. पाटील, दीपक क्षत्रिय, संतोष रेवगडे, स्वानंद कामत, श्याम लोखंडे, हेमंत नागपुरे, अजित आहेर, जयंत कुलकर्णी, चव्हाण, बबलू भालेकर आदी उपस्थित होते. डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन रावते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी समाजसेवक जुबेर हाश्मी आदींसह वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.




### नांदगाव बुद्रुक येथे डॉ. आंबेडकर जयंती

**वासाळी :** मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय नांदगाव बुद्रुक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक भदे दीपक यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. भदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा अभ्यास करून भगवान गौतम बुद्धांची शिकवण तळागाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवली. अस्पृश्यतेची प्रथा संपवण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. स्वातंत्र्य भारताचे पहिले कायदेमंत्री, पहिले न्यायमंत्री भारतीय संविधानाचे शिल्पकार तसेच प्रख्यात कायदे पंडित अशा अनेक अप्रचलित राज्यघटनेतील कालमांबद्दल माहिती देत डॉ. बाबासाहेब किती महान होते हे स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती सांगितली. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद, शिक्षक, इतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### युवकाने गळफास घेत केली आत्महत्या

**अभोणा :** कळवण तालुक्यातील अभोणा पोलिस ठाणे हद्दीतील



आमदर येथील जितेंद्र मोतीलाल भोये ( वय १७ ) या महाविद्यालयीन युवकाने राहत्या घरी अडगळीच्या छतास स्कार्फने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ माजली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची खबर रमेश विष्णू भोये ( वय ४५ ) यांनी अभोणा पोलिसांना दिली. सहायक पोलिस निरीक्षक यशवंत शिंदे यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. नातेवाइकांनी जितेंद्र यांस फासावरून खाली उतरवून औषधोपचारासाठी अभोणा ग्रामीण रूग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. या घटनेची अभोणा पोलिसात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक यशवंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार पी. पी. सोनवणे हे करीत आहेत.

### माजी जि. प. सदस्य गणपतराव कडू यांचे निधन

**घोटी :** इगतपुरी तालुक्यातील आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते तथा आगरी



सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष गणपतराव कडू (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दिवंगत सहकारमहर्षी स्व. मूलचंदभाई गोठी यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय वाटचाल केली. घोटीचे प्रदीर्घ काळ सरपंच, नाशिक जिल्हा परिषदेचे सदस्य, घोटी मर्चंट बँक या पदावर त्यांनी काम केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते सुरेश कडू यांचे ते वडील होत.

## निधन वार्ता

### रायाजी आहेर

**कसबे सुकेणे :** चांदवड तालुक्यातील वडाळीभोई येथील



प्रगतिशील शेतकरी रायाजी धोंडी आहेर (वय ९० वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब आहेर यांचे ते वडील होत.

# वरूथिनी एकादशीस त्र्यंबकेश्वरची मिनी यात्रा

## संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज उटीच्या वारीसाठी चंदन उगाळण्यास सुरुवात

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्री संत निवृत्तिनाथांची उटीची वारी गुरुवारी (दि. २४) होत आहे. चैत्र वद्य एकादशी वरुथिनी एकादशीस श्री संत निवृत्तिनाथांच्या संजीवन समाधीस चंदनाचा लेप म्हणजेच उटी लावतात. चैत्र पंचमी (दि. १८)पासून मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ झाला आहे. त्याच वेळेस उटी तयार करण्यासाठी चंदन उगाळण्यास प्रारंभ झाला आहे.

सलग सात दिवस एकादशीच्या सकाळपर्यंत चंदन उगाळले जाणार आहे. जवळपास ५० किलो चंदनाचे खोड येथे सहानेवर घासून लेप तयार करण्यात येत आहे. हा लेप म्हणजेच उटी संत निवृत्तिनाथ महाराज यांच्या संजीवन समाधीला चैत्र वद्य एकादशीला दुपारी २ वाजेच्या सुमारास भजन, कीर्तनाच्या गजरात लेपन केला जाईल. त्याच दिवशी मध्यरात्रीला विधिवत उतरवण्यात येईल.





पौष महिन्यात होणाऱ्या संत निवृत्तिनाथ यात्रेच्या खालोखाल या यात्रेस गर्दी होत असते. तथापि शासनस्तरावर ही यात्रा दुर्लक्षित राहिली आहे. दर बारा वर्षांनी येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी पूर्वतयारीला वेग आला आहे. त्यासाठी कोट्यवधींचा निधी आवश्यक असलेले आराखडे सादर होत आहेत. सिंहस्थ नियोजनासाठी जमिनी आरक्षित करण्यात येत आहेत. मात्र, दरसाल संत निवृत्तिनाथ महाराज यात्रेस लाखो वारकरी भाविक शेकडो किलोमीटर अंतर पायी चालत येतात आणि दोन-तीन दिवस शहरात मुक्कामी राहतात. या वारकऱ्यांना उभे राहण्यासदेखील जागा शिल्लक राहिलेली नाही. त्यांच्यासाठी मुक्कामाची, पिण्याच्या पाण्याची, शौचालयांची पाहिजे त्या प्रमाणात कायमस्वरूपी सुविधा नाही. सिंहस्थात साधुग्राम तयार होत असते तसे वारकरी दिंडी मुक्कामास जागा उपलब्ध करण्यात येत नाही. दरवर्षी पौष वारीला ५ लाख आणि उटीच्या वारीला दीड-दोन लाख भाविक येत आहेत. त्यांना सुविधा निर्माण करण्याची निकड आहे. मंदिर परिसरात स्वच्छतागृहाअभावी भाविकांची कुचंबणा होत असते. उटीच्या वारीच्या निमित्ताने किमान लाखभर वारकरी भाविक येथे येणार असतील व ते किमान १२ तास येथे थांबणार असतील तर त्यांच्यासाठी स्वच्छता, पाणी आणि जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

### संत निवृत्तिनाथ साक्षात शिवअवतार

उटीच्या मागची संकल्पना पुजारी जयंत महाराज गोसावी यांनी स्पष्ट केली आहे. जयंत महाराज गोसावी हे वंशपरंपरागत पुजारी आहेत. त्यांच्या गोसावी घराण्याची ही २१ वी पिढी येथे सेवा करत आहे. चैत्र पंचमीपासून येथे हरिनाम सप्ताह सुरू झाला आहे. त्याचसोबत ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायणदेखील होत आहे. सकाळ, सायंकाळ कीर्तन, भजन, प्रवचन होत असते. दररोज सायंकाळी प्रसादाची पंगत असते. येथे आलेले वारकरी भाविक, महिला ओव्या म्हणत चंदन उगाळत असतात. सात दिवस उगाळलेले चंदन वस्त्रगाळ केले जाते. त्यामध्ये अत्तर आदी टाकले जाते.

श्री संत निवृत्तिनाथ महाराज हे साक्षात शिवअवतार आहेत. त्यांनी येथे संजीवन समाधी घेतली आहे. वैशाख वणवा सुसहाय्य व्हावा म्हणून संजीवन समाधीस शीतल चंदनाचा लेप लावला जातो. चैत्र वद्य एकादशीस दुपारी दोन वाजता हा सोहळा होतो. तेव्हा सभामंडपात भाविक भजन, कीर्तन करत असतात. पुजारी गोसावी येथे कीर्तन, अंभग सेवा रुजू करतात. त्याच दिवशी मध्यरात्री ११ वाजेच्या सुमारास हा चंदनाचा लेप म्हणजेच उटी उतरवली जाते आणि भाविकांना प्रसादरूपाने वाटली जाते. द्वादशीला रथ निघत असतो. नाथांची पालखी त्र्यंबकराजाच्या मंदिरात जात असते. वारकरी भजन म्हणतात, फुगड्या घालतात. महाराष्ट्रातून वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. पवित्र चंदनाची उटी कपाळी लावून कृतार्थ होत असतात. जवळपास दीडशे वर्षांची ही परंपरा आहे.

# लासलगाव येथे चोरट्यांनी फोडले तीन फ्लॅट

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शहरात अज्ञात चोरट्यांनी गुरुवार दि. १७ रोजी एकाच इमारतीत तीन फ्लॅट फोडल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण तयार झाले आहे. ही घटना गुरुवारी सकाळी साडेआठ ते संध्याकाळी साडेसात वाजेच्या दरम्यान घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. कोटमगाव रोड परिसरातील स्वामी समर्थनगर येथील धनवर्धिनी इमारतीत अज्ञात चोरट्यांनी बंद असलेले तीन फ्लॅट फोडले व दोन फ्लॅटमधून ३ लाख ८२ रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून लंपास केले आहे. घटनेच्या वेळेस तिन्ही फ्लॅटमधील कुटुंबीय कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. याचा फायदा चोरट्यांनी घेतला.

याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात रावसाहेब गोविंदराव पाटील, राहणार धनवर्धिनी बिल्डिंग स्वामी समर्थनगर, लासलगाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रावसाहेब गोविंदराव पाटील यांचा व त्यांच्यावरील अभिषेक गागुर्डे या दोघांचे बंद फ्लॅटचे कुलूप अज्ञात चोरट्यांनी तोडून दोघांच्या घरातील कपाटाचे लॉकर तोडून ३ लाख ८२ रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून चोरट्यांनी पोबारा केला. या दरम्यान सोनम पुत्री (मूळगाव आसाम) यांच्याही बंद फ्लॅटचे कुलूप अज्ञात चोरट्यांनी तोडले, मात्र पुत्री यांच्या फ्लॅटमधून चोरट्याना काहीच मिळाले नाही.

या घटनेची माहिती समजताच निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश पालवे, लासलगावचे सपोनि भास्करराव शिंदे, पोउनि किशोर पवार हे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच या वेळी चोरट्यांचा



**लासलगाव : येथे अज्ञात चोरट्यांनी फ्लॅटमध्ये अस्तव्यस्त केलेला पसारा. (छाया : समीर पठाण)**

शोध घेण्यासाठी श्वानपथक दाखल झाले. मात्र श्वान पथकाने परिसरातील रस्त्यापर्यंतच चोरटे पळाल्याचा माग दाखवला. या घटनेचा पुढील तपास सपोनि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

> लासलगाव शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, आता काही दिवसांनी उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी व नोकरदार वर्गाने बाहेरगावी जाताना मौल्यवान वस्तूची काळजी घ्यावी. घरात कुठलीही मौल्यवान वस्तू ठेवून जाऊ नये व घराच्या दरवाज्याला उच्च प्रतीचे कुलूप लावावे.
> **– भास्करराव शिंदे,** सपोनि, लासलगाव पोलीस स्टेशन



### वेहेळगाव येथील सोसायटीच्या चेअरमनपदी वेणूबाई डोंगरे

**पळाशी : वार्ताहर**

वेहेळगाव (ता. नांदगाव) येथील सोसायटीच्या चेअरमनपदी वेणूबाई डोंगरे, व्हा. चेअरमनपदी श्रावण गोधडे यांची बिनविरोध निवड झाली. आमदार सुहास कांदे यांच्या नेतृत्वाखाली वेहेळगाव सोसायटीची संचालक मंडळाची निवडणूक एक महिन्यापूर्वी बिनविरोध करण्यात आली होती.

चेअरमन व व्हा. चेअरमन पदाच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी एस. बी. औरादकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलविण्यात आली होती. बैठकीस संचालक सुरेश आव्हाड, श्रावण गोधडे, रोहित चांदवडे, बाळू काकड, संतोष गिते, बाळू बोडके, मधुकर डोंगरे, सुलोचना दरगुडे, गोकुळ सांगळे, नीलकंठ सानप, पोपट सानप आदी उपस्थित होते. यावेळी नाशिक मजूर फेडरेशनचे अध्यक्ष गुलाब भाबड, माजी पंचायत समितीचे सभापती मधुकर गिते, माजी सरपंच दादाभाऊ चकोर, माजी ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ डोंगरे, अण्णा डोंगरे, मधुकर डोंगरे, सर्जेराव भाबड, संतोष सानप, अ‍ॅड. राजेंद्र दराडे, अ‍ॅड. सुरेश आव्हाड, अशोक डोंगरे, सुपडू चांदवडे, गोकुळ सांगळे, राजेंद्र बोडखे, रवी केदार, राहुल भाबड, संतोष सानप, हनुमान गिते, अशोक गिते आदी उपस्थित होते.

### दरगुडे वस्तीवर बिबट्याचे दर्शन

**मनमाड : प्रतिनिधी**

मनमाड शहरातील दरगुडे वस्ती हुडको परिसरात बिबट्याचे दर्शन झाले असून, बिबट्याने कुत्र्याची अर्धी शिकार करून पलायन केले आहे. या घटनेने या परिसरात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने या बिबट्याचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून, जंगलात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. याशिवाय अनेक जंगले तोडण्यात आल्याने वन्यप्राणी हे शहरात येऊन आपले पोट भरण्यासाठी शिकार करत आहेत. मनमाड शहरातील दरगुडे वस्ती, हुडको परिसरात बिबट्याचे दर्शन झाले. बिबट्याने एका कुत्र्याची शिकार केली. याआधी देखील मनमाडनजीक असलेल्या नागापूर या ठिकाणी बिबट्याची नर-मादी जोडी आढळून आली होती. शहराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात वनविभागाचे जंगल आहे. मात्र, या ठिकाणी आता पाहिजे तसे पाणी आणि शिकार नसल्याने बिबट्यासह इतर वन्यप्राण्यांचा शहरात मुक्त संचार बघायला मिळत आहे.

### येवला शहरात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त सहा तास मिरवणूक

#### ढोल-ताशांच्या गजरात थिरकले युवक

**येवला : प्रतिनिधी**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. जयंती उत्सव समितीतर्फे आकाश भालेराव, आकाश झाल्टे, सुभाष



गांगुर्डे, सौरभ जगताप, समाधान पगारे, सिद्धार्थ निकम आदींच्या हस्ते भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला. बाळासाहेब लोखंडे, वसंत पवार, माजी नगरसेवक दत्ता निकम, दीपक लोणारी, गोटू मांजरे, संतोष खैरनार आदींचाही सत्कार करण्यात आला. त्यानंतर मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. तब्बल सहा तास मिरवणूक चालली. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अ‍ॅड. माणिकराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, युवानेते योगेश सोनवणे, सुदाम सोनवणे यांनी जयंती उत्सवाला भेट दिली. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आकाश भालेराव, उपाध्यक्ष आकाश झाल्टे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# सफाई कर्मचाऱ्यावर आग विझवण्याची वेळ

## मनमाड नगरपालिकेकडे अत्याधुनिक अग्निशमन वाहने, मात्र कर्मचारी संख्या अपुरी

**मनमाड : प्रतिनिधी**

**शहरातील वेलंकनीनगर कॅम्प भागातील पाण्याच्या टाकीजवळ इलेक्ट्रिक डीपीजवळील वाळलेल्या गवताला आग लागून परिसरातील चार ते पाच घरांना आग लागून अनेक घरांतील कूलर, फर्निचर व इतर सामान आगीच्या भक्ष्यस्थानी खाक झाले.**

दरम्यान, मनमाड नगरपालिकेकडे असलेली अत्याधुनिक अग्निशमन गाडीवर कर्मचारीच नसल्याने सफाई कर्मचारी व रुग्णवाहिका चालकाची आग विझविण्यासाठी मदत घेण्याची वेळ आली. यामुळे नगरपालिकेचा ढिसाळपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. भविष्यात जर मोठी आग लागली आणि यात जीवितहानी



झाली तर याला जबाबदार कोण, असाही सवाल उपस्थित केला जात आहे.

मनमाड शहरातील वेलकांनीनगर कॅम्प भागातील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या मोकळ्या जागेत वाळलेल्या गवताला आग लागली. ही आग इतकी भयानक होती की काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण करून आजूबाजूला असलेल्या घरांना आपल्या चपेट्यात घेतले. याशिवाय सेंट झेवियर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मागील बाजूला असलेल्या मोकळ्या मैदानातदेखील आग पसरली. अग्निशमन दलाला फोन केला तोपर्यंत स्थानिक नागरिकांनी पाणी, वाळू टाकून आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. अग्निशमन दलाचे गाडी आली, मात्र यावर कर्मचारीच नसल्याने सफाई कर्मचारी व रुग्णवाहिका कर्मचारी यांनी आग विझविण्यासाठी मदत केली. अत्याधुनिक फायर फायटर मशीन असतानादेखील कर्मचारी नसल्याने या गाड्या असून अडचण नसून खोळंबा अशा गत आहे. ही आग कशाने लागली याचा अद्याप उलगडा झाला नसला तरी या भागात असलेली डीपीमुळे मागेही आग लागल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

मनमाड नगर परिषदेकडे अग्निशमन दलात अत्याधुनिक अशा फायर फायटर गाड्या आहेत. छोट्या गल्लीत आग लागली तर या ठिकाणी नेण्यासाठी छोट्या गाड्या व फायर फायटर असणाऱ्या अत्याधुनिक मोटारसायकलदेखील आहेत. मात्र अग्निशमन दलाच्या विभागात एकही कर्मचारी हा फायर सेफ्टी कोर्स किंवा त्या क्षेत्रातील डिग्री केलेला नाही. अग्निशमन दलाच्या गाडीवर कधी सफाई कर्मचारी तर कधी नगरपालिकेतील इतर कर्मचारी ड्युटी करतात.

### घिबली अ‍ॅपची कमाल मशालच्या जागी कमळ!

**मनमाड : आमिन शेख**

सध्याचा जमाना डिजिटलचा आहे. दररोज नव - नवीन अ‍ॅप



उदयास येत आहेत. यातले अनेक अ‍ॅप हे मनोरंजक आहेत. या अ‍ॅपचे अनेकांना वेड लागते. असेच घिबिली नावाचे अ‍ॅप सद्या ट्रेन्डिंगला आहे. आपले फोटो टाकायचे आणि ते कार्टूनमध्ये इमेजेस तयार करून देतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही या अ‍ॅपने भुरळ घातली मात्र हे अ‍ॅप देखील भाजपचे आहे की काय? असा सवाल आता हे अ‍ॅप वापरणाऱ्या व्यक्तीकडून केला जात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटांच्या कार्यकर्त्यांनी आपल्या मुलीच्या गळ्यात मशाल निशाणी असलेली मफलर टाकली मात्र घिबिलीने चक्क भाजपचे चिन्ह कमळ असलेले कार्टून तयार करून दिल्याने आश्चर्याचा धक्का बसला. घिबिलीने चक्क भाजपचे चिन्ह कमळ निशाणी असलेली इमेज दिली यामुळे या कार्यकर्त्यांने हे अ‍ॅप भाजपचे आहे की काय? असा सवाल सोशल मीडियावर उपस्थित केला आहे.

## महत्त्वाचे

### कुमावत सोसायटीची कार्यकारिणी जाहीर

**सिन्नर :** कुमावत विकास सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची शिर्डी येथे झालेल्या कार्यक्रमात सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्षपदी प्रफुल्ल कुमावत, नाशिकच्या सचिवपदी रवींद्र बैताडे, तर जिल्हा निहाय उपाध्यक्षांची निवड करण्यात आली. साहेबराव कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर उपजिल्हाधिकारी नितिन मुंडावरे, सहसचिव पंडितराव कुमावत, झोन अध्यक्ष भाऊसाहेब परदेशी, महिला सचिव सौ. भारतीताई कुमावत आदी उपस्थित होते. समाजात आपण कुठेही कमी पडता कामा नये. समाजातील प्रत्येक थरापर्यंत विकास संस्थेने पोहचले पाहिजे. समाजाला अशा संस्थांकडून अपेक्षा असतात, समाजोपयोगी कामे केली पाहिजे, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे यांनी केले. सहसचिव पंडितराव कुमावत, झोन अध्यक्ष भाऊसाहेब परदेशी यांनी मनोगत व्यक्त करून नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महीला सचिव सौ. भारती कुमावत यांच्या 'विवाहापलीकडील सत्य' पुस्तकाचे प्रकाशन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन सचिव अशोकराव मोराडे यांनी केले. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे नाशिक जिल्हा कुमावत बेलदार समाजोन्नती मंडळ तसेच उन्नती मंडळ उपशाखा सिडको यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्रातून कुमावत विकास संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, समाज बाधंव व महिला मोठ्या प्रमाणात हजर होते. **नवनिर्वाचित कार्यकारिणी-** अध्यक्षपदी प्रफुल्ल कुमावत, नाशिकच्या सचिवपदी रवींद्र बैताडे, वरिष्ठ उपाध्यक्षपदी शिवाजीराव कारवाळ, संजय परदेशीर, उपाध्यक्षपदी नानाभाऊ कुमावत, लक्ष्मनराव कुमावत, सहसचिवपदी पंडितराव कुमावत, युवा अध्यक्ष स्वप्नील नाईक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष साहेबराव कुमावत, उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे व मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.



### चर्मकार समाजातर्फे बाबासाहेबांना अभिवादन

**सिन्नर :** येथील संत रविदासनगर, पिंपरी नाका येथे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामित्र परिवाराचे माजी नायब तहसीलदार दत्ता वायचळे, सिन्नर विधानसभा संपर्कप्रमुख पिराजी पवार, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब तुपे, सचिव भाऊसाहेब शिलावट, केशव आहेर, शहराध्यक्ष सचिन आहेर, युवा तालुकाध्यक्ष तेजस साबळे, किशोर आहिरे, नरेंद्र आहेर, भाऊसाहेब ठाकरे, नामदेव काकविपुरे, बाळू आहिरे, विकी आहिरे, पवन आहेर, गणेश डावरे, समाधान भदाणे, देवा आहिरे, रंजना आहिरे, जयश्री आहिरे, हिराबाई ठाकरे, राणी आहिरे, सुनीता आहिरे, ताराबाई आहेर, भारती ठाकरे उपस्थित होते.

### सोनांबे विद्यालयात मोफत आरोग्य शिबिर



**सिन्नर :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय काम करीत असून, सिन्नर तालुका मोतीबिंदूमुक्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांनी केले. सोनांबे येथील जनता विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार रुग्णालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. डॉ. राजेंद्र गोऱ्हे यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष नंदू पाटील पवार होते. व्यासपीठावर सरपंच जनार्दन पवार, शालेय समिती सदस्य तथा माजी जि. प. सदस्य केरू पवार, निवृत्ती बोडके, कचरू शिंदे, गजेंद्र सातपुते, भाऊसाहेब पवार, चंद्रभान पवार, संतोष पवार, रमेश पवार, देवनदी खोरे पतसंस्थेचे चेअरमन बी. एम. पवार, पालक संघाचे उपाध्यक्ष नितीन पवार, शिबिर समन्वयक रवी सोनवणे, शिबिरातील तज्ज्ञ डॉ. नारायण भताने, डॉ. शिवानी हळसे, महेंद्र घोटेकर, किरण पवार, मरियम गावित, प्रतिभा गावित आदी उपस्थित होते.
मराठा विद्या प्रसारक समाज संस्था सातत्याने शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात काम करीत असून, समाजाला सातत्याने त्याचा फायदा होत असल्याचे नंदू पाटील पवार यांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना सांगितले. मुख्याध्यापक प्रभाकर फटांगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख दीपक भालेराव यांनी केले. आभार पर्यवेक्षक दिगंबर जाधव यांनीन मानले.यावेळी सोनारी, सोनांबे, हरसुले, वडगाव, औंढेवाडी, लोणारवाडी, खापराळे आदी ठिकाणावरून आलेले रुग्ण, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अरुण सावंतांचा सेवापूर्ती सोहळा



**ओझर :** ओझर येथील मविप्र संचलित माधवराव बोरस्ते विद्यालयाचे कलाध्यापक अरुण सावंत आपल्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. भास्कर गार्डन कोकणगाव, ता. निफाड येथे झालेल्या या सेवापूर्ती सोहळ्यासाठी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर प्रमुख मान्यवर अध्यक्ष डॉ. राहुल ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, विश्वासराव मोरे, डी. बी. मोगल, संचालक शिवाजी गडाख, प्रवीण जाधव, ॲड. लक्ष्मण लांडगे, डॉ. सयाजीराव गायकवाड, अमित बोरसे, महिला संचालिका शोभा बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, डॉ. एस. के. शिंदे, सी.डी. शिंदे, जगन्नाथ निंबाळकर, साहित्यिक लक्ष्मण महाडिक, रवींद्र मालुंजकर, संदीप देशपांडे, प्रकाश होळकर, शाळा समितीचे अध्यक्ष भास्करराव शिंदे, व्यवस्थापनचे अध्यक्ष प्रकाश महाले, सर्व सदस्य मुख्याध्यापक सोपान वाटपाडे, अभिनवच्या मुख्याध्यापिका वनिता शिरसाठ, उपमुख्याध्यापक धैर्यशील पाटील, पर्यवेक्षक दशरथ शिंदे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका शीतल आहेर व गीतमंचाने स्वागत गीताने स्वागत केले. प्रास्ताविकात मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांनी सेवापूर्ती कलाशिक्षक अरुण सावंत यांचा परिचय करून दिला. प्रमुख अतिथींचा सत्कार विद्यालयाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सविता गायखे, डॉ. एस. के. शिंदे, उपसभापती डी. बी. मोगल, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले.

# एचएएल कामगार संघटना निवडणुकीसाठी आज मतदान

## निवडणूक रिंगणातील दोन्ही पॅनलने प्रचार रॅली काढून केले शक्तिप्रदर्शन



**ओझर : वार्ताहर**

एचएएल कामगार संघटनेच्या ३१ जागांसाठीच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी आज दिनांक १९ रोजी मतदान होत असून, मतदानात संघटनेचे एकूण २८१२ सभासद आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, निवडणूक रिंगणात असलेल्या सत्ताधारी गटाच्या श्री आपला जागृती पॅनल व विरोधी गटाच्या श्री श्रमशक्ती पॅनलतर्फे काल प्रचार रॅली काढून त्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्यात आले.

निवडणूक रिंगणात असणाऱ्या सत्ताधारी गटाचे नेते विद्यमान सरचिटणीस संजय कुटे, अध्यक्ष अनिल मंडलिक यांच्या नेतृत्वाखालील श्री आपला जागृती पॅनल व विरोधी गटाचे नेते माजी सरचिटणीस सचिन ढोमसे व माजी सहचिटणीस गिरीश वलवे यांच्या नेतृत्वाखालील श्री श्रमशक्ती पॅनल यांच्यात समोरासमोर सरळ पण तुल्यबल लढत होत आहे. या निवडणुकीत काल सायंकाळपर्यंत गेल्या तीन दिवसांत झालेल्या चौकसभा, मोठी प्रचारसभा व ठिकठिकाणी झालेल्या मेळाव्यात श्री आपला जागृती पॅनल व श्री श्रमशक्ती पॅनलतर्फे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले तसेच झालेले आरोप खोडून काढण्यासाठी झालेल्या दोन्ही पॅनलच्या उत्तरसभेत आरोपांना उत्तर देत ते खोडून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. आपला पॅनल निवडून आल्यानंतर कामगार हिताचे काय काय कामे करणार तसेच २०२७ मध्ये होणारा वेतन करार, एचएएल कंपनी महारत्न कंपनी झाल्यामुळे कामगारांना त्याचे फायदे मिळवून देण्याबाबत सविस्तर सांगण्यात आले. सत्ताधारी गटाने गेल्या तीन वर्षांत केलेल्या कामाचा सविस्तर लेखाजोखा मांडला. काल दोन्ही पॅनलच्या वतीने वेगवेगळ्या वेळी भव्य प्रचार रॅली काढून शक्तिप्रदर्शन केले.

# मांधा येथील शेतकरी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी

**सुरगाणा : प्रतिनिधी**

तालुक्यातील उंबरठाण वन क्षेत्रातील मांधा येथील एका शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला. शेतकरी गंभीर जखमी झाला आहे.



याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी उंबरठाण यांच्याकडून समजले की, सीताराम मलू ठाकरे (वय ४४, रा. मांधा) हा शेतकरी काल ता. १८/४/२०२५ रोजी पहाटे उठून दूध डेअरीत दूध भरण्याकामी गेला होता. तेथून परतल्यानंतर मालकीच्या जमिनीत घराजवळच्या शेतात सकाळी सहा ते साडेसहा वाजेच्या सुमारास घरकुलाचा पाया खोदकाम करीत असताना बिबट्याने अचानक झडप मारीत मानेवर, पायावर, डोक्यावर हल्ला चढवला. नखांनी ओरबाडून कानाचा व मानेचा चावा घेतला. रक्तस्राव सुरू झाल्याने शेतकरी रक्तबंबाळ झाला. बचावाकरिता आरडाओरडा केल्याने घराशेजारील नातेवाईक लाठ्याकाठ्या घेऊन आल्याने बिबट्याने जंगलाच्या दिशेने धूम ठोकल्याने अनेकांचा जीव भांड्यात पडला. नातेवाइकांनी तत्काळ उपचारासाठी पांगारणे येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे तात्पुरते उपचार झाल्यावर सुरगाणा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी नाशिक येथील जिल्हा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. उंबरठाण वनपरिक्षेत्र अधिकारी गणेश माळी यांनी घटनेची तत्काळ दखल घेत रुग्णाची सुरगाणा ग्रामीण रुग्णालयात भेट घेत पाहणी केली.

# सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिरात बक्षीस वितरण

**सिन्नर : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिरात बाल चिमुकल्यांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नामदेव लोंढे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर संस्थेचे सेक्रेटरी नामदेव लोणारे, संचालक रामनाथ बलक, मधुकर खर्जे, मंगल झगडे, माजी संचालक अशोक महात्मे, संकुलाचे प्राचार्य एम. एन. देशमुख, हॉटेल संस्कृतीचे संचालक शंकर उबाळे, उज्वला लोंढे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. संगीता राजगुरू यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत, आंतरशालेय स्पर्धा आणि शाळाबाह्य स्पर्धा यातील विद्यार्थ्यांच्या सहभाग आणि यश संपादन केल्याबाबतचा लेखाजोखा मांडला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते बालवाडीच्या चिमुकल्यांपासून तर प्राथमिक विभागातील सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. तसेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट उपस्थितीबद्दल स्वाती गवळी आणि उत्कृष्ट नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी दीपारती आहेर या शिक्षिकांना गौरवण्यात आले. संस्था शिक्षक आणि पालक यांनी एकजूट केली की, विद्यार्थ्यांची प्रगती नक्कीच होते, असे मत संचालक रामनाथ बलक यांनी व्यक्त केले. नामदेव लोणारे यांनी शाळेच्या गुणवत्तेचे कौतुक करत शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संस्था आणि शाळेतील सर्व शिक्षकवृंद बांधील राहतील, अशी ग्वाही दिली. शंकर उबाळे यांनी शालेय कामकाजाचे कौतुक करत ११००० रुपये देणगी जाहीर केली. पोलीस उपनिरीक्षक उज्ज्वला लोंढे यांनी आहार, खेळ यांचे महत्त्व सांगत अभ्यासाचेही महत्त्व अत्यंत खुबीने विद्यार्थ्यांना पटवून दिले आणि मुलांना गोड खाऊ म्हणून चॉकलेट दिले. सूत्रसंचालन अरविंद लोणारे यांनी केले. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे यादी वाचन विजया इंगळे आणि दीपारती आहेर यांनी केले. रोहिणी मिठे यांनी आभार मानले.

# ६०० रुग्णांनी घेतला मोफत आरोग्य शिबिराचा लाभ, ७५ जणांनी केले रक्तदान

## सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त सिन्नरमध्ये सामाजिक उपक्रम



**सिन्नर : प्रतिनिधी**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कन्या तथा जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सिन्नर शहरासह तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सिन्नर तालुक्यातील देवपूर, सोमठाणे, नायगाव, पांढुर्ली, ठाणगाव, वावी, दापूर या प्राथमिक आरोग्य केंद्रांबरोबरच सिन्नर ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात एकाच वेळी मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभरात १६०० हुन अधिक गरजू रुग्णांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. सिन्नर ग्रामीण रुग्णालयात ३०० बाह्य रुग्ण तपासणी करण्यात आली. ११५ जणांच्या रक्त चाचण्या, ६८ जणांचे डोळे तपासणी, ५५ जणांची इसीजी तर ६० जणांचे एक्स-रे काढण्यात आले. याशिवाय ८ मोतीबिंदू रुग्णांची तपासणी करण्यात आली. ग्रामीण भागात ११५१ रुग्णांनी सेवा घेतली.

वाढदिवसाचे औचित्य साधून गरजू रुग्णांना रक्त सहजगत्या उपलब्ध व्हावे यासाठी ज्वालामाता लॉन्स येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी, संवेदनशील नेतृत्व आणि नव्या पिढीच्या उमेदीचं प्रतीक ठरणाऱ्या सीमंतिनी कोकाटे यांनी यावेळी त्यांनी स्वतः रक्तदान करून जनतेला कृतीतून संदेश दिला. दिवसभरात ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्याचप्रमाणे सिन्नर बसस्थानकाजवळील संपर्क कार्यालयाजवळ राजस्व अभियान राबवण्यात आले. ज्यामध्ये नागरिकांना महसूल विभागाच्या योजनांची माहिती, मार्गदर्शन आणि सेवा देण्यात आली. दरम्यान, दुध उत्पादक शेतकऱ्यांना गायीचे दूध काढणे सोपे व्हावे, तसेच त्यांची गैरसोय टाळण्यासाठी २७ हजार रुपये किमतीचे मिल्किंग मशीन शेतकऱ्यांना केवळ १९ हजार रुपये इतक्या सवलतीच्या दरात वाटप करण्यात आले. ५ मेपर्यंत शेतकऱ्यांसाठी या मशीनची बुकिंग करण्याची सुविधा सुरू ठेवण्यात आली आहे.

### शेकडो जणांनी भेट दिली स्पर्धा परीक्षेची पुस्तके

सिन्नर शहरातील ज्वालामाता लॉन्स येथे १६ एप्रिल रोजी कोकाटे यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. शुभेच्छापर भेट म्हणून त्यांनी स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट देण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला कार्यकर्त्यांनी कृतीतून प्रतिसाद दिला. त्यामुळे शेकडो पुस्तके यावेळी जमा झाली. ही पुस्तके स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना उपयोगी पडणार आहेत.



# डीजीपी ऑफिस क्लार्कपदी पूनम कांगणेची निवड, ठाणगाव ग्रामस्थांकडून सत्कार

**सिन्नर : प्रतिनिधी**

ठाणगाव येथील प्रगतशील शेतकरी शिवाजी कांगणे यांची कन्या कु. पूनम शिवाजी कांगणे हिची

डीजीपी ऑफिस क्लार्कपदी निवड झाल्याबद्दल ग्रामपंचायत ठाणगाव व ठाणगाव ग्रामस्थांच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.

ग्रामस्थांनी आपल्या यशाची दखल घेत गावच्या वतीने सत्कार केल्याबद्दल पूनम कांगणे हिने ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले. तसेच आपल्या या यशात आई-वडील, परिवार व मार्गदर्शक शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. सदर पदापर्यंत पोचण्यासाठी व माझे मनोबल वाढविण्यासाठी माझ्या आई - वडिलांनी सतत प्रेरणा दिल्याचे पूनमने सांगितले. मिळालेल्या या संधीचा व पदाचा वापर मी प्रामाणिकपणे करून माझ्या गावाचे व महाराष्ट्राचे नाव रोशन करेन, अशी ग्वाही दिली. यावेळी अटल फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष रामदास भोर व गावचे प्रतिष्ठित नागरिक सोमनाथ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ठाणगावचे सरपंच नामदेव शिंदे, अटल फाउंडेशन जिल्हाध्यक्ष व भारतीय जनता पार्टी तालुका सरचिटणीस रामदास भोर, उपसरपंच विलास मोरे, सोसायटी माजी चेअरमन अमित पानसरे, ग्रामपंचायत सदस्य मोहन आव्हाड, शिवाजी कांगणे, प्रगतशील शेतकरी वसंत आव्हाड, संजय कांगणे, बाबू कांगणे, मच्छिंद्र शिंदे, पंढरी शिंदे, सोमनाथ शिंदे, सुरेश शिंदे, शांताराम शिंदे, के. एल. शिंदे, पिंटू कागणे, अनिल शिंदे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिस्त लावा

## नामदेव कोतवाल यांची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

शासकीय कार्यालयात विविध कार्यालयीन वेळेत तालुक्यातील शासनाच्या अनेक कार्यालयांत अधिकारी, कर्मचारी गैरहजर राहतात. पर्यायाने कामानिमित्त आलेल्या नागरिकांना तासन्तास ताटकळत उभे राहावे लागते. या बोकाळलेल्या बेशिस्तीला शिस्त कोण लावणार? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी शहराध्यक्ष नामदेव कोतवाल यांनी केला आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागातील असो की, शहरांतील नागरीकांना कुठल्या ना कुठल्या कामासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते. परंतु संबंधित कर्मचारी व अधिकारी जागेवर सापडत नाही. ही बाब नित्याचीच बनली आहे.

शासनाने दुपारची वेळ जेवणासाठी अर्धा तासाची निश्चित केलेली आहे. प्रत्यक्षात जेवणानंतर दीड-दीड, दोन-दोन तास कर्मचारी गायब होतात.. तर काही कर्मचारी चहाच्या गाडीवर, पानटपरी, हॉटेलवर व इतरत्र चकाट्या मारताना दिसतात.

ग्रामीण भागातील २५/ ३० किलोमीटरवरून येणारा सामान्य शेतकरी शासकीय कार्यालयात आपले काम वेळेवर होण्यासाठी वेळेत पोहोचतो.

पण थोडा जरी त्याला पोहोचण्यास उशीर झाला तर लंच टाइमचा जबर फटका बसतो. आणि तासन्तास संबंधित टेबलवरच्या सरकारी बाबूच्या प्रतीक्षेत राहावे लागते. तसेच काही स्थानिक कर्मचारी दुपारी जेवणासाठी घरी जातात.

त्यात दुपारी घरी जाण्यासाठी बायोमेट्रिकची अडचण नसल्याने रामभरोसे पद्धतीने कार्यालयात येतात. पर्यायाने जवळपास सर्वच शासकीय कार्यालयांत येण्या-जाण्याच्या वेळा पाळल्या जात नाही. तालुका पंचायत समिती, भूमिअभिलेख कार्यालयात तर प्रचंड अनागोंदी आहे. संबंधित खात्यातील विभागप्रमुखांचे दुर्लक्ष असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहे. ठेकेदारांच्या गर्दीत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या व गाऱ्हाणीसाठी भेटणेही मुश्कील बनले आहे. भेटले तर धड बोलत नाही व फक्त टोलवाटोलवी व थातूरमातूर उत्तराचा अनुभव रोजच तालुक्यातील नागरिकांना येत आहे. अशा कामचुकार व बेशिस्त दांडीबहाद्दर अधिकारी व कर्मचाऱ्यांना आळा घालण्याची गरज असून, त्यांना शिस्त लावण्याची मागणी कोतवाल यांनी केली आहे.

# आरोग्य, नेत्ररोग तपासणी शिबिराचा गरजूंनी घेतला लाभ

## ब. ना. सारडा विद्यालयात शतकमहोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेले आरोग्य व नेत्ररोग तपासणी शिबिर ही एक सामाजिक जाणीव आहे. शाळा आणि समाज हे दोन्ही घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. नागरिकही एवढ्या मोठ्या संख्येने आरोग्य तपासणी शिबिरात सहभागी होत आरोग्याप्रति जागरूकता दाखवत आहेत. आरोग्याप्रति जागरूकता असणे ही देशाच्या उत्तम नागरिकाचे लक्षण असल्याचे प्रतिपादन डॉ. सारंग इंगळे यांनी केले.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या शेठ ब. ना. सारडा विद्यालयाच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त व श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य व नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. इंगळे बोलत होते. यावेळी मंचावर ना. शि. प्र. मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष विवेक जुन्नरे, विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष बापूसाहेब पंडित, श्री गुरुजी रुग्णालयाचे डॉ. अभय शुक्ल, प्राचार्य गोरक्षनाथ बागुल, शिक्षक प्रतिनिधी कांतीलाल राठोड उपस्थित होते.

बापूसाहेब पंडित यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार-प्रसार हे संस्थेचे धोरण आहे, या प्रेरणेतूनच शतकमहोत्सवी वर्षानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

डॉ. अभय शुक्ल यांनी श्री गुरुजी रुग्णालय समाजासाठी देत असलेल्या विविध सेवांची माहिती देताना, रुग्णालयात सर्व प्रकारची चिकित्सा उपचार उपलब्ध असून, नाममात्र दरात समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवेच्या माध्यमातून पोहोचत असल्याचे सांगितले.



यावेळी अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. जयेश ढाके, नाक, कान, घसा तज्ज्ञ डॉ. तेजश्री जोशी, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया देवरे, जनरल फिजिशियन डॉ. अभय शुक्ल, कॅन्सरतज्ज्ञ डॉ. कविता जाधव हे तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर उपस्थित होते.

कांतीलाल राठोड यांनी प्रास्ताविक केले. लहानबाई सांगळे यांनी सूत्रसंचालन केले.

मनीषा दोंड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य गोरक्षनाथ बागुल यांनी आभार मानले.

### या आजारांची तपासणी

नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिरात सहभागी होत ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, नेत्ररोग, ऑक्सिजन तपासणी, इ. सी. जी. आदी तपासण्या करून घेत तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घेतले. आणि विद्यालयाने आयोजित केलेल्या या आरोग्य तपासणी शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



« सत्ताधारी पक्ष समाजात तेढ निर्माण करतात « पान ५



» राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्षपदी दोंदे » नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे



### कॉलेज रोडवर अतिक्रमण विभागाची कारवाई

**पंचवटी :** मनपाच्या पश्चिम अतिक्रमण विभागाच्या वतीने कॉलेज रोडवर अतिक्रमण मोहीम राबवून हातगाड्या तसेच इतर साहित्य जमा करण्यात आले. मनपाच्या अतिक्रमण विभाग उपायुक्त आशा गायकवाड यांच्या आदेशान्वये पश्चिम विभाग विभागीय अधिकारी चंदन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज रोड परिसरात अतिक्रमण मोहीम राबविण्यात आली. यात विजय दाबेली येथील हातगाड्या उचलण्यात आल्या. तसेच रस्त्यावर अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यात आले. यात एक ट्रक साहित्य जप्त करण्यात येऊन ते आडगाव येथील गोदामात जमा करण्यात आले. अतिक्रमण मोहिमेत पश्चिम विभाग अतिक्रमणप्रमुख बागुल तसेच जगन्नाथ हमारे, बापू लांडगे, संजय सूर्यवंशी, संतोष पवार, जावेद शेख, सुनील कदम आदींसह पोलिस विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### एमएचटी-सीईटीला ९५ टक्के उपस्थिती

**नाशिक :** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी आयोजित एमएचटी-सीईटीअंतर्गत सध्या सुरू असलेल्या पीसीबी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) ग्रुपची परीक्षा गुरुवारी (दि. १७) संपली. एकूण तेरा सत्रांमध्ये झालेल्या या परीक्षेत सरासरी ९५ टक्के विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्यातील नऊ परीक्षा केंद्रांवर झालेल्या परीक्षेसाठी पहिल्या दिवसापासून उपस्थितीचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे. दि. ९ ते दि. १७ दरम्यान झालेल्या सुमारे २२ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी २० हजार विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. राज्यस्तरावर आयोजित या परीक्षेच्या पहिल्या टप्प्यात पीसीबी ग्रुपच्या परीक्षा गुरुवारपर्यंत पार पडल्या.

### तडीपाराविरोधात सातपूरला गुन्हा दाखल

**सिडको :** शहर व ग्रामीण हद्दीतून सहा महिन्यांसाठी तडीपार केलेल्या संशयित आरोपी कुणाल विष्णू भालेराव उर्फ मक्या (वय २५, रा. महादेवनगर, सातपूर, नाशिक) असून, हा सातपूर गावातील बसस्टँडजवळ फिरताना सातपूर पोलिसांना आढळून आला. यावेळी कुणाल भालेराव याची चौकशी केली असता पोलीस उपायुक्त, परिमंडळ २, नाशिक शहर यांनी दिलेल्या दि. १४ नोव्हेंबर २०२७ च्या आदेशानुसार भालेराव याला ७ फेब्रुवारीपासून पुढील ६ महिन्यांसाठी नाशिक शहर व जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता त्याने आदेशाचे उल्लंघन करत शहरात प्रवेश केला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार खरपडे करत आहेत.

# गाडीने ब्रेक मारताच लोखंडी पाइप थेट रस्त्यावर!

धोकादायक वाहतूक सुरूच; मोठी दुर्घटना टळली



**सातपूर : प्रतिनिधी**

उड्डाणपुलावर लोखंडी सळयांच्या ट्रकला धडकून झालेल्या अपघातात नऊ ते दहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काही दिवस धोकादायक वाहतूक होऊ नये म्हणून आरटीओ पोलिस विभागाने मोहीम राबविली. मात्र, तरीही अजूनही लोखंडी सळयांची वाहतूक सुरूच आहे. काल अशोकनगर येथे लोखंडी सळया घेऊन जाणाऱ्या टेम्पोतील पाइप थेट रस्त्यावर कोसळले. नशीब बलवत्तर म्हणून मोठी दुर्घटना टळली. एमएच १५ जीव्ही ६२४७ क्रमांकाची मालवाहतूक गाडी, चालक अर्जुन भारद्वाज हे अंबड-लिंक रोडवरून अशोकनगर रोडमार्गे गंगापूर रोडकडे घेऊन जात जात होती. गाडीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त पाइप लादण्यात आले होते. अशोकनगर बसथांब्यावर अचानक समोरील रिक्षाचालकाने ब्रेक मारल्याने भारद्वाज यालाही ब्रेक द्यावा लागला. त्यामुळे गाडीत लादलेले सर्व पाइप्स थेट रस्त्यावर कोसळले. सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अशा प्रकारची बेपर्वा व नियमबाह्य वाहतूक नाशिक शहरात खुलेआम सुरू असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहे. वाहतूक पोलिसांकडून योग्य कारवाई होत नसल्याने वाहनचालक बेधडकपणे धोकादायक मालवाहतूक करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

# नाशिक शहरात आगीचे तांडव

## सिडको, सातपूर, गंजमाळ, इंदिरानगरमध्येही आगीच्या घटना

**पंचवटी : प्रतिनिधी**

**शहरामध्ये गुरुवारी मध्यरात्री आगीचे तांडव झाल्यामुळे चांगलीच खळबळ उडाली. नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे तपोवन वगळता इतर ठिकाणी लागलेल्या आगी तातडीने नियंत्रणात आणण्यात यश मिळालेले आहे. त्यामुळे शहरातील या अग्निशमन केंद्राच्या जवानांचे कौतुक केले जात आहे. तपोवनमध्ये लोकेश ल्यमीनेटेस्ट या प्लायवूड दुकानाला लागलेली आग ही तब्बल ९ तासांपेक्षा अधिक काळ सुरूच होती. महानगरपालिकेसह इतर अग्निशमन दलाच्या गाड्यांनी शेकडो फेऱ्या पूर्ण केल्या.**

- **तपोवनातील आगीवर नऊ तासांनी नियंत्रण**
- **अग्निशमन बंबांच्या शंभराहून अधिक फेऱ्या**
- **उन्हामुळे लागली चालत्या गाडीला आग**
- **अग्निशमन दलाच्या जवानांचे कौतुक**





गुरुवारची रात्रही नाशिकमध्ये अग्नितांडवाने धुमाकूळ घातल्यामुळे चांगलीच खळबळ उडाली. सर्वप्रथम मध्यरात्रीच्या सुमारास नाशिक शहरातील तपोवन परिसरामध्ये असलेल्या मारुती वेफर्स शेजारी असलेल्या प्लायवूडच्या दुकानाला अचानक आग लागली. सर्वसाधारण पावणेबारा वाजेच्या सुमारास ही आग लागल्यानंतर तातडीने अग्निशमन दलाला याची माहिती मिळाली आणि शहरातील मुख्यालयासह पंचवटी, सिडको, सातपूर, नाशिक रोड या विभागीय कार्यालयांतील अग्निशमन केंद्राच्या बंबांसह अन्य छोट्या-मोठ्या गाड्या या ठिकाणी पाठविण्यात आल्या. नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी या रौद्ररूप धारण केलेल्या आगीवर तातडीने नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. परंतु या प्रयत्नांना काही यश मिळाले नाही. तातडीने या ठिकाणी असलेला साठा हलविण्यासाठी म्हणून मध्यरात्री जेसीबीचा वापर करण्यात आला. या ठिकाणी जेसीबीच्या माध्यमातून असलेला साठा हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु आगीचे रूप मोठ्या प्रमाणात असल्याने त्यामध्ये देखील अग्निशमन दलाला यश आले नाही. त्यानंतर नाशिक महानगरपालिकेच्या सर्व अग्निशमन केंद्रावरील गाड्यांसह पिंपळगाव बसवंत, सिन्नर एमआयडीसी, जीआयएसएफ, आयएसपी या परिसरातील अग्निशमन दलाच्या गाड्यादेखील मदतीसाठी बोलविण्यात आल्या होत्या. सकाळी पावणेनऊ वाजेपर्यंतदेखील ही आग सुरूच होती. सातत्याने या ठिकाणी आग विझवण्याचे काम हे अग्निशमन दलाचे जवान करत होते. मात्र, या काळामध्ये काही प्रमाणामध्ये आग ही शांत झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी सातत्याने आपले प्रयत्न सुरूच ठेवले.

**इंदिरानगरला वाइनशॉपला आग**

शहरातील काही भागांमध्ये देखील आग लागल्याच्या घटना या घडत होत्या. इंदिरानगर परिसरामध्ये असलेल्या ओम सुपर मार्केट या परिसरात वाइन शॉप आहे. या वाइन शॉपच्या बेसमेंटमध्ये धूर निघत असल्याची तक्रार मिळाल्यानंतर धावपळीमध्ये तातडीने अग्निशमन दलाच्या जवानांनी इंदिरानगरकडे धाव घेत या ठिकाणी जाऊन ही आग आटोक्यात आणली.

**चालत्या गाडीला आग**

तिसरी घटना शहरातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गावर घडली. या ठिकाणी फाळके स्मारकाजवळ मध्यरात्रीच्या सुमारास मुंबईकडे जाणाऱ्या एका चालत्या गाडीला आग लागल्याची माहिती शहर नियंत्रण कक्षाकडून देण्यात आल्यानंतर तातडीने या ठिकाणी आगीचा बंब रवाना करण्यात आला आणि गाडीला लागलेली आग ही विझविण्यात नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन जवानांना यश मिळाले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**गंजमाळ परिसर**

चौथी घटना शहरातील गंजमाळ परिसरामध्ये असलेल्या कोमल कुशन या परिसरामध्ये घडली. या कोमल कुशनच्या बाजूला रात्रीच्या वेळी या परिसरात असलेले दुकानदार हे आपला कचरा हा टाकत असतात. या कचऱ्याला अज्ञात कारणामुळे आग लागली आणि या आगीने रौद्र रूप धारण केले. आजूबाजूला दुकाने होती. याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने धावपळीमध्ये अग्निशमन दलाच्या जवानांनी जाऊन ही आग नियंत्रणात आणली.

**सातपूर स्वारबाबानगर**

पाचवी घटना सातपूर येथील स्वारबाबानगर या परिसरामध्ये घडली. या ठिकाणी असलेल्या एका घराला आग लागली. तातडीने अग्निशमन दलाच्या जवानांनी जाऊन ही आग आटोक्यात आणली. सुदैवाने याही ठिकाणी कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांची कसरत**

सर्व घटनांचे गांभीर्य ओळखून नाशिक महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बैरागी यांच्यासह सहाय्यक अग्निशमन अधिकारी प्रदीप बोरसे, राजेंद्र नाकील, पीव्हीएल यलमामे, आर. डी. कदम, किशोर पाटील, संजय जाधव, राजू पाटील, रमाकांत खारे, विजय शिंदे, इसाक शेख, संतोष मेंद्रे, विजय ठाकूर, इरफान पानसरे, मुकुंद सोनवणे यांच्यासह अन्य अधिकारी आणि कर्मचारी हे सर्व परिस्थितीवर ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न करीत होते. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले.

**मनपा आयुक्तांसह अधिकाऱ्यांकडून कौतुक**

मध्यरात्री समस्त नाशिककर हे झोपलेले होते आणि त्याही परिस्थितीमध्ये दुसऱ्या बाजूला नाशिककरांची सुरक्षितता कायम राहावी यासाठी म्हणून नाशिक शहरातील महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे अधिकारी आणि कर्मचारी हे सातत्याने प्रयत्न करत होते. या घटनेची माहिती महापालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, स्मिता झगडे, प्रदीप चौधरी, प्रशासन उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, नितीन पवार, निकत, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी शहरातील नागरिकांसाठी मध्यरात्री लावणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# अधिकाऱ्यांना 'एआय' तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण

## नागरिकाभिमुख सेवेसाठी पालिकेचे पाऊल

**नाशिक : प्रतिनिधी**




महानगरपालिका प्रशासनातील विविध विभागांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे प्रशिक्षण देण्यात आले. महापालिकेत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख सेवा कशा पुरवता येतील, याविषयीही सखोल माहिती या प्रशिक्षणात देण्यात आली.

कार्यशाळेच्या प्रारंभी एम. के. सी. एल. चे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम, समन्वयक मकरंद बेवलकर आणि नाशिक विभागाचे प्रमुख सुभाष पाटील यांचे स्वागत अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी केले. नाशिक महानगरपालिकेत अधिकाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे धडे देण्यात आले. विशेष प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर यांनी आपल्या प्रस्ताविकेत सांगितले की, शासनाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याचा एक भाग म्हणून आजच्या या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी उपस्थित विभागप्रमुख, खातेप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध पैलू समजावून सांगितले. तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासनाच्या कामकाजात अधिक गतिमानता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमतेत वाढ कशी करता येईल याचे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी सोप्या व समजण्यासारख्या भाषेत केले.

# कुपोषित बालकांच्या शोधासाठी धडक मोहीम

## महिला व बालकल्याण विभागास बैठकीत सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**



**प्रत्येक अंगणवाडीला देणार भेट**

जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अति कुपोषित, कुपोषित बालकांची शोधमोहीम सुरू करण्याचे आदेश महिला व बालकल्याण विभागाला यावेळी देण्यात आले. या मोहिमेंतर्गत प्रत्येक अंगणवाडीला भेट देऊन कुपोषित बालकांचा शोध घेण्यात येईल. वयाच्या तुलनेत कमी वजन असलेल्या बालकांना सकस आहार पुरविला जातो.

कुपोषित बालकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे धडक मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेत बालमृत्यू आढावा बैठक पार पडली. जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. त्यापासून बालकांचे संरक्षण कसे करावे, व्हायरल इन्फेक्शन होणार नाही, यादृष्टीने आरोग्य विभागाने काय काळजी घ्यावी, याचा आढावा घेण्यात आला.

यावेळी प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहते, निवासी वैद्यकीय अधिकारी संदीप सूर्यवंशी, डॉ. नीलेश अहिरे, डॉ. मोहन वारके आदी उपस्थित होते.

या मोहिमेत आढळून आलेल्या बालकांवर आरोग्य विभागामार्फत उपचार करण्यात येणार आहे. बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी आरोग्य विभागाला दिल्या आहेत.

अंगणवाडी सेविकांमार्फत गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार पुरविण्यात येतो. तसेच कुपोषित बालकांसाठी विशेष आहार दिला जातो.

### बसचालक-वाहकाचा प्रामाणिकपणा

**नाशिक :** एस.टी. महामंडळाच्या बोरिवली ते नाशिक (क्रमांक ४६८) बसमध्ये दि. १८ प्रवासी सुनील सुतार यांची बॅग विसरली होती. सुनील सुतार हे प्रवासादरम्यान चुकून बॅग बसमध्ये विसरून उतरले होते. या बॅगमध्ये रोख रुपये दहा हजार होते. बॅग सापडताच बसचे चालक पी. के. ठाकरे आणि वाहक व्ही. एस. गुळसकर यांनी प्रामाणिकपणे ती बॅग ताबडतोब संबंधित अधिकाऱ्यांकडे जमा केली. काही वेळातच सुनील सुतार हे प्रवासी परत आल्यावर त्यांना ती बॅग सुखरूप परत करण्यात आली. या प्रामाणिक आणि सत्प्रवृत्त कृतीसाठी चालक ठाकरे आणि वाहक गुळसकर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मनपातील लिफ्टमध्ये तिसऱ्या डोळ्याची नजर

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिका प्रशासनाने मुख्यालयातील सर्व लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहे. त्यामुळे लिफ्टमधील हालचालींवर लक्ष ठेवण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत सीसीटीव्हीची मदत होणार आहे.

महापालिकेत दररोज हजारोंच्या संख्येने नागरिक, कंत्राटदार कामानिमित्त येतात. महापालिका इमारत तीन मजली असल्याने अनेकजण दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी लिफ्टचाच वापर करतात. लिफ्टमध्ये काही वेळा गैरप्रकारांची किंवा तांत्रिक अडचणींची नोंद घेणे कठीण होते, मात्र आता लिफ्टमध्ये सीसीटीव्ही बसवल्याने गैरप्रकार, वाद, गैरवर्तन रोखणे शक्य होणार आहे. अपघात किंवा लिफ्टमध्ये कोणी अडकल्यास तातडीने मदत देता येईल. लिफ्टमध्ये होणारी कचराफेक, तोडफोड यालाही आळा बसेल. महापालिकेच्या सुरक्षा विभागाद्वारे त्यावर नियंत्रण असून, सर्व कॅमेरे एक केंद्रीकृत नियंत्रण कक्षाशी जोडले गेले आहेत. त्यातील फुटेज १५ ते २५ दिवसांपर्यंत संग्रहित ठेवता येऊ शकते. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी महापालिकेच्या लॉबी, कॉरिडोर तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालयात व बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. मात्र, आता लिफ्टमधून ये-जा करणाऱ्या नागरिकांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सीसीटीव्हीची नजर राहणार आहे.

# नाशिक तापले; तापमान ४० अंशांवर

## वाढत्या उकाड्याने नागरिक हैराण

**नाशिक : प्रतिनिधी**



मागील काही दिवसांपासून शहरात उन्हाचा कडाका वाढला आहे. शहराच्या तापमानात कमालीची वाढ झाली आहे. शहराच्या तापमानात वाढ होऊन कमाल तापमान ४०.० अंश सेल्सिअसवर पोहचले आहे. तर किमान तापमान २०.७ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले आहे.

सूर्यकिरणांच्या वाढत्या प्रखरतेने आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. नागरिकांना कडक उन्हाचा सामना करावा लागतो. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उन्हाचा कडाका वाढल्याने नागरिकांना घामाच्या धारा लागल्याचे चित्र आहे. पुढील काही दिवस सरासरीपेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता आहे. नागरिकांना प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. नागरिकांनी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत शक्य असल्यास घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. या उन्हाने केवळ घामाच्या धारा लागत नसून, त्याने साथीच्या आजारांनाही आमंत्रणही दिले जात आहे. आकाश निरभ्र असल्याने प्रखर सूर्यकिरणांमुळे जमिनीचा पृष्ठभाग तापून हवेतील उकाडा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परिणामी, सकाळी नऊ वाजल्यापासूनच शहरात उन्हाच्या झळा जाणवत आहेत. चटका बसविणाऱ्या कडक उन्हामुळे नाशिककर त्रस्त झाले आहेत. नागरिक टोपी, सनकोट, हेल्मेट, मास्क आदींसह घराबाहेर पडत आहे. रात्री उशिरा मात्र काहीसे गार वारे वाहत असल्याने किंचित दिलासा मिळत आहे.

# 'पीएमओ'ने घेतला सिंहस्थाचा आढावा

## विभागीय आयुक्त गेडाम यांच्याकडून सादरीकरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत बैठका सोडून अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही. यावरून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सिंहस्थप्रश्नी थेट पंतप्रधान कार्यालयाने दखल घेत शुक्रवारी (दि.१८) ऑनलाइनद्वारे नाशिकमधील सिंहस्थाचा आढावा घेतला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी सिंहस्थाची माहिती दिली.**

पंतप्रधान कार्यालयाने सिंहस्थाची माहिती घेतल्याने आता तरी आराखड्यासह इतर प्रकल्पांना चाल मिळणार का? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. पंतप्रधानांचे सल्लागार तरुण कपूर यांनी नाशिकमधील सिंहस्थासह राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेतला. नाशिक-त्र्यंबक येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. याबाबत महापालिका प्रशासन गेल्या दीड ते दोन वर्षांपासून नियोजन करत आहेत. पंचवटीतील साधुग्राम, तपोवन व रामकुंड शहरातील ही धार्मिक ठिकाणे सिंहस्थातील मुख्य केंद्र आहेत. साधुग्राममध्ये जमीन अधिग्रहणाचे घोडे अडले आहे. रोख मोबदला दिल्यावरच शेतकरी जमिनी सोडण्यास तयार आहे. तर तपोवनसह रामकुंड व नाशिकरोड परिसरात कोट्यवधीची विकासकामे केली जाणार आहेत. यासाठी हजारो कोटींच्या विकासनिधीची आवश्यकता आहे. सर्वाधिक खर्च बांधकाम विभागाला येणार आहे. पंधरा हजार कोटींचा विकास आराखडा राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे. मात्र, कार्यवाहीच होत नसल्याचे चित्र आहे.




**कासवगतीवर साधू-महंतांची नाराजी**

हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या भाजपचे केंद्र आणि राज्यात सरकार आहे. हिंदू धर्मीयांच्या दृष्टीने सिंहस्थ कुंभमेळा सर्वांत मोठा उत्सव आहे. परंतु याबाबत सरकारला गांभीर्य नाही का, असा सवाल शहरातील साधू-महंत करत असून, नाराजी व्यक्त करत आहेत. सिंहस्थावेळी शहरात कोट्यवधी भाविक दाखल होणार असल्याने त्यांना सोयीसुविधा देण्याची जबाबदारी शासनाची असेल. त्यासाठीच्या तयारीसाठी अद्याप कुठलेही नियोजन झालेले नाही.



भारतापुढे चीनची शरणागती अटी मान्य करण्याची तयारी पान ३

नाशिक आज
# गांवकरी



स्कोडाची ऑल-न्यू स्कोडा कोडियक कार लाँच पान ३

नाशिक, शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### बंगालमधील हिंसाचाराच्या निषेधार्थ आज आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

बंगालमध्ये हिंदूंना लक्ष्य बनवून केल्या जाणाऱ्या हिंसाचाराच्या विरोधात देशभर आंदोलन करण्यात येणार असून, नाशिकमध्ये देखील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि. १९ रोजी सकाळी १० वाजता मोर्चा नेण्यात येणार असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेतर्फे देण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन देण्यात येणार असून, त्या निवेदनाची प्रत प्रत्येक ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना आंदोलनाद्वारे देण्यात येईल. बंगालमध्ये राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना मुक्तपणे प्रवेश दिला जात आहे. त्यांचे आधार कार्ड बनवले जात आहेत. बंगालमध्ये तत्काळ राष्ट्रपती राजवट लागू करावी. बंगालमधील हिंसाचाराची एनआयएकडून चौकशी करावी आणि दोषींना तत्काळ शिक्षा व्हावी, अशा मागण्या करण्यात येणार असल्याचे विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा मंत्र्यांनी सांगितले.

### श्री साईनाथ मंदिराचा ३० ला वर्धापन दिन

**सिडको :** जुने सिडको येथील श्री साईनाथ मंदिराचा १४ वा वर्धापन दिन ओम साईनाथ ट्रस्टच्या वतीने यंदा अक्षय्य तृतीयानिमित्ताने मोठ्या भक्तिभावात साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने ३० एप्रिल व १ मे २०२५ रोजी श्री साईनाथ मंदिर, (पॉझिटिव्ह एनर्जी सेंटर), एन-३, एल सेक्टर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुने सिडको येथे दोनदिवसीय साई महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. साई महोत्सवाला पहिल्या दिवशी, ३० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता श्री साईपालखी मिरवणुकीसह भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत विविध सांस्कृतिक आणि पारंपरिक पथकांचे सादरीकरण होणार आहे. दुसऱ्या दिवशी, १ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपासून महाप्रसाद (अन्नदान) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसांच्या साई महोत्सवात सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबासह उपस्थित राहावे, असे आवाहन ओम साईनाथ ट्रस्टचे अध्यक्ष प्रवीण (बंटी) तिदमे यांनी केले आहे.



### नाशिकमध्ये जूनमध्ये भाकपाचे अधिवेशन

**नाशिक :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे २५ वे राज्य अधिवेशन नाशिक २२ ते २४ जून यादरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. अधिवेशनाच्या लोगोचे अनावरण भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय सचिव अमरजित कौर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पक्षाचे राज्य सेक्रेटरी सुभाष लांडे, सहसेक्रेटरी प्रा. राजू देसले, प्रा. डॉ. राम बाहेती, सचिव मंडळाचे सदस्य नामदेवराव चव्हाण, श्याम काळे, शिवकुमार गणवीर, कार्यकारिणी सदस्य मिलिंद रानडे, महादेव खुडे, राजन बावडेकर अशोक सूर्यवंशी, कौन्सिल सदस्या बबली रावत, रमेश परब आदी उपस्थित होते. अमरजित कौर यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शताब्दी वर्ष साजरे होत आहे. राज्य अधिवेशन नाशिक येथे होणार आहे. याची जोमाने तयारी करण्याचे आवाहन करण्यात आले.



### ए.टी.पवार शाळेत आपत्ती व्यवस्थापन धडे

**नाशिक :** राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहांतर्गत म्हसरूळ बोरगड येथील कर्मवीर ए. टी. पवार प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. नागरी संरक्षण पंचवटी विभागीय क्षेत्ररक्षक मनोहर जगताप यांनी आग नियंत्रणाबाबत जनजागृती, प्रथमोपचार आणि विमोचनविषयी प्रात्यक्षिकसहित मार्गदर्शन केले.

# सफाई ठेक्याप्रकरणी मनपा बॅकफूटवर

## 'त्या' दोन अटी-शर्ती प्रशासन रद्द करणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिकेच्या घनकचरा विभागाकडून पावणेदोनशे कोटी खर्चून खासगी मक्तेदाराकडून सफाईची कामे केली जाणार आहेत. मात्र, या निविदेत अचानकपणे अटींमध्ये बदल करण्यात आले होते. त्यामुळे हे प्रकरण थेट उच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने पालिकेला फटकारत दोन्ही अटी रद्द करण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर महापालिकेचा घनकचरा विभाग कायदेशीर अभिप्राय घेणार होता. तथापि, आता महापालिकेने सफाई ठेक्याबाबत नमती भूमिका घेत समाविष्ट केलेल्या दोन अटी रद्द करून निविदा राबवण्याचा निर्णय घेतला असल्याचे सूत्रांनी सांगितले.**



सफाई ठेक्याच्या निविदेला काही अवधी लागणार असल्याने घनकचरा विभागाने विद्यमान ठेकेदाराला ३१ मेपर्यंत पाचव्यांदा मुदतवाढ दिली. चुकीच्या अटी निविदेत टाकल्याने मक्तेदाराने न्यायालयात धाव घेत आपली भूमिका मांडली होती. नेटवर्थ म्हणजेच ठेकेदाराची पत सुमारे शंभर कोटी असावी. आणि अनुभवाची लावलेली अट अशा दोन अटींमुळे सफाई ठेक्याचा वाद न्यायालयात गेला होता. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिका प्रशासन कायदेशीर सल्लामसलत करणार होते. मात्र, आता मनपाने एक पाऊल मागे घेतल्याचे दिसून येत आहे. तत्कालीन आयुक्त अशोक करंजकर यांच्या कार्यकाळात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सफाई ठेक्याची निविदा काढण्यात आली. परंतु, निविदेतील अटींवरून वादंग उठले होते. भाजपने याप्रकरणी आक्रमक भूमिका मांडत निविदाच रद्दची मागणी केली. शिंदे गटातील एका मंत्र्याच्या जवळच्या ठेकेदाराला सफाई ठेक्याचे काम मिळावे, यासाठी हा प्रयत्न असल्याची जोरदार चर्चा तेव्हा पालिका वर्तुळात रंगली होती.

उच्च न्यायालयाने मात्र या दोन अटी-शर्ती रद्द करण्याच्या सूचना केल्याने आता दोन्ही अटी-शर्ती काढून सफाई ठेक्याची प्रक्रिया राबवली जाऊ शकते. यापूर्वी सफाई ठेक्याची किंमत ७४ कोटींपर्यंत होती. मात्र, आगामी सिंहस्थ कुंभमेळा पाहून प्रशासनाने सातशे कर्मचाऱ्यांवरून थेट हजार कर्मचाऱ्यांची संख्या नव्या ठेक्यात वाढवण्यात येणार असल्याने ठेक्याची झेप पावणेदोनशे कोटींपर्यंत गेली आहे.



### सिडकोतील जलतरण तलावात उन्हाळ्यामुळे आबालवृद्धांची गर्दी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

एप्रिलच्या कडाक्याच्या उन्हात तापमान ४१ अंशांपर्यंत पोहोचले असताना, वातावरणातील वाढत्या उष्णतेवर उपाय म्हणून सिडको अश्विननगर येथील स्वामी विवेकानंद जलतरण तलाव नागरिकांना थंडावा देणारे ठरत आहे. उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाल्याने लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत सर्व वयोगटातील नागरिक तरणतलावाकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत.

स्वामी विवेकानंद जलतरण तलाव येथे सध्या सकाळ व सायंकाळच्या सत्रात पोहण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या मुलांना येथील प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जात आहे. यासोबतच सध्या उन्हाचा पारा वाढल्याने उन्हाचा दाह कमी करण्यासाठी नवीन नाशिककर या तरण तलावाचा मार्ग निवडताना दिसून येत आहेत. या ठिकाणी पुरुषांसाठी दिवसाला ५ बॅच सुरू आहेत. महिलांसाठीदेखील २ बॅच सुरू करण्यात आल्या आहेत. या जलतरण तलावावर येणाऱ्यांसाठी व्यवस्थापक सुनंदा मालसाने, प्रशिक्षक वाळू नवले, जीवरक्षक ज्ञानेश्वर चौरे, पूजा रावत, कर्मचारी नितीन गोरे, सिद्धार्थ साळवे, केलास ठोंबरे, बाळू पोमनार, प्रमोद गांगुर्डे, मनोज जोगळेकर नियोजन बघत आहेत.

# मनपा शिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल शासनाकडे पडून

## पंधरा दिवस उलटूनही कार्यवाही होईना

**नाशिक : प्रतिनिधी**

शिक्षक समायोजनासह वादग्रस्त कारणांमुळे चर्चेत आलेले तत्कालीन मनपा शिक्षणाधिकारी बापूसाहेब पाटील यांच्या चौकशीचा अहवाल मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी २ एप्रिल रोजीच शासनाला सादर केला आहे. मात्र, पंधरा दिवस उलटूनही याप्रकरणी कुठलीच कार्यवाही होत नसल्याने यामागील कारण काय? असा सवाल केला जाऊ लागला आहे. बी. टी. पाटील दोषी आढळलेच तर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होईल. पालिका आयुक्तांनी पाटील यांच्याकडून यापूर्वीच पदभार काढून घेतला होता.

ना. उदय सामंत यांच्या निर्देशानुसार महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांसह चार सदस्य समितीने पाटील यांच्या कारभाराचा लेखाजोखा तपासून अहवाल तयार केला होता. पाटील यांनी शिक्षक बदल्यांसह अनेक वादग्रस्त निर्णय घेतले. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात आली. शिक्षक समायोजन बदल्या व मुख्याध्यापक नेमणुकीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप विधिमंडळात शिक्षक आ. किशोर दराडे यांनी केला होता. दराडे यांच्या लक्षवेधीवर ना. उदय सामंत यांनी पाटील यांची बदली करून अतिरिक्त आयुक्तांना पंधरा दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार या प्रकरणाची चौकशी करून अहवाल अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, प्रशासन उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय पाथरुट व मुख्य लेखापरीक्षक बळवंत गायकवाड यांच्याकडून मनपा आयुक्तांना तो सादर करण्यात आला. चौकशी समितीमध्ये अनेक बाबी नियमबाह्य पद्धतीने केल्याचा उल्लेख असल्याचे बोलले जात आहे. परंतु, शासनाकडून याप्रकरणी काय निर्णय घेतला जाईल हे पहावे लागेल. असे असले तरी शासनाकडे अहवाल जाऊन पंधरा दिवस उलटूनही यावर कुठलीच हालचाल होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### नितीन पवारांकडे सूत्र

तत्कालीन शिक्षणाधिकारी पाटील यांचा पदभार काढून घेतल्यानंतर उपायुक्त नितीन पवार यांच्याकडे शिक्षण विभागाची सूत्रे देण्यात आली आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाची प्रतिमा गेल्या तीन-चार वर्षांत चांगलीच डागाळली आहे. त्यामुळे शिक्षण विभागासमोर चांगले काम करण्याचे आव्हान असणार आहे.

### भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत ४ तक्रारींचा निपटारा

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत ३२ तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यापैकी चार तक्रारींचा निपटारा करण्यात आला.

दाखल तक्रारींमध्ये जिल्हा परिषद शिक्षण विभाग, शिक्षण उपसंचालकस्तर, ग्रामपंचायतीकडून रखडलेली कामे, थकीत बिले, रस्त्याची कामे, कामांचा निकृष्ट दर्जा आदींबाबत तक्रारी करण्यात आल्या. यात २०१० मध्ये तलाठी पद भरतीत अपात्र उमेदवारांची निवड केल्याबाबत जवाहर रोजगार योजनेतून विहिरीसाठी उत्पन्नाचा खोटा दाखला, दस्तावेज व इतर माहिती देऊन फसवणूक केल्याबाबत अनियमितता असतानाही रजिस्ट्रेशन करणे, रामनगर प्राथमिक अनुदानित शाळा तवली फाटा, पेठरोड, नाशिक यांचे बोगस मान्यता व वय कमी असताना मान्यता देऊन वेतन काढून फरक बिले, वेतनवाढ, इन्क्रिमेंट काढल्याप्रकरणी कारवाई करणे यासह एकूण ३२ प्रकरणे दाखल झाली.

# जिल्हा परिषदेत तातडीने आरोग्यसेवक भरती करा

## खासदार वाजे यांचे मुख्याधिकाऱ्यांना पत्र

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषदेतील आरोग्यसेवक (पुरुष) ५० टक्के पदांच्या भरतीप्रक्रियेबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, याबाबत नाराजी व्यक्त करत खासदार राजाभाऊ वाजे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.

खासदार वाजे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, ऑगस्ट २०२३ मध्ये हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी या संवर्गातून आरोग्यसेवक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती आणि जुलै २०२४ मध्ये परीक्षा पार पडली होती. मात्र, डिसेंबर २०२४ मध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भरतीप्रक्रिया थांबवण्यात आली होती. त्यानंतर ७ मार्च २०२५ रोजी न्यायालयाने स्थगिती उठवली असून, १२ मार्च २०२५ रोजी शासनाने भरतीप्रक्रिया पूर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील बहुतांश जिल्हा परिषदांनी भरतीप्रक्रिया पूर्ण केली असताना, नाशिक जिल्हा परिषदेने अद्याप कोणतीही पावले उचललेली नाहीत. त्यामुळे पात्र उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे क्रीडा स्पर्धा उत्साहात

**नाशिक :** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे नाशिकरोड येथे क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकदिवसीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. संस्थेच्या वतीने नाशिकरोड येथील ईगल गार्डन, मुक्तिधाम येथे झालेल्या स्पर्धेत स्वच्छता निरीक्षक आणि फायरमनच्या विद्यार्थ्यांमध्ये क्रिकेट आणि कबड्डी या दोन विभागांत स्पर्धा रंगली.

यात फायरमनच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक जगदीश पवार यांच्या हस्ते व आदित्य कपिले यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा माजी नगरसेवक संभाजी मोरुस्कर यांच्या हस्ते व संस्थेचे विभागीय संचालक जीवन सोनवणे यांच्या उपस्थितीत झाला.

### सिटीलिंक कार्यालयाबाहेर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

सीटू संलग्न नाशिक वर्कर्स युनियनच्या नेतृत्वाखाली सिटीलिंक अंतर्गत बॉस सिक्युरिटी अँण्ड सर्व्हिसेसमार्फत काम करणाऱ्या ट्रॅफिक कंट्रोलर कर्मचारी आणि महिला चालक मीना भगवान लांडगे यांनी सिटीलिंक कार्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून सिटीलिंक अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर बॉस सिक्युरिटी अँण्ड सर्व्हिसेसतर्फे शासनाने १४ ऑक्टोबर २०२४ पासून लागू केलेल्या किमान वेतनाचा फरक अद्याप कामगारांना अदा केलेला नाही. शिवाय, कर्मचाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे सक्तीने राजीनामे मागितले जात असून, पुन्हा कामावर रुजू करण्यासाठी रु.२५,०००/- डिपॉझिटच्या नावाखाली वसूल केले जात आहेत. त्याचबरोबर कामगारांकडून कोऱ्या बाँड पेपरवर सही घेण्यात येत आहे. मीना लांडगे या शहर बससेवेमधील प्रथम आणि एकमेव महिला बसचालक असून, त्यांची कुठलीही चूक नसताना गेल्या दोन महिन्यांपासून आयटी बंद करण्यात आलेला आहे. हा सर्व प्रकार कामगारांवर अन्याय करणारा आहे. कामगारांवर अशा प्रकारे बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली असून, कामगारांनी मनपा आणि सिटीलिंक व्यवस्थापन यांच्याविरुद्ध सिटीलिंक कार्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व युनियन पदाधिकारी सीताराम ठोंबरे, तुकाराम सोनजे, संतोष काकडे, तानाजी जायभावे, राहुल गायकवाड करीत आहेत.

# रुग्णालयाची नोंदणी आता ऑनलाइनच!

## पारदर्शकतेसाठी पालिका प्रशासनाचा निर्णय

**नाशिक : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत रुग्णालयांची नोंदणी व परवान्यांसाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. पारदर्शक कारभारासाठी रुग्णालयांची नोंदणी व परवाना नूतनीकरण ऑनलाइन पोर्टलद्वारे करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी घेतला. त्यानुसार रुग्णालयांच्या नोंदणीसाठी पालिकेच्या आरोग्य विभागाच्या खेटा मारण्याची आवश्यकता राहिलेली नाही. दरम्यान, पैशासाठी रुग्णालयांची नोंदणी रखडवण्याचे काम होत असल्याच्या तक्रारीदेखील केल्या जात होत्या. हे पाहून पालिका प्रशासनाने ऑनलाइन नोंदणीचा निर्णय घेतला आहे.**

### शहरात ५७१ रुग्णालये

महापालिका हद्दीत जवळपास ५७१ रुग्णालये, प्रसूतिगृहे व नर्सिंग होम्स आहेत. मुंबई सुश्रुषागृहे अधिनियम, तसेच सुधारित नियमान्वये महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडे नोंदणी करून परवाना घेणे, तसेच, निर्धारित कालावधीनंतर परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. विविध प्रकारच्या परवानग्या, तसेच एनओसी अशी अनेक कागदपत्रे वैद्यकीय विभागाकडे जमा केल्यानंतरच नोंदणी किंवा परवाना नूतनीकरण केले जाते.

खासगी रुग्णालयांची नोंदणी, तसेच परवाना नूतनीकरणासाठी विविध कारणांसाठी अडवणूक केली जाते. आरोग्य विभागातील कामकाजात पारदर्शकता यावी म्हणून पोर्टल तयार करण्यात आले आहे. त्यासाठी शहरातील रुग्णालयांची नोंदणी आणि परवाना नूतनीकरण ऑनलाइन करण्याचा निर्णय आयुक्त मनीषा खत्री यांनी घेतला असून, याबाबतचे आदेश नुकतेच काढण्यात आले. रुग्णालय नोंदणी व नूतनीकरणासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे अपलोड करणे हे नर्सिंग होम, हॉस्पिटल मालक, संचालक यांची जबाबदारी असेल. वैद्यकीय विभागाकडून कागदपत्रांची ऑनलाइन तपासणी होईल. काही त्रुटी असल्यास संबंधित ऑनलाइन माहिती मिळत जाईल. प्रस्ताव परिपूर्ण असल्यास मनपाची फी चलनाद्वारे भरल्यानंतर नोंदणी, नूतनीकरण प्रमाणपत्र ऑनलाइन दिले जाणार आहे. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्या उपस्थितीत या पोर्टलचे सादरीकरण झाले.

पोर्टलची चाचणी यशस्वी झाल्याने ऑनलाइन नोंदणी आणि नूतनीकरणास प्रारंभ झाला. दरम्यान, वैद्यकीय विभागासह अग्निशमन, नगररचना विभागाकडून रुग्णालयांची आर्थिक देवाणघेवाणासाठी अडवणूक केली जात असल्याचे आरोप केले जात होते.

# हिंदी भाषेच्या सक्तीला मनसे विरोध

## नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल विविध प्रतिक्रिया

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यात नवीन शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरण लागू होणार असल्याची घोषणा राज्य शासनाच्या वतीने करण्यात आली. या धोरणानुसार पहिली ते पाचवीपर्यंत मराठी आणि इंग्रजीसोबतच हिंदी भाषेची सक्ती करण्यात येणार आहे. पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीवरून राज्यातील राजकारण तापले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयाची अंमलबजावणी होऊ देणार नसल्याची घोषणा करत निर्णयाविरुद्ध दंड थोपटले आहेत. तर दुसरीकडे भाषा अभ्यासकांनी पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध केला आहे. शासनाच्या या निर्णयानंतर विविध प्रतिक्रिया उमटत आहे.**



मराठी ही राज्याची राज्यभाषा आहे. महाराष्ट्रातील प्रत्येकाने मराठी बोलली पाहिजे आणि मराठीचा आग्रह धरला पाहिजे. अभिजात भाषेचा दर्जादेखील मराठी भाषेला मिळाला आहे. शासन कुठेही मराठी भाषेची गळचेपी होऊ देणार नाही. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे देशाची संपर्क सूत्राची भाषा हिंदी आहे. विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच हिंदीची शब्दओळख होत असेल तर मराठी आणि इंग्रजी भाषेप्रमाणे विद्यार्थ्यांना लहान वयात हिंदीही आकलन होईल.

**- दादाजी भुसे** (शालेय शिक्षणमंत्री)



हिंदी अनिवार्य याचा अर्थ असा आहे की, पहिलीपासून मुलांना मौखिक स्वरूपात शिकवली जाणार. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बनवलेल्या पायाभूत राज्य अभ्यासक्रम आराखड्यात स्पष्ट म्हटले आहे की, लेखन नाही, ताण पडेल असे नाही. मेंदू मानसशास्त्र असे सांगते की, मुलांना विविध भाषा कानावर पडल्या की, ते लवकर नैसर्गिक भाषा शिकतात. मराठी आणि हिंदी भाषा बऱ्यापैकी सारख्या असल्याने मुलांवर ताण पडणार नाही. त्यामुळेच राजकीय वळण देऊन नये असे मी सांगेन.

**- सचिन जोशी** (शिक्षण अभ्यासक)



मराठी आणि इंग्रजी भाषेसोबत हिंदीची सक्ती करणे अयोग्य आहे. लहान मुलांवर अधिक अभ्यासाचा ताण आहे. त्यात आता हिंदीची सक्ती करणे चुकीचे आहे. या निर्णयाचा शासनाने पुनर्विचार करावा.

**- गीता बैरागी** (पालक)

### कर्नाटक : हिंदी-संस्कृत ऐच्छिक, गुजरात : चौथीपासून हिंदीची सक्ती

कर्नाटकमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत कन्नड, इंग्रजी भाषा सक्ती आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदी किंवा हिंदी-संस्कृत भाषा ऐच्छिक आहे. भाजपचे अधिराज्य असलेल्या गुजरात राज्यात इयत्ता तिसरीपासून इंग्रजी आणि चौथीपासून हिंदीची सक्ती आहे.



महाराष्ट्रात मराठी भाषेची गळचेपी होऊ नये ही मनसेची सुरुवातीपासूनची भूमिका आहे. नवीन शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासून हिंदी सक्तीची करणे चुकीचे आहे. यातून महाराष्ट्रावर हिंदी लादण्याचा प्रयत्न दिसतो. राजसाहेबांच्या आदेशानुसार या निर्णयाविरुद्ध आंदोलन करण्यात येईल.

**- सुदाम कोंबडे** (शहराध्यक्ष, मनसे)



हिंदी हा विषय पहिल्या इयत्तेपासून शिकवला जाणे ही स्वागतार्ह बाब आहे. आजचे युग वेगाने वाढत आहे. मुलांना सर्व भाषांचे ज्ञान अवगत होणे काळाची गरज आहे.

**- ज्योती कर्डक** (पालक)

## अग्रलेख

# उपराष्ट्रपतींची नाराजी

राष्ट्रपती हे सर्वोच्च पद आहे. राष्ट्रपती हे तिन्ही सेनादलांचे प्रमुख आहेत. ते घटनाप्रमुख आहेत. देशाचा कार्यकारी कारभार पंतप्रधान पाहत असले तरी देशाचा बराचसा कारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. पंतप्रधानांना राष्ट्रपतींची भेट घेण्यासाठी राष्ट्रपती भवनात जावे लागते. राष्ट्रपती पंतप्रधानांना भेटण्यासाठी जात नसले, तरी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय राष्ट्रपतींना मान्य करावे लागतात किंवा सरकार अथवा मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींना मान्य करावा लागतो. हीच बाब राज्याच्या बाबतीत राज्यपालांना लागू होत असते. याच कारणास्तव आपल्याकडे राष्ट्रपती आणि राज्यपालांना रबरी शिक्का म्हटले जाते. याचाच अर्थ सरकारच्या, संसदेच्या, विधिमंडळाच्या निर्णयांना राष्ट्रपती अथवा राज्यपालांनी निमूटपणे मान्यता द्यावी, असा काढला जातो. पण, राज्यपाल घटनात्मक संकेत आणि तरतुदी बाजूला ठेवून आपल्या मर्जीप्रमाणे काम करत असल्याच्या तक्रारी विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांतून केल्या गेल्या आणि केल्या जात आहेत. तमिळनाडू सरकारने मंजूर केलेल्या विधेयकांवर राज्यपालांनी स्वाक्षरी न करता ती राष्ट्रपतींकडे पाठवली. राष्ट्रपतींनीही त्यावर काहीच निर्णय घेतला नाही. याच कारणास्तव तमिळनाडू सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकारच्या अर्जावर निर्णय देताना राज्यपालांना आपल्या घटनात्मक कर्तव्यांची जाणीव करवून दिली. इतकेच नाही, तर राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांना मान्यता देण्यासाठी मुदत घालून दिली. राज्यपालांनी पाठवलेल्या प्रलंबित विधेयकांवर राष्ट्रपतींनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा, असा आदेशवजा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने दिला. यावर केंद्रीय गृह मंत्रालयाने काहीही प्रतिक्रिया दिली नसली, तरी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली. न्यायालये राष्ट्रपतींना आदेश देऊ शकत नाहीत, असे धनखड यांनी म्हटले आहे. आपण कुठे चाललोय? आपल्या देशात हे काय चालले आहे? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. आपण अत्यंत संवेदनशील असले पाहिजे. आपण हा दिवस पाहण्यासाठी लोकशाहीची कल्पना केली नव्हती. राष्ट्रपतींना वेळेवर निर्णय घेण्यास सांगितले जाते आणि जर तसे झाले नाही तर कायदे बनवले जातात. आपल्याकडे असे न्यायाधीश आहेत जे कायदे करतात, कार्यकारी कामे पण करतात, महासंसद म्हणूनही काम करतात आणि त्यांना कोणतीही जबाबदारी राहत नाही कारण देशाचा कायदा त्यांना लागू होत नाही. आपल्या आयुष्यात कधीही कल्पना केली नव्हती की, मला हे पाहावे लागेल, असेही त्यांनी म्हणत एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयावरच टीका केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना आदेश देण्याची ही पहिलीच वेळ आहे. यावरुन सर्वसामान्यांनाही धक्का बसला असेल. तसाच धक्का धनखड यांना बसला. सर्वोच्च न्यायालयावर असा निर्णय घेण्याची वेळ का आली? याचाही विचार होणे तितकेच महत्वाचे आहे. तमिळनाडूतील सरकारने विधानसभेत मंजूर केलेल्या विधयेकांवर राज्यपालांनी स्वाक्षरी केली असती, तर सर्वोच्च न्यायालयात जाण्याची वेळ तमिळनाडू सरकारवर आलीच नसती. तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी विधानसभेने दोनदा मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी न करता ती राष्ट्रपतींकडे पाठविली. राष्ट्रपतींनी त्यावर काहीच निर्णय घेतला नाही. राष्ट्रपतींनी निर्णय घेतला असता, तर आदेश देण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर आली नसती. याचा विचार धनखड यांनी करायला पाहिजे होता. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय देताना गृह मंत्रालयाने ४ फेब्रुवारी २०१६ रोजी गृह मंत्रालयाने काढलेल्या ऑफिस मेमोरंडमचा आधार घेतला आहे. भारत सरकारच्या सर्व मंत्रालयांना/विभागांना राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखीव असलेल्या राज्य विधेयकांच्या जलद निपटाराबाबत जारी केलेल्या ऑफिस मेमोरंडममध्ये तीन महिन्यांचा कालावधी कालावधी निश्चित करण्यात आला आहे. तातडीच्या स्वरूपाच्या अध्यादेशांच्या निकालासाठी तीन आठवड्यांची मुदत निश्चित करण्यात आलेली आहे. याचा अर्थ सरकारनेच तीन महिन्यांचा कालावधी राष्ट्रपतींसाठी निश्चित केला आहे. याचा संदर्भ सर्वोच्च न्यायालयाने निकालात दिलेला आहे. गृह मंत्रालयाने विहित केलेल्या कालावधीचा अवलंब करणे आम्हाला योग्य वाटते, असे निकालात नमूद करण्यात आले आहे. हा संदर्भ धनखड यांनी नाराजी व्यक्त करताना विचारात घेतला की नाही? हे कळायला मार्ग नाही. राष्ट्रपतींना आदेश देणे हे लोकशाही तत्त्वाच्या विरोधात जात असेल, तर राज्यपाल किंवा राष्ट्रपतींनी विधेयकांवर निर्णय न घेणे हे लोकशाहीच्या तत्वात बसते काय? हा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होणारा आहे. केंद्रात एक आणि राज्यात दुसरा पक्ष (विरोधी) सत्तेवर असेल, तर सरकारच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले राज्यपाल राज्य सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतात. विद्यमान उपराष्ट्रपती जगदीप धनखड पश्चिम बंगालचे राज्यपाल होते तेव्हा त्यांचे आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे काही पटत नव्हते. त्यावेळी धनखड यांनी ममता बॅनर्जी आणि त्यांच्या सरकारला अडचणीत आणण्याचे बरेच प्रयत्न केले होते. राज्यपाल केंद्राच्या इशाऱ्यावर काम करतात, असे अनेकदा दिसून आले आहे. विशेषतः राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली विधेयके परत पाठविणे, राज्य विधिमंडळांनी तीच विधेयके मंजूर परत करुन पाठविली, तर त्यावर सही न करणे, मंत्रिमंडळाचा सल्ला न मानणे, परस्पर बैठका बोलावणे, असे प्रकार राज्यपालांच्या बाबतीत घडलेले आहेत. याला धनखड अपवाद ठरत नाहीत. तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांच्याशी मुख्यमंत्री के. स्टॅलिन यांचे खटके उडाले. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद यांच्यावर अनेक आरोप केले. अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री असताना त्यांचे नायब राज्यपाल सक्सेना यांच्याशी पटत नव्हते. भगतसिंह कोश्यारी यांचे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याशी काही जमत नव्हते. रमेश बैस यांनी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केल्याचे उघड आहे. ही अलीकडची उदाहरणे आहेत. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे/आघाडीचे सरकार असते तेव्हा राज्य सरकार किंवा मुख्यमंत्री यांच्याशी राज्यपालांशी खटके उडाल्याचे उदाहरणे नाहीत. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मध्य प्रदेश, हरियाणा, राजस्थान, आता दिल्ली व महाराष्ट्र, गोवा, बिहार, त्रिपुरा, आसाम, अरुणाचल प्रदेश इत्यादी भाजपाशासित राज्यांत राज्यपालांनी राज्य सरकारच्या कारभारात ढवळाढवळ केल्याची काही उदाहरणे नाहीत. देशात काँग्रेसची सत्ता होती तेव्हाही अशीच परिस्थिती होती.

# हिंदीच्या हुकूमशाहीचा हक्क

**स्वातंत्र्य मिळाल्यापासून आणीबाणीनंतरचे मोरारजींचे जनता सरकार व वाजपेयी यांचे दोन डझन अपक्षांसोबतचे सरकार वगळता २०१४ पर्यंत केंद्रात काँग्रेसचेच शासन होते. मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपला २०१४ पासून पहिले दहा वर्षे पूर्ण बहुमत मिळाले. २०२४ पासून उत्तर भारतातील बिहार राज्याचा नितीशकुमार यांचा पक्ष व आंध्र प्रदेशमधील चंद्राबाबू नायडूंचा पक्ष यांच्या टेकूने भाजपचे सरकार सुरू आहे. २०२० पासून केंद्र शासनाने एनईपी म्हणजे नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अमलात आणलेली आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २०२४ पासून लागू केला आहे.**

**बालभारती की एनसीईआरटी?**

एनसीईआरटीचा जसा आहे तसा अभ्यासक्रम महाराष्ट्रात लागू करावा की, बालभारतीद्वारा त्यावर संशोधन करून राज्याचा अभ्यासक्रम अमलात आणावा, या द्विधा मनःस्थितीतून महाराष्ट्र राज्याचे अभ्यासक मंडळ जात आहे. त्रिभाषा सूत्राची कवायत १९५३ पासूनच देशभर सुरू आहे. आणि तेव्हापासूनच उत्तर भाषिक राज्यांचा हिंदीवरचा जोर आणि तेवढाच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त त्वेषाने दक्षिण भारतीय राज्यांचा हिंदी विरोध आपण पाहत आहोत. कमालीच्या टोकाचा हिंदी विरोध दक्षिण भारतीय राज्यातून तेव्हापासून आजतागायत दिसून येत आहे. उत्तर भारतीय राज्यांच्या मानाने दक्षिण भारतीय राज्यं प्रादेशिक मानसिकता सशक्तपणाने व राजकीय यशाने सांभाळून आहेत. चित्रपट आणि राजकारण यांचे वेड असलेली दक्षिण राज्यांची भूमी आपणास दिसून येते. नेहरू काळापासूनच हिंदीचे आक्रमण हे राज्य थोपवून धरत आहेत. साधारणतः ऐतिहासिक काळापासून भारताचे दोन भाग केल्यास नर्मदेच्या उत्तरेकडील भाग हा उत्तर भारत तर नर्मदेच्या दक्षिणेकडील भाग दक्षिण भारत समजला जातो. त्यानुसार महाराष्ट्र दक्षिण भारताचा भाग येतो. पण खऱ्या अर्थाने महाराष्ट्र हा दोन्ही भागांचा बफर स्टेट आहे, असे म्हणणे योग्य होईल. महाराष्ट्रामध्ये सामाजिक, राजकीय ध्रुवीकरण दोन टोकाचे नाही तर अनेक टोकांचे आहे. उत्तर भारतात साधारणतः राजकीय ध्रुवीकरण दोन टोकात दिसते. उत्तर भारतीयांपेक्षा विचारांचे, सामाजिक उत्थानाचे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचे पुढारलेपण महाराष्ट्रामध्ये स्पष्टपणे दिसून येते.

**महाराष्ट्र व हिंदी भाषा**

महाराष्ट्रातील संपूर्ण विदर्भ व धुळे, नंदुरबार भाग बघितला तर या क्षेत्राला हिंदीचे वावडे नाही. तर महाराष्ट्राचे दक्षिण जिल्हे सोलापूर, कोल्हापूर तसेच मराठवाड्यातील खालील जिल्हे यांना दक्षिण भारतीय संस्कृतीचे भाषेचे वावडे नाही. महाराष्ट्राने कधीही हिंदीचा विरोध केला नाही. उलट संपूर्ण महाराष्ट्रभर नेहरूंच्या काळापासूनच राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार होऊ दिला आहे. खरे म्हणजे, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता महाराष्ट्राला हिंदी ही जवळची भाषा कधीच नव्हती. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई यांना अद्यापही हिंदी जवळची वाटत नाही. त्यांच्या बोलण्यात हिंदी अडखळतच येते.

**भाषेसंबंधी महाराष्ट्र शासनाचा निर्णय**

शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांत इयत्ता पहिलीपासून हिंदी ही भाषा शिकावीच लागेल. म्हणजे हिंदी वा इतर भाषिक शाळांना त्यांची माध्यम भाषा (म्हणजे गुजराती भाषिक शाळेला गुजराती, हिंदी भाषिक शाळेला हिंदी, तामिळ भाषिक शाळेला तामिळ, ही माध्यम भाषा) म्हणजे प्रथम भाषा असेल, तसेच मराठी आणि इंग्रजी अशा इतर भाषा असणार आहेत. इतर भाषिक शाळा प्रमाणाने नगण्य असल्याने आपण मराठी माध्यमांच्या शाळांविषयी विचार करूया!

**बोलीतून प्रमाणभाषेकडे वाटचाल असावी**

मराठी माध्यमाच्या शाळांची माध्यम भाषा मराठी आहे. म्हणजे ही त्यांची मातृभाषा असणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्ष महाराष्ट्राचा अभ्यास केल्यास, पुणे, परिसर व मुंबई हा काही भागच मराठी प्रमाण भाषेच्या जवळपास येतो. इतर सर्व प्रांतात मातृभाषा ही त्या-त्या ठिकाणची बोलीभाषा आहे. उदाहरणार्थ कोकण प्रांतात कोकणी ही भाषा, तिचे शब्द उच्चार पूर्णपणे वेगळे, तसेच दक्षिण महाराष्ट्र बेळगाव कारवार प्रांत मराठी प्रमाण भाषेच्या कोसोदूर, तर खानदेशी ही स्वतंत्र बोलीभाषा, खानदेशीतही अनेक उप बोलीभाषा आहेत. विदर्भातील वऱ्हाड प्रांताची वऱ्हाडी बोली तर मराठीची मूळ बोलीभाषा म्हटलेली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रामध्ये दहा टक्क्यांच्या आसपास आदिवासी समाज विखुरलेला आहे. साधारणतः दहा टक्के विद्यार्थ्यांवर आपण त्यांची मातृभाषा मराठी म्हणून लादलेली आहे. महाराष्ट्रातील दहा टक्के आदिवासी विद्यार्थ्यांना मराठी ही पूर्णपणे अनभिज्ञ भाषा आहे. त्यांना यासोबत हिंदी व इंग्रजी पहिलीपासून शिकायची आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील दहा टक्के विद्यार्थ्यांना आपण त्यांच्या मातृभाषेतील शिक्षण देत नाही आहोत. हे आमच्या पुढारलेल्या महाराष्ट्राचे लक्षण!

मातृभाषेतून शिक्षण म्हणजे पालक घरात जी भाषा बोलतात त्या भाषेतून शिक्षण. याचा अर्थ इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत माध्यम

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

भाषा म्हणजे विद्यार्थी घरी जी भाषा बोलतो त्या बोलीभाषेतून इयत्ता पहिलीचा प्रारंभ होऊन चौथीपर्यंत बोलीभाषेतून माध्यम भाषा म्हणजे मराठी प्रमाणभाषेकडे वाटचाल करणे अपेक्षित आहे. पहिलीला १०० टक्के मातृ-बोलीभाषा, दुसरीला बोलीभाषा ७५ टक्के व प्रमाण भाषा २५ टक्के, तिसरीला बोलीभाषा ५० टक्के व प्रमाणभाषा ५० टक्के, चौथीला बोलीभाषा २५ टक्के व प्रमाणभाषा ७५ टक्के. आणि पाचवीला मात्र शंभर टक्के माध्यम मातृभाषा प्रमाणभाषा असणे अपेक्षित आहे. असे संपूर्ण महाराष्ट्रभर प्रांतनिहाय असले पाहिजे. तशी स्वतंत्र बोलीभाषेची देवनागरीतून पुस्तके असली पाहिजे. त्यानुसार बोलीभाषा व प्रमाण मराठी भाषा यांचे शब्दकोश तयार केले पाहिजे. इयत्ता पहिली ते चौथीच्या स्तरावर शिक्षकांना मुलांच्या बोलीभाषेत लिहिता, वाचता, बोलता आले पाहिजे. तशी प्रशिक्षण कठोर पद्धतीने अमलात आणली पाहिजे. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या १० टक्के असलेल्या विद्यार्थ्यांना आज रोजी तिन्ही भाषा परकीय भाषा आहेत. आणि आपण या तीनही परकीय भाषांतून विद्यार्थ्यांना आता शिक्षण देणार आहोत.




**महाराष्ट्राने हिंदीला विरोध करावा**

साने गुरुजींचा काळ केव्हाच संपला आहे. आपल्या भारतीय संस्कृती या ग्रंथात साने गुरुजी, भाषा या परस्परांच्या भाषा भगिनी असल्या पाहिजेत, असा उल्लेख करतात. विविध परंपरा, संस्कृती, विविध भाषांनी नटलेल्या या आपल्या भारत देशामध्ये विभिन्न भाषा हे आपल्या देशाचे मोठे सांस्कृतिक वैभव आहे. म्हणूनच दक्षिण भारतातील राज्यांनी उत्तर भारतातील एक भाषा, आपल्या आवडीनुसार विद्यार्थ्यांना शिकवावी. त्याच प्रकारे उत्तर भारतीय राज्यांनीसुद्धा दक्षिण भारतातील एक भाषा आपल्या विद्यार्थ्यांना शिकवावी. शिक्षणासाठी काही महिन्यांसाठी काही प्रतिशत का होईना विद्यार्थ्यांचे आदान-प्रदान व्हावे. राष्ट्र भान व एकसंघ भारतीय वृत्ती निर्माण होण्यासाठी हा शिक्षण कालखंड अतिशय महत्त्वाचा आहे. ज्याचा या पद्धतीने वापर व्हायला हवा.

**भाषा भगिनी की वैरिणी**

आता या भाषेच्या हुकूमशाहीमुळे भाषा भगिनी या भविष्यात भाषा वैरिणी होणार आहेत. हिंदीच्या विभिन्न बोलीभाषा एकत्रित केल्यास सर्वात जास्त राज्यांमध्ये बोलली जाणारी भाषा हिंदी म्हणण्यास हरकत नाही. आपल्या देशाने ज्या २३-२४ भाषा स्वीकारल्या आहेत. त्यामध्ये एक हिंदी भाषा आहे, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. या सर्व राजभाषा आहेत.

**संस्कृत ही राष्ट्रभाषा करा**

दक्षिण व उत्तर भारतीय भाषांचा दुवा किंवा या दोन्हीही भागातील भाषांची उद्‌म भाषा मूळ भाषा म्हणजे जननी भाषा म्हणून संस्कृतला स्वीकारण्यास हरकत नाही. उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय या दोघांनाही संस्कृतविषयी आत्मीयता आहे. पाली भाषेलासुद्धा संस्कृतसोबतच दर्जा द्यावा.

**सिनेमा एकसंघ भारताचे रूप**

कधी नव्हे ते गेल्या काही वर्षांपासून दक्षिण भारतीय भाषातील सिनेमा डब करून आम्हाला आता उत्तर भारतीय सर्व भाषांमध्ये पाहायला मिळत आहेत. तर उत्तर भारतीय व मुंबई बॉलीवूडसुद्धा दक्षिण भारतात सिनेमे चालावे म्हणून वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. आर्थिक दृष्टिकोनातून का होईना पण दक्षिण भारतीय सिनेसृष्टीसुद्धा आपला कडवा हिंदी विरोध सोडून हिंदीविषयी स्नेहभाव जोपासण्याचा प्रयत्न करीत आहे.

**हिंदीची हुकूमशाही मागे घ्यावी**

अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने म्हणजे महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रभर इयत्ता पहिली ते पाचवीला सक्तीची हिंदी करणे हे 'वेडे मोहम्मदी कृत्य' होईल असे वाटते. आले देवाजीच्या मना अशा पद्धतीने कोणतेही काम होता कामा नये. प्रेमाची अंमलबजावणी सक्तीने कधीच करता येत नाही. प्रेमासाठी वातावरण, आत्मीयता, ह्रदयात जागा करणे या गोष्टी कराव्या लागतात. संपूर्ण भारतभर हिंदीला पट्टराणी करण्याचा खटाटोप सोडून संस्कृतचा विचार करावा. संस्कृतचा द्वेष कुणीही करणार नाही. विद्वान भाषापंडित डॉ. भीमराव आंबेडकर यांनीही संस्कृतविषयी खूप चांगले मत मांडलेले आहे.

भाषा संशोधक शास्त्रज्ञांच्या संशोधनानुसार लहान मुल एकाच वेळी अनेक भाषा शिकू शकते. पण कोणत्याही शिक्षणाचा श्रीगणेशा हा त्या मुलाच्या मातृभाषेतून म्हणजे त्याचे पालक घर व परिसरातून ऐकल्या-बोलल्या जाणाऱ्या भाषेतून असला पाहिजे. भाषा शिक्षण हे सक्तीने लादण्याचा विषय नाही. तो आवडीचा विषय आहे! अभ्यासाचा विषय आहे! आनंदाचा विषय आहे!

सारांश, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच विरोधी पक्ष कुचकामी असताना व पाशवी बहुमत मिळालेल्या महाराष्ट्र सरकारने हिंदीची सक्तीची हुकूमशाही त्वरित मागे घ्यावी.

# विनोबा भावे यांची भूदान चळवळ : एक रक्तहीन क्रांती

विनोबा भावे यांनी जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा एक तुकडा देण्यास भाग पाडण्यासाठी पायी भारत ओलांडला. त्यांना पहिले यश १८ एप्रिल १९५१ रोजी आंध्र प्रदेशातील नलगोंडा (आता तेलंगणा) जिल्ह्यातील पोचमपल्ली गावात मिळाले. भूदान चळवळ (जमीन भेट चळवळ), ज्याला रक्तहीन क्रांती म्हणूनही ओळखले जाते, ही भारतातील एक स्वयंसेवी जमीन सुधारणा चळवळ होती. गांधीवादी नेते विनोबा भावे यांनी १९५१ मध्ये पोचमपल्ली, पोचमपल्ली गावात या चळवळीला सुरुवात केली.

भूदान चळवळीने श्रीमंत जमीनदारांना त्यांच्या जमिनीचा काही भाग स्वेच्छेने भूमिहीन लोकांना देण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. भावे यांनी सर्वोदय चळवळ आणि ग्रामस्वराज्यातून तात्त्विक प्रेरणा घेतली. भूमिहीन मजुरांना लहान भूखंड देण्यात आले होते, ज्यावर ते स्थायिक होऊ शकतील आणि त्यांची पिके घेऊ शकतील. हा कायदा अशा प्रकारे पारित करण्यात आला की, लाभार्थ्याला जमीन विकण्याचा किंवा ती बिगर-कृषी कारणांसाठी किंवा वनीकरणासाठी वापरण्याचा अधिकार नव्हता. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य भूदान कायद्याच्या कलम २५ मध्ये असे म्हटले आहे की, लाभार्थ्याने (जो भूमिहीन असावा) फक्त उदरनिर्वाह शेतीसाठी जमीन वापरावी. जर 'मालकाने' एक वर्षापेक्षा जास्त काळ जमीन कसली नाही किंवा ती बिगर-कृषी कामांसाठी वापरण्याचा प्रयत्न केला तर सरकारला ती जप्त करण्याचा अधिकार असेल.

भावे यांना शेतकऱ्यांनी शेतीसाठी बैल, ट्रॅक्टर किंवा इतर यंत्रांचा वापर सोडून द्यावा अशी इच्छा होती. हिंदीमध्ये याला ऋषी-खेती म्हणतात. भावे यांना लोकांनी कांचन-दानाच्या स्वरूपात पैशाचा वापर सोडून द्यावा, अशीही इच्छा होती. या चळवळीला काँग्रेसचा पाठिंबा होता. १९५३ मध्ये भूदान चळवळीत सामील होण्यासाठी जे. पी. नारायण यांनी सक्रिय



राजकारणातून माघार घेतली. भावे यांनी जमीनमालकांना त्यांच्या जमिनीचा एक तुकडा देण्यास भाग पाडण्यासाठी पायी भारत ओलांडला. त्यांना पहिले यश १८ एप्रिल १९५१ रोजी आंध्र प्रदेशातील नलगोंडा जिल्ह्यातील पोचमपल्ली गावात मिळाले. स्थानिक जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांनी हिंसक संघर्ष सुरू केला होता. चळवळीच्या आयोजकांनी भावे यांची पोचमपल्ली येथे राहण्याची व्यवस्था केली होती, जिथे सुमारे ७०० कुटुंबे राहतात. त्यापैकी दोन तृतीयांश कुटुंबे भूमिहीन होती. भावे यांनी हरिजन वसाहतीला भेट दिली. दुपारपर्यंत गावकरी त्यांच्याभोवती जमू लागले. हरिजनांनी चाळीस कुटुंबांसाठी ८० एकर (३२ हेक्टर) जमीन, चाळीस ओली, चाळीस कोरडी अशी मागितली.

व्ही. रामचंद्र रेड्डी यांनी सुरुवातीला त्यांच्या ३,५०० एकर (१४ किमी २ ) जमिनीपैकी १०० एकर (४० हेक्टर) जमीन दान केली. नंतर, त्यांनी ८०० एकर (३.२ किमी २) दान केली. त्यांच्यानंतर त्यांच्या मुलांच्या मदतीने भूदान ट्रस्ट चळवळीअंतर्गत जमीन दान चळवळ चालू राहिली. हैदराबादचे ७ वे निजाम मीर उस्मान अली खान यांनीही त्यांची १४,००० एकर (५७ किमी २ ) वैयक्तिक जमीन भूदान चळवळीला दान केली. राजा बहादूर गिरिवार नारायण सिंह, सीबीई आणि रांका (गढवा झारखंड) येथील राजा यांच्यासह इतर जमीनमालकांनी भूदान उपक्रमासाठी एकत्रित १०२,००१ एकर (४१२.७८ किमी २) एकर जमीन दान केली, जी भारतातील सर्वांत मोठी देणगी आहे. नमूद इस्टेटचे राजा बहादूर यांनीही भूदान उपक्रमासाठी १.०१ लाख एकर जमीन दान केली. रामगढ राजचे महाराजा कामाख्या नारायण सिंह बहादूर यांनी २००,००० एकर (८१० किमी २ ) जमीन विनोबा भावे आणि इतरांना बिहार भूदान यज्ञ कायद्यांतर्गत खटल्याच्या संस्थेच्या आधी दान केली, जी कोणत्याही राजाची सर्वांत मोठी देणगी ठरली. दरभंगा राजचे महाराजाधिराज कामेश्वर सिंह जी यांनी भूदान चळवळीत १.१७ लाख एकर जमीन दान केली.

विनोबा भावे यांच्या सूरजगड भेटीदरम्यान त्यांचे स्वागत मुख्याध्यापक रामबिलास शर्मा यांनी केले, ज्यांनी १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला झुनझुनू जिल्ह्यात भूदान चळवळीचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या चळवळीचा प्रारंभिक उद्देश स्वेच्छेने देणग्या मिळवणे आणि भूमिहीनांना वाटणे हा होता, परंतु लवकरच सर्व खासगी जमिनीच्या १/६ भागाची मागणी करण्यात आली. १९५२ मध्ये चळवळीने ग्रामदान (भेट म्हणून दिलेले गाव किंवा संपूर्ण गावाचे दान) ही संकल्पना व्यापक केली आणि जमिनीच्या सामान्य मालकीचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली. ग्रामदान अंतर्गत येणारे पहिले गाव उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यातील मंगरोथ होते. दुसरे आणि तिसरे ग्रामदान १९५५ मध्ये ओरिसामध्ये झाले. ही चळवळ गावदान किंवा ग्रामदान चळवळीत विकसित झाली आणि भारतात आणि भारतात दोन्ही ठिकाणी सर्वोदय समाज (सर्व सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेचा उदय) स्थापन करण्याच्या व्यापक चळवळीचा एक भाग होती. १९६० च्या दशकापर्यंत चळवळीने गती गमावली होती.

सर्वोदय समाज सामाजिक परिवर्तनासाठी दबाव निर्माण करणारी जनआंदोलन उभारण्यात अपयशी ठरला. तथापि, नैतिक द्विधा मनःस्थिती निर्माण करून, जमीनदारांवर दबाव आणून आणि भूमिहीनांना अनुकूल परिस्थिती निर्माण करून या चळवळीने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# पक्ष बदलाचे वाढते वारे

**जनमनाचे प्रतिध्वनी**

सध्या कपडे बदलावे तसे पक्ष बदलाचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. त्यात आपल्या महत्त्वाकांक्षा एखाद्या विशिष्ट पक्षात राहून पूर्ण होत नसल्याची त्यांची खंतही असू शकेल. मात्र, आपण आहे त्या पक्षात आपली पात्रता सिद्ध करू शकलो नाही अथवा जनमानसात आपला ठसा उपटवू शकलो नाही, याचा त्यांनी विचार केला की नाही याचीच शंका येते.

घराचे वासे फिरले किंवा जहाज बुडू लागल्यावर जशा पाण्यात उड्या मारून किनारा गाठायचा प्रयत्न केला जातो. परंतु त्यात किती जण किनारा गाठतात आणि किती जण पाण्यात बुडतात, हा संशोधनाचा विषय असला तरी या पक्षातून त्या पक्षात उडी घेत आपले राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्याचा खटाटोप काही राजकीय वारसा घेतलेल्या आणि स्वतःला सिद्ध करताना मोठी पदे मिळवूनही अपेक्षित इच्छित साध्य न झाल्याने दुसऱ्या गाडीला स्वतःला जुंपून घेतले आहे. गाडीवान मोठे हुशार आहेत, ते वापर झाल्यानंतर फेकून देतात. त्यावेळी न घरका न घाटका, अशी अवस्था होते हेच काही राजकीय व्यक्तींना समजत नसावे.

मालेगाव तालुक्यात सातत्याने काँग्रेसकडून मंत्रिपदे मिळविणाऱ्या दिवंगत माजी मंत्री प्रसाद हिरे यांनी पुन्हा भाजपात प्रवेश घेतला आहे. वास्तविक यापूर्वीही त्यांनी भाजपमध्ये पक्ष प्रवेश घेतला होता. पुन्हा काँग्रेसमध्ये आल्यानंतर भाजपात जाण्यात त्यांची कोणती दूरदृष्टी असावी. आपापल्या शिक्षण संस्था वाचविताना काही राजकीय नेते कसरत करीत आहेत.

जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष तुषार शेवाळे यांनीदेखील भाजपात प्रवेश केला. त्यांनी विद्यमान शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या विरोधात विधानसभेसाठी निवडणूक लढवून काट्याची लढत दिली होती. असे असताना त्यांना काय साक्षात्कार झाला आणि त्यांनीही भाजपात प्रवेश घेऊन मंत्री दादा भुसे यांचा प्रचार केला होता. अर्थात नेते त्यांची सोय पाहत बदल घडवून आणू पाहत असले तरी त्यामुळे का होईना भाजप अथवा त्यांनी प्रवेश केलेल्या पक्षांची ताकद वाढत आहे, हे निश्चित.

सन २००४ पासून अनेकदा काँग्रेसकडून आमदार झालेल्या दिवंगत शेख रशीद यांचे पुत्र आसिफ शेख यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. मात्र, विधानसभा निवडणुका येताच तेथेही त्यांचे मन रमले नाही. त्यांनी सरळ स्वतःचा मुस्लिम पक्ष काढला. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी करून पराभूत झाले ही गोष्ट अलहिदा.

राहता राहिला प्रश्न आमदार झालेल्या मौलाना मुफ्ती मोहंमद इस्माईल यांचा. प्रथम अपक्ष आणि जनसुराज्य पक्षाकडून आमदार झालेल्या मौलानांनी कोलांटउडी घेत एमआयएम पक्षात प्रवेश घेतला आणि आसिफ शेख यांचा पराभव करून आमदार झाले. तिकडे वर्षानुवर्षे जनता दलात राहिलेल्या समाजवादी विचारसरणीच्या दिवंगत नेते निहाल अहमद यांच्या कन्येनेही पक्षत्याग करून समाजवादी पक्षाकडून विधानसभा लढवली. त्यात त्या पराभूत झाल्या. मूलतः काँग्रेसी विचारांच्या पुष्पाताई हिरे यांचे चिरंजीव माजी मंत्री प्रशांत हिरे यांनी ही शिवसेना, राष्ट्रवादी असे पक्षबदल केले. त्याच वाटेवर त्यांच्या मुलांनीही पक्षबदल केले. कधी राष्ट्रवादी, भाजप आणि आता ठाकरे सेना असा त्यांचा प्रवास आहे. एकंदरीत या पक्ष बदलाचा या राजकीय नेत्यांना स्वतःची पत सांभाळताना राजकीय अस्तित्वासाठी पक्ष बदल करून झगडावे लागत आहे, त्याऐवजी जनाधार वाढविण्यासाठी किती प्रयत्न केला, हा संशोधनाचा विषय आहे.

**- शफीक शेख, नाशिक**

# भवरोगापासून मुक्ततेचा उपाय - सत्संगती व नामस्मरण

आपल्याला गुरू सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्याकरिता संत्संग करा आणि नामात राहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वतः अनुभव घेऊनच सांगत असतात. औषध सोपे असले म्हणून त्यात गुण नाही असे म्हणून कसे चालेल? तुकारामांनी आपल्या उपासनेची शपथ घेऊन सांगितले आहे की, नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. तुमचा हल्लीच्या साधूंवर विश्वास नसला तरी समर्थ आणि तुकाराम यांनी सांगितले त्यावर तरी विश्वास ठेवायला काय हरकत आहे? त्यांनी तुमच्या कल्याणाकरिताच ते साधन सांगितले आहे. ते तुम्ही न कराल तर त्यांचे काही नुकसान नाही, तुमचेच नुकसान आहे; तरी त्याचा विचार करा.




आपल्याला रोग झाला आहे अशी आपली अगोदर खात्री झाली पाहिजे, म्हणजे निम्मे काम झाले. आपल्याला रोग झाला आहे असे पक्के कळल्यावर आपण औषध घेण्याचे टाळणार नाही. ज्या योगाने सुख मिळेल त्याच्या खटपटीला लागले पाहिजे. त्याकरिता होईल तितके नामात राहण्याचा प्रयत्न करा.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन

संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस

संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस

मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६

विभागीय कार्यालये :

सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.

मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००

दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.

'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.

e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

RNI REG. No.1934/57

**बाजार - कंपन्या - मनोरंजन**



## सजना चित्रपटातील धमाल गाणं 'बुंगा फाइट' सर्वत्र धुमाकूळ घालतंय

**मुंबई :** मराठी गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर एक चांगला ट्रेंड सेट केलाय. सर्वत्र मराठी गाणी वाजताय आणि गाजताय सुद्धा. अशातच आणखी एका मराठी गाण्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय. शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं बुंगा फाइट हे मराठी गाणंही आता रसिकांच्या पसंतीस उतरतंय. त्यामुळे सोशल मीडियावर सध्या याच गाण्याची चर्चा सुरु आहे. सजना चित्रपटातला बुंगा फाईट हे गाणं एक पॉप्युलर डान्स नंबर ठरत आहे ह्यात काही शंका नाही. प्रेक्षक आत्ताच ह्या गाण्यावर थिरकायला लागली आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये हे गाणं वाजतय, प्रेक्षक डान्स करताना दिसत आहेत. अशातच आता प्रेक्षकांना हे गाणं लाइव्ह सुद्धा ऐकायला मिळालं. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांनी हे गाणं गायलं आहे आणि नुकतच त्यांनी प्रेक्षकांचं लाईव्ह मनोरंजन केलं आणि त्यांना प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आपल्या चाहत्यांसाठी त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी परफॉर्म केलं. 'सजना' सिनेमातील बुंगा फाइट हे गाणं नक्कीच प्रेक्षकांना वेड लावत आहे हे आनंद शिंदे यांनी पटवून दिलंय. इतकच नव्हे तर या गाण्याने २.५ मिलियन व्ह्यूजचा आकडा पार केलाय. गावरान भाषा आणि लोकसंगीताची छाप या गाण्यात पहायला मिळते. बुंगा फाइट या गाण्याला ओंकारस्वरूप ह्यांनी संगीत दिलं आहे. तर सुहास मुंडे यांचे शब्द आहेत. 'सजना' चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. 'सजना' २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

## सुवर्णा नागरी पतसंस्थेस १ कोटी ३४ लाखांचा नफा

**नाशिक :** सन १९९५ मध्ये सहकारमहर्षी स्व. भास्कर कोठावदे





यांनी स्थापन केलेल्या सुवर्णा नागरी सहकारी पतसंस्थेस १ कोटी ३४ लाखांचा नफा झाला असल्याची माहिती चेअरमन अविनाश कोठावदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संस्थेची सभासद संख्या ४८५७, वसूल भागभांडवल २ कोटी ०६ लाख, ठेवी ५९ कोटी ७१ लाख, कर्ज ४५ कोटी ९१ लाख, गुंतवणूक २९ कोटी ११ लाख, स्वनिधी १५ कोटी ५१ लाख, खेळते भांडवल ७८ कोटी ८५ लाख, एकत्रित व्यवसाय १०६ कोटी, शाखा विस्तार प्रशासकीय कार्यालयासह शाखा ५ आहे. सभासद कर्जदारांकडून चांगल्या प्रकारे वसुली झाल्यामुळे या वर्षी नफ्याचे प्रमाण वाढले व थकबाकी कमी झाली. त्यामुळे सभासदांना या वर्षीसुध्दा १५ टक्के लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे, असे संस्थेचे सरव्यवस्थापक प्रमोद बधान यांनी सांगितले. संस्थेच्या प्रगतीत संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक, सल्लागार सदस्य, सेवकवृंद व अल्पबचत प्रतिनिधी यांचा मोलाचा सहभाग आहे, असे संस्थेचे व्हा. चेअरमन केशव वाणी यांनी सांगितले.

# भारतापुढे चीनची शरणागती अटी मान्य करण्याची तयारी

## ट्रम्प टॅरिफनंतर अमेरिकेत चीनची उत्पादने महाग

**नवी दिल्ली : ट्रम्प टॅरिफनंतर अमेरिकेत चीन उत्पादन खूप महाग झाले आहे. त्यामुळे चीन कंपन्या भारतातील आपला व्यवसाय कमी होऊ देणार नाही. या कंपन्या सरकारच्या सर्व अटी मान्य करण्यास तयार झाल्या आहेत. चिनी कंपन्यांसोबत ज्वाइंट व्हेचर्सला मंजुरी देण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला आहे.**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनला शरणागती पत्करण्यास लावतील, अशी अपेक्षा सर्व जग व्यक्त करत होते. परंतु चीन अमेरिकेपुढे झुकला नाही. मात्र, चीनला नमवण्याचे काम भारताने करुन दाखवले आहे. अमेरिका-चीनमधील टॅरिफ वॉरचा फायदा भारताने उचलला आहे. भारताच्या सर्व अटी चीनने मान्य केल्या आहेत. चीनी कंपन्या भारताच्या अटींवर देशात गुंतवणूक करण्यास तयार झाल्या आहेत. दीर्घ काळापासून चीन या अटी मान्य करत नव्हता. शंघाई हायली ग्रुप आणि हायर यासारख्या कंपन्याही भारताच्या अटींवर गुंतवणूक करण्यास तयार झाल्या आहेत.

ज्या कंपन्या भारतीय कंपनीसोबत करार करून गुंतवणूक करतील, त्याची कमी हिस्सेदारी चीन कंपन्यांकडे हवी, अशी अट भारताने ठेवली होती. त्यासाठी चीनी कंपन्या तयार होत नव्हत्या. परंतु अमेरिकेने वाढवलेल्या टॅरिफमुळे आता चीन त्यासाठी तयार झाला आहे.

चीनमधील सर्वात मोठी कंप्रेसर मेकर कंपनी शंघाई हायलीने टाटा ग्रुपच्या व्होल्टाससोबत मॅन्युफॅक्चरिंग ज्वाइंट व्हेंचरसाठी चर्चा सुरु केली होती. आता चीन कंपनी कमी वाटा घेण्यास तयार झाली आहे.

भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स बाजारात विक्रीसंदर्भात तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या हायर कंपनीने कमी हिस्सेदारी घेण्याची तयारी दर्शवली आहे. चिनी कंपन्या आपला व्यवसाय गमावू इच्छित नाही. भारत एक मोठे मार्केट आहे, हे लक्षात घेऊन टॅरिफ वॉरनंतर दोन पावले मागे जाण्यास या कंपन्या तयार झाल्या आहेत.

ट्रम्प टॅरिफनंतर अमेरिकेत चीन उत्पादन खूप महाग झाले आहे. त्यामुळे चीन कंपन्या भारतातील आपला व्यवसाय कमी होऊ देणार नाही. या कंपन्या सरकारच्या सर्व अटी मान्य करण्यास तयार झाल्या आहेत. चीनी कंपन्यांसोबत ज्वाइंट व्हेचर्सला मंजुरी देण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला आहे.

शंघाई हाईली एका टेक्निकल भागीदारीसाठी तयार आहे. त्याअंतर्गत प्रॉडक्शन लायन्स आणि तंत्रज्ञान वर्ग करण्यास ही कंपनी तयार आहे. शांघाय हैलीने अलीकडेच पीजी इलेक्ट्रोप्लास्टसोबत एसी कॉम्प्रेसर तयार करण्यासाठी तांत्रिक सहयोग केला आहे. ज्या अंतर्गत ते तंत्रज्ञान सामायिक करेल. करारात कोणताही इक्विटी क्लॉज नाही. पीजी पुण्याजवळ ३५० कोटी रुपये खर्चून वार्षिक ५ दशलक्ष युनिट्स क्षमतेचा प्लांट उभारत आहे.




## कैटरपिलर करणार १०० मिलियन अमेरिकी डॉलरची गुंतवणूक

**मुंबई :** जागतिक स्तरावर अग्रगण्य बांधकाम आणि खाण उपकरणे, ऑफ-हायवे डिझेल आणि नैसर्गिक वायू इंजिन, औद्योगिक वायू टर्बाइन आणि डिझेल-इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हची उत्पादक कंपनी कैटरपिलर इंक. आपले ऐतिहासिक १०० वर्षे पूर्ण केले आहे.

याप्रसंगी कैटरपिलर इंक. ने जागतिक स्तरावर पुढील पाच वर्षांत १०० मिलियन अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीचा संकल्प केला आहे, जेणेकरून भविष्यातील कार्याला आवश्यक कौशल्ये प्रदान केली जाऊ शकतील.

कैटरपिलरच्या इंडिया कंट्री मॅनेजर आणि वाइस प्रेसीडेंट - इंटीग्रेटेड कंपोनेंट सॉल्यूशंस इंजिनिअरिंग डिव्हिजनचे भुवन आनंदकृष्णन म्हणाले की, कैटरपिलरमध्ये नवोन्मेष आणि ग्राहक-केंद्रितता ही आपली यशाची मूलभूत आधारशिलापण आहे. जेव्हा आपण जागतिक स्तरावर १०० वर्ष आणि भारतात ५० हून अधिक वर्षांचा प्रवास पूर्ण करीत आहोत, तेव्हा आपल्या उपलब्धींच्या मागे आमचे मेहनती कर्मचारीच प्रमुख शक्ती आहेत. त्यांचे समर्पण फक्त भारताच्या वाढत्या आवश्यकतांची पूर्तता करत नाही, तर जागतिक स्तरावर नवीन मानकही स्थापित करतात. आम्ही एक अधिक टिकाऊ, कार्यक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत भविष्याच्या निर्मितीसाठी कटिबद्ध आहोत - आणि एकत्रितपणे पुढील शतकामध्ये प्रगतीस आकार देऊ.

भारतात गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असताना, कैटरपिलरने देशाच्या अधोसंरचनेच्या निर्मिती आणि औद्योगिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारताच्या जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उभरत्या महत्त्वाच्या पार्श्वभूमीवर, कैटरपिलर देशाच्या औद्योगिक आणि अधोसंरचना संबंधी लक्ष्यांच्या प्राप्तीसाठी निरंतर सहकार्य प्रदान करण्यास कटिबद्ध आहे.

## टाटा पॉवरने हरित ऊर्जा परिवर्तनाची वाढवली गती

**नाशिक :** सार्वजनिक पायाभूत सोयीसुविधांना सौरऊर्जा सक्षम बनवण्याच्या महाराष्ट्र राज्य सरकारच्या उपक्रमाच्या समर्थनार्थ टाटा पॉवरने राज्यभरात २३० पेक्षा जास्त सार्वजनिक संस्थांना यशस्वीपणे सौरऊर्जा सक्षम बनवले आहे. हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलून टाटा पॉवरने एकूण जवळपास १०७ मेगावॅट शुद्ध ऊर्जा क्षमतेचे योगदान दिले आहे.

सौरऊर्जा सक्षम संस्थांमध्ये प्रमुख जिल्ह्यांमधील १०० रुग्णालये (३.६ मेगावॅट), ६४ शाळा (२ मेगावॅट) आणि ७२ सरकारी व इन्स्टिट्यूशनल इमारतींचा (१०० मेगावॅट) समावेश आहे. टाटा पॉवरची ही सर्व इन्स्टॉलेशन्स एकूण १.३ लाख टन कार्बन डाय ऑक्साइड उत्सर्जन रोखत आहेत, ज्यामुळे होणारा प्रभाव २० लाख झाडे लावण्याइतका आहे.

हे प्रयत्न भारतातील शुद्ध ऊर्जा परिवर्तनाला सक्षम बनवण्याच्या आणि समुदायावर केंद्रित सस्टेनेबिलिटीचे समर्थन करण्याप्रति टाटा पॉवरच्या सर्वसमावेशक वचनबद्धतेचा एक भाग आहेत. देशातील सर्वांत विश्वसनीय आणि जबाबदार ऊर्जा कंपन्यांपैकी एक, टाटा पॉवर महत्त्वपूर्ण सार्वजनिक सुविधांना सौरऊर्जा सक्षम बनवून, ऊर्जेसाठी येणारा खर्च कमी करण्यात, ऊर्जा विश्वसनीयतेमध्ये सुधारणा करण्यात आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यात मदत करत आहे. ही कंपनी अक्षय ऊर्जा सोल्यूशन्स देण्यासाठी सरकारी संस्थांसोबत मिळून काम करत आहे.

## स्कोडाची ऑल-न्यू स्कोडा कोडियक कार लाँच

**मुंबई :** स्कोडा कायलॅक श्रेणीच्या यशस्वी लाँचनंतर स्कोडा ऑटो इंडिया आता त्यांची लक्झरी ४४ एसयूव्ही कोडियकच्या ऑल-न्यू जनरेशनच्या लाँचसह स्पेक्ट्रकच्या दुसऱ्या बाजूस नवीन कारची घोषणा करत आहे. भारतात व जगभरात सेकंड जनरेशन असलेली नवीन कोडियक लक्झरी, सुधारणा, ऑफ-रोड क्षमता, ऑन-रोड गतिशीलता आणि सात-आसनी विविधतेच्या सिग्नेचर संयोजनासह भारतामध्ये लाँच करण्यात आली आहे. त्याची कोडियाक स्पोर्टलाइन (एक्स-शोरूम)ची किंमत ४६,८९,००० आणि सेलेक्शन एल अँड केची किंमत ४८,६९,००० आहे. बुकिंग्जना आजपासून सुरुवात, तसेच ग्राहक डिलिव्हरीजना २ मेपासून सुरुवात होईल.



ॲर्गो फ्रंट सीट्समुळे लक्झरी स्टँडर्ड आणखी वाढला आहे, ९ एअरबॅग्ज, स्लाइडिंग पॅनोरॅमिक सनरूफ आणि सर्वोत्तम ऑडिओ अनुभवासाठी ७२५ वॅट कॅन्टॉन साऊंड सिस्टमसोबत १३ स्पीकर्स व सब-वूफर यासह सुरक्षितता व आरामदायीपणाला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, रिअर विंडोजमधील रोलिंग सबब्लाइण्ड्स गोपनीयता आणि प्रवासी आरामदायीपणामध्ये अधिक वाढ करतात.

ऑल-न्यू कोडियक सहा रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे : मून व्हाइट, मॅजिक ब्लॅक, ग्रॅफाइट ग्रे, वेल्वेट रेड, रेस ब्ल्यू. याव्यतिरिक्त, सिलेक्शन एलअँडके व्हेरिएण्ट विशेष ब्रॉन्क्स गोल्ड रंगामध्ये उपलब्ध आहे आणि स्पोर्टलाइन विशेष स्टील ग्रे रंगामध्ये उपलब्ध आहे. संचालक पीटर जनेबा म्हणाले, मार्चमध्ये आम्ही भारतात आतापर्यंतच्या सर्वाधिक मासिक विक्रीची नोंद केली, ज्याला कायलॅक लाँचमुळे गती मिळाली आणि कुशक व स्लाव्हियाचा पाठिंबा मिळाला. हे आम्ही या वर्षात स्थापित करण्याचा मनसुबा ठेवलेल्या अनेक नवीन रेकॉर्ड्सपैकी एक आहे. आमच्या उत्पादन ऑफेन्सिव्ह धोरणाशी बांधील राहत ऑल-न्यू कोडियकच्या लाँचमधून स्कोडाची लक्झरी व तंत्रज्ञान क्षमतेसह आमच्या उत्पादन स्पेक्ट्रमची दुसरी बाजू दिसून येते.

स्कोडा ऑटोची प्रीमियर ४४ मध्ये २.० टीएसआय इंजिनची शक्ती आहे, जे १५० केडब्ल्यू शक्ती आणि ३२० एनएम टॉर्कची निर्मिती करते. ही शक्ती व टॉर्क सेव्हन-स्पीड ड्युअल क्लच डीएसजी ऑटोमॅटिकच्या माध्यमातून दोन्ही ॲक्सल्समध्ये वितरित केले जाते.

## सेल्विन ट्रेडर्सने 'माजघर' केले लाँच

### पाककृती उत्क्रांतीचा एक नवीन अध्याय




**अहमदाबाद :** एसडीएफच्या सहकार्याने सेल्विन ट्रेडर्स लि.ने भारताच्या पाककृती किरकोळ लँडस्केपचे रूपांतर करण्याच्या धाडसी पावलाने, अहमदाबाद येथील सन एन स्टेप क्लब, सतधार,चार रास्ता, मेमनगर, सोला रोड, येथे 'माजघर' या ब्रँड नावाने पहिल्या घरगुती दुकानाची सुरूवात केली आहे. ही सुरुवात म्हणजे माजघरच्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय विस्ताराची सुरुवात आहे.

आधुनिक किरकोळ लेन्सद्वारे प्रादेशिक स्वाद पुनरुज्जीवित करण्याच्या दृष्टीने, सेलविन ट्रेडर्स लि. फ्रँचायझी मॉडेल अंतर्गत पुढील १२ महिन्यांत देशातील १२ मोठ्या शहरांमध्ये १२ नवीन आउटलेट उघडण्याची योजना आखत आहे. यासाठी १५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून त्यातून २३.५ कोटी रुपयांचा महसूल तयार होणार आहे. यामुळे उच्च-गुणवत्तेच्या खाद्य उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे समृद्ध वारसा चालविला जातो.

माजघराने समकालीन स्वभावासह भारताच्या पारंपरिक स्वयंपाकघरांचे सार एकत्र केले आहे. आउटलेटमध्ये तांदूळ, डाळी, वाळलेले पदार्थ, ग्लूटेन-फ्री उत्पादने, मसाले, पापड्स, मसाला चहा, मुखवास आणि जामुन हनीसारख्या अनोख्या गॉरमेट ऑफरचे उत्कृष्ट वर्गीकरण आहे. आधुनिक ग्राहकांच्या विकसनशील अभिरुचीनुसार भाग घेताना प्रत्येक उत्पादन भारताच्या पाककृतीच्या मुळाशी खोल कनेक्शन प्रतिबिंबित करते. त्याच्या घरगुती वाढीच्या समांतर एसडीएफ आणि सेलविन ट्रेडर्स लि. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर आपली दृष्टी निश्चित करीत आहे. कंपन्या त्यांचे निर्यात नेटवर्क मिडल ईस्ट, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि रशियासह आदी क्षेत्रांमध्ये सक्रियपणे विस्तार करीत आहेत. त्यांच्या जागतिक पोर्टफोलिओमध्ये ताज्या भाज्या, प्रक्रिया केलेले पदार्थ, तृणधान्ये, आंबा लगदा आणि सल्फर-कमी गूळ यांची क्युरेट केलेली निवड आहे. सर्व शुद्धता, पोषण आणि पारंपरिक भारतीय चव यावर केंद्रित आहे.

प्रीमियम भारतीय आंबे, विशेषत: अल्फान्सो आणि गिर केसर यावर विशेष भर देण्यात आला असून, जे वाढत्या जागतिक मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रक्रिया केलेल्या लगदा स्वरूपात निर्यात केली जात आहेत. अल्फान्सो त्याच्या उच्च, गोडपणासाठी ओळखला जातो, तर गिर केसर-गुजरातमधील आंब्यांचा राजा म्हणून सेन्लेब्रेटेड-एक सोनेरी रंग आणि केशरसारखी त्याची चव आहे. कोकण किनारपट्टी आणि गिर जंगलात वाढलेले हे वाण भारतीय फळांच्या उत्कृष्टतेचे प्रमाण आहे.

या विस्ताराच्या मध्यभागी शेतकरी हा एक प्रथम दृष्टिकोन आहे. भारतीय शेतकऱ्यांकडून थेट सोर्सिंग करून, ग्रामीण समुदायांचे सबलीकरण करताना ग्राहकांसाठी प्रीमियम गुणवत्ता सुनिश्चित करण्याचे एसडीएफ आणि सेलविनचे लक्ष्य आहे. हे फार्म-टू-मार्केट मॉडेल नैतिक सोर्सिंग, वाजवी व्यापार आणि उत्पादकांसाठी उच्च उत्पन्नास प्रोत्साहित करते, ज्यामुळे राहणीमान आणि दीर्घकालीन टिकाव सुधारित करते.

## छत्रपती संभाजीनगर, चाकणमध्ये टेस्लाचा ईव्ही प्रकल्प

**पुणे :** पुण्यातील चाकण आणि देशातील मोठे औद्योगिक शहर छत्रपती संभाजीनगरातील उद्योगविश्वासाठी अमेरिकेतून आनंदवार्ता येऊन धडकली आहे. मराठवाड्याच्या सांस्कृतिक राजधानीत ऑरिक सिटी, वाळूज, बजाजनगर, चित्तेगाव, चिकलठाणा, शेंद्रा पंचतारांकित असा उद्योगजगताचा पसारा वाढत आहे. त्यात जागतिक कंपन्यांची भर पडत आहेत. या मालिकेत आता जगातील सर्वांत मोठी इलेक्ट्रिक कार निर्मिती करणारी कंपनी टेस्लाची भर पडण्याची दाट शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी

### पंतप्रधान मोदी - एलॉन मस्क यांच्यात संवाद




आणि जागतिक अब्जाधीश एलॉन मस्क यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा झाली आहे. त्याचा मोठा फायदा या दोन औद्योगिक शहरांना होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एलॉन मस्क यांच्यात आज, १८ एप्रिल रोजी दूरध्वनीवर चर्चा झाली. पंतप्रधानांनी या चर्चेची माहिती त्यांच्या सोशल मीडिया एक्सच्या अधिकृत हँडलवरून दिली आहे. यावर्षी मोदी आणि मस्क यांच्यात वॉशिंग्टन येथे बैठक झाली होती. त्यावेळी जे मुद्दे चर्चिले गेले होते. त्यासह इतर मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती मोदींनी दिली. तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण प्रयोग या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन भागीदारीबाबत चर्चा झाली. भारत या क्षेत्रात अमेरिकेसोबत भागीदारीसाठी वचनबद्ध आहे. यावर्षी १३ फेब्रुवारी रोजी ब्लेअर हाऊसमध्ये मस्क आणि मोदी यांच्यात बैठक झाली होती.

## पोस्ट ऑफिसच्या सेव्हिंग अकाउंटला मिळतात बँकेपेक्षा जास्त व्याजदर

### मिनिमम बॅलेन्स फक्त ५०० रुपये

**नवी दिल्ली :** आजच्या या डिजीटल युगात सर्व भारतीयांकडं बँक अकाउंट आहे. पण SBI- HDFC पेक्षाही इंडियन पोस्ट बँकेत सर्वाधिक व्याज ग्राहकांना दिला जातो. आणि या बँकेची मिनिमम बॅलेन्स पॉलिसी देखील खूप कमी आहे. पोस्ट अकाउंटमध्ये खाते ओपन करण्याचे फायदे काय आहेत? जाणून घेऊयात. आजच्या घडीला सर्वांकडे सेव्हिंग खाते आहे. पण इतर बँकांच्या तुलनेत इंडियन पोस्ट बँकेत सेव्हिंग अकाउंट ओपन केल्याचे अनेक फायदे आहेत. या बँकेत इतर बँकांच्या तुलनेत जबरदस्त व्याजदर मिळतो. दुसरा फायदा मिनिमम बॅलन्सचा आहे. यात फक्त ५०० रुपये मिनिमम बॅलन्स हवंय. पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते उघडण्याचे अनेक फायदे आहेत. पहिले म्हणजे, यातील व्याजदर सर्व बँकांपेक्षा चांगला आहे. दुसरा फायदा म्हणजे किमान शिल्लक मर्यादा देखील अगदी नाममात्र आहे, जी कोणीही सहजपणे राखू शकते. पोस्ट ऑफिस बचत खात्यावर तुम्हाला बँकांपेक्षा खूप चांगले व्याज मिळते. पोस्ट ऑफिस बचत खात्यावरील व्याजदर ४.०% आहे.

# सोन्यामध्ये गुंतवणूक : एक दीर्घकालीन धोरण

**मुंबई :** १८ मार्च २०२५ रोजीच्या स्थितीनुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किमती प्रथमच USD ३,००० प्रति औंसच्या पातळीवर पोहोचल्या असून, मागील १८ महिन्यांपासून त्या सातत्याने वाढत आहेत. कोविड-१९ नंतर, २८ सप्टेंबर २०२२ रोजी सोन्याची किंमत USD १,६१८ प्रति औंस इतकी घसरली होती. त्यानंतर २६ मार्च २०२५ पर्यंत सोन्याच्या किमतींमध्ये सुमारे ८७% वाढ झाली आहे (USD मूल्यांनुसार). या वाढीचे मुख्य कारण म्हणजे जागतिक भू-राजकीय अनिश्चितता, मध्यवर्ती बँकांकडून होणारी मोठ्या प्रमाणातील खरेदी, डॉलरच्या मूल्यात झालेली घट आणि वाढती महागाईची भीती. या सर्व कारणांमुळे सोने सुरक्षित गुंतवणूक पर्याय (safe-haven asset) म्हणून अधिक महत्त्वपूर्ण ठरत आहे.

सोने हे जगभरातील विविध संस्कृतींमधील एक समान दुवा राहिला आहे. याचा उपयोग मेसोपोटेमियन (सध्याचे इराक), इजिप्शियन, ग्रीक आणि रोमन अशा प्राचीन संस्कृतींपासून केला जात आहे. प्राचीन काळात सोन्याचा उपयोग दागदागिन्यांसाठी, धार्मिक पूजावस्तूंसाठी, कला आणि शिल्पकलेसाठी, भांडी, वास्तुकलेतील सजावट, दफन विधीतील मुखवटे आणि नाणी बनवण्यासाठी केला जात असे.

सोने त्याच्या सौंदर्य, दुर्मिळता, उपयुक्तता आणि बहुपर्यायी वापरामुळे अत्यंत मौल्यवान मानले जाते, आणि आधुनिक जीवनाच्या जवळपास प्रत्येक क्षेत्रात त्याचा वापर आढळतो. इतिहासातही सोने हे आर्थिक व्यवहारात महत्त्वाचे राहिले असून, जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून चलनाच्या मूल्याच्या आधारस्तंभ म्हणून राखीव ठेव म्हणून वापरले गेले आहे. आधुनिक वित्तीय व्यवस्थेत, सोन्याचा



**विकाश वाडेकर**
**प्रमुख - पॅसिव्स, ॲक्सिस म्युच्युअल फंड**

उपयोग विविध प्रकारे केला जातो. गुंतवणूकदार त्यांच्या मालमत्तामध्ये (asset allocation) सोन्याचा समावेश करतात कारण त्याचा समभाग बाजाराशी निगडित संबंध कमी किंवा नकारात्मक असतो, ज्यामुळे गुंतवणूक पोर्टफोलिओची अस्थिरता कमी करण्यात मदत होते.

सोन्यात गुंतवणूक का करावी कारणे महागाईपासून संरक्षण : ऐतिहासिकदृष्ट्या सोन्याने आपल्या मूल्यात सातत्य ठेवले आहे, त्यामुळे ते महागाईपासून संरक्षण करणारे साधन मानले जाते. जेव्हा चलनाची खरेदी क्षमता घटते, तेव्हा सोन्याच्या किमती वाढतात आणि गुंतवणूकदारांचे संपत्तीचे मूल्य टिकवून ठेवण्यात मदत होते.

सुरक्षित आश्रय असलेली संपत्ती: भू-राजकीय अस्थिरता किंवा आर्थिक अनिश्चिततेच्या काळात, सोने हे सुरक्षित आश्रय मानले जाते. अशा वेळी बाजारातील अस्थिरतेपासून बचाव करण्यासाठी गुंतवणूकदार आपली भांडवली सुरक्षा राखण्यासाठी सोन्याकडे वळतात.

विविधीकरण: सोने इतर मालमत्ता वर्गांशी - जसे की समभाग आणि रोखे- यांच्याशी कमी किंवा नकारात्मक संबंधित असल्यामुळे, ते विविधीकरणाचे फायदे देते. गुंतवणूक पोर्टफोलिओमध्ये सोन्याचा समावेश केल्यास एकूण जोखीम कमी होऊ शकते आणि परतावा सुधारू शकतो.

**सोन्यात गुंतवणूक कशी करावी?**

सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी एखादी व्यक्ती सोन्याची नाणी, बिस्किटे किंवा दागिने खरेदी करू शकते. मात्र, भौतिक स्वरूपातील सोन्यात गुंतवणुकीस काही मर्यादा असतात. यामध्ये साठवणूक आणि सुरक्षेचा खर्च, चोरीचा धोका, विक्रीच्या वेळी द्रवतेचा (liquidity) अभाव आणि शुद्धतेबाबत शंका यांचा समावेश होतो. विशेषतः दागिन्यांच्या बाबतीत, घडवण्याचा खर्च हा अतिरिक्त खर्च म्हणून लागतो.

तरलता : सोने ही अत्यंत तरल मालमत्ता आहे, जी जागतिक बाजारात सहज विकत घेता किंवा विकता येते. विशेषत: Gold ETFs हे भौतिक सोने साठवण्याच्या त्रासांशिवाय, सोन्यात गुंतवणूक करण्याचा सोपा आणि किफायतशीर पर्याय प्रदान करतात. मध्यवर्ती बँकांची मागणी : जगभरातील मध्यवर्ती बँकांकडे मोठ्या प्रमाणात सोन्याचा साठा आहे आणि त्या सतत नव्या खरेदी करत असतात, ज्यामुळे सोन्याच्या किमतींना आधार मिळतो. ही सातत्यपूर्ण मागणी जागतिक आर्थिक व्यवस्थेत सोन्याचे महत्त्व अधोरेखित करते. संपत्ती व्यवस्थापन : सोने शतकानुशतके मूल्य संचयाचे साधन राहिले आहे आणि आजही भावी पिढ्यांसाठी संपत्ती जपवण्यासाठी एक विश्वासार्ह माध्यम मानले जाते. याचे अंतःस्वरूप मूल्य आणि सार्वत्रिक स्वीकार्यता यामुळे ते एक टिकाऊ मालमत्ता ठरते.

गांवकरी लाईफ स्टाईल
नाशिक, शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५

# नैतिकता

**नैतिकता हा शब्द जितका वजनदार आहे, त्यापेक्षा त्याचं पावित्र्य वजनदार आहे. पण, ज्या पद्धतीने सध्या आपली सोय हीच नौतिकता आहे असं इतरांच्या वर बिंबवलं जातंय, ते मात्र कठीण आहे. जीवनातील कठिण तपस्या असणारी नैतिकता ही चारित्र्याशी परस्परपूरक असते. चारित्र्यातूनच नीतीचा जन्म होतो. नीतिमान होण्यासाठी चरित्र सांभाळावं लागतं. पण या सगळ्याचा काडीमात्र संबंध नसणारी माणसंदेखील आपणच कसे सर्वश्रेष्ठ नीतिमान आहेत व आपण सोडता इतरांना ती कळतदेखील नाही हे सिद्ध करण्यासाठी जोरदार प्रयत्न करताना दिसत आहेत. पण हेच प्रयत्न हस्यास्पद असूनदेखील हे सत्य कोणीही सहजासहजी मान्य करणार नाही. आपली सोय हीच नैतिकता या नव्या नीतीचा बोलबाला सध्या सर्वच क्षेत्रात रूढ होतोय.**


गणेश खाडे

आपलं हित, आपला लाभ, आपल्या सोयीची परिस्थिती त्याला नैतिकतेचा मुलामा देऊन आपला वारू दामटायचा हा नवा ट्रेण्ड सुरू झाला असून, याचा अनियंत्रित वापरदेखील सुरू आहे. पण यामुळे भविष्यातील स्थिती नक्कीच वाईट असेल.

मुळात नीती काय असते हेच माहीत नसणारी माणसं सध्या नैतिकतेचा पाठ इतरांना शिकवत आहेत. हेच खूप मोठं आश्चर्य आहे. म्हणजेच असत्याच्या साम्राज्यातच नैतिकतेचा पाऊस पडतोय असंच काहीसं चित्र निर्माण झालं आहे. व्यक्तिगत स्वार्थापलीकडे जाऊन धन, द्रव्य, संपदा, पद, सत्ता हे नीतीसमोर पालापाचोळ्यासारखे म्हणजे ञण समान असतात याचं वास्तवदर्शन आपल्याला आचरणातून जगासमोर आदर्शत्वाची परिभाषा निर्माण करणारी याच मातीतील माणसं इतिहासात अमर झाली. पण सध्या प्रत्येक क्षेत्रात अल्पावधीतच पुढे जाण्याचा जो नवा ट्रेण्ड आला आहे, तो फार लोकप्रिय झाल्यामुळे सध्या व्यक्तिगत स्वार्थ एवढ्या प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे की तो साधण्यासाठी तत्त्व, निष्ठा, पायदळी तुडवणारी माणसं नैतिकतेला आपल्या सोयीनुसार आपल्या भोवती फिरवत आहे. त्यामध्ये आत्मा, मानवता, सत्य हे सगळं वाहून गेलं. प्रत्येक जण आपण केलेली कृती हीच नैतिकता आहे हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असल्याने हे सगळं चित्र पाहून स्वतः नैतिकता हीच कदचित चिंताग्रस्त झाली असेल अथवा अनैतिकता ही लज्जास्पद होत असेल.



नैतिकता, नीतिमत्ता पायदळी तुडवून आपण किती नीतिवान आहोत हे दाखवण्यासाठी निर्माण झालेली प्रचंड स्पर्धा पाहून अनैतिक क्षरम्सार तर होतच आहे, पण हे दुर्भाग्यपूर्ण असून, अर्थाने मानवतेला काळिमा फासणारी बाब आहे. मानवता काय असते. मानवतेचा पायाच नीती असते. ज्याला आपण अंतरात्म्याचा आवाज पण संबोधतो. पण आजकाल अंतरआत्मा जिवंत आहे का? हा प्रश्न निर्माण होत आहे. मग आत्माच जिवंत नसेल तर त्याचा आवाज तो कसा येईल आणि तो कळणार तरी कसा आहे. नैतिकता बोलण्याची बाबा नाही तर ती आचरणात असायला हवी. पण आचरणात आणायला कोणीही तयार नसून, फक्त आपणच नैतिकतेचे पुजारी कसे आणि किती जास्त असून, उत्तम नीती तत्त्वावर आचरण करतोय हे जगाला दाखविण्यासाठी मात्र कोणीही कमी पडताना दिसत नाही. हे मात्र अजब गजब आहे. पण या सगळ्या खोट्या खेळातून बाहेर पडून एक टक्का जरी नीतिमान होता आलं तरी जीवन सार्थक होईल.





# मन करा रे प्रसन्न..

## दीन

गिरीश उदास
९४२२७६३४१२

आजकालच्या धकाधकीच्या जमान्यात माणूस अनेक बाबींनी त्रस्त आहे. सुखापेक्षा दु:खाचे प्रसंग जास्त वाट्याला येतात. अशा अप्रिय मानसिक वा शारीरिक व्याधीतून किंवा अनुभूतीपासून आपली सुटका करून घ्यायची धडपड आपण नित्य करीत असतो. वेदना, यातना, कळ, दु:ख, व्यथा, शूळ, क्लेश, व्याधी इ. ची परिणिती माणसाला दीनत्वाकडे नेते.

**क्षूधार्त : शत्रूपीडिता**
**रोगार्तः ।**
**दरिद्र्यर्तः दीनार्तः**
**कार्यसाधकः ।।**

ज्याला भूक लागली आहे तो शत्रूंनी ग्रासला आहे. तो रोगाने जर्जर झालेला, संपत्ती धन जवळ नसलेला दरिद्री हे सर्वजण आलेल्या तत्कालीन समस्येपासून सुटका करून घेण्यासाठी दीनवाणे होतात आणि भगवंताचा धावा करतात. परंतु यांचं दीनत्व काही खरे नव्हे. कारण कार्यभाग सरताच म्हणजे भूक भागल्यावर, शत्रुपीडा, रोग, दरिद्र्य गेल्यावर दीनत्व संपतं आणि त्याबरोबर भगवंताचं स्मरणही. आपली श्रद्धा दुर्दैवाने वेळेनुरूप बदलते. देव आपल्या मदतीस धावून येतो. आपले काम होते. मग गरज सरो आणि वैद्य मरो ही म्हण आपण पुन्हा एकदा खरी करतो. हे तात्पुरते दीनत्व....

परमेश्वर चरणी दीन होऊन शरण जाणे हे खरे दीनत्व; कारण यात कार्यसाधक हा भाव नाही. परमेश्वरा मी अनेक व्याधी किंवा समस्यांनी ग्रासलेला आहे. परंतु त्याची मला चिंता नाही. मी तुला अनन्य भावांनी शरण आलो असून, तू माझा अंगीकार कर, मला तुझ्यात सामावून घे, अशा दृढभावाने मी तुला शरण आलो आहे. अशी शरणागतीची साधण्यासाठी अंतर्मुखता, अहंकाराचा त्याग, मी आणि माझेपणाच्या भावनेचा त्याग, माझे कर्तेपण ईश्वरात विसर्जित करणे, नामस्मरण इ. साधने आहेत. थोडक्यात शरणागती म्हणजे भगवंताशी एकरूप होणे म्हणजेच जीव - शिव ऐक्य घडणे.

**शरण आलों नारायणा ।**
**मज अंगीकारीं दीना ।।**

ज्यामुळे दीनदयाळ हे संबोधन खरे ठरते. ते हे खरे दीनत्व असे जगतगुरू तुकाराम महाराज म्हणतात.

# एक से दो भले...



विलास पंचभाई

शनिवारी अचानक नंदुरबारला जायचे ठरले. दारावर जायचे होते म्हणून.. आणि नंदुरबार हा माझा शिक्षणाचा श्रीगणेशा झालेला जिल्हा.. काही वर्षांचं बालपण येथेच गेले..जवळपास ६ वर्षे मी नंदुरबार येथे शिक्षणासाठी काढले. त्यामुळे लहानपणीचे बरेच मित्र येथे आहेत व त्यावेळच्या खुणादेखील मला कधी कधी आकर्षित करतात.. दंडपाणेश्वर मंदिर हुतात्मा स्मारक डी. आर. हायस्कूल परदेशीपुरा नंदुरबारचे बसस्टॅण्ड.. त्यामुळे नंदुरबारला जाणे माझ्यासाठी एक उत्सव असतो...

आणि मला शिकवणारे मॅडम यादेखील तिथे असल्यामुळे त्यांच्याशी दोन शब्द बोलून आलो की, अजूनच उत्साह निर्माण होतो. नंदुरबारमध्ये फोर व्हीलरने जाणे म्हणजे पाच-सहा तासांचा प्रवास. संध्याकाळ झाली म्हणजे मला गाडी चालवायला तशी अडचणच येते. डोळ्यावरती रिफ्लेक्शन होतं. मग अशा परिस्थितीमध्ये काय करायचं...?

मग केतकी गाडीचे सारथ्य करते आणि मी बिंदास होऊन जातो.... त्यामुळे मला आता कितीही लांबचा प्रवास असला तरी जाणे अवघड वाटत नाही. कारण आम्ही एक से दो भले सारथी असतोच. त्यामुळे प्रवास उशीर जरी झाला तरी शांत सावकाश आणि कुठलीही घाईगडबड न करता सुखरूप पोहोचतो.

जर फोर व्हीलर गाडी असेल, टू व्हीलर गाडी असेल तर नक्कीच आपल्या सहचरिणीला शिकवा म्हणजे अडीअडचणीला वेळप्रसंगी ती आपल्या गाडीचे सारथ्य करेल. आणि आपला ताण सहज निवळून जाईल.. आपल्याकडे जर पूर्वी गाडी असेल तर नक्कीच आपण आपल्या पत्नीला, मुलीला शिकवा. त्यामुळे होतं काय की, त्यांनाही कॉन्फिडन्स येतो आणि गाडी चालवण्याची हौसदेखील भागवली जाते आणि आजच्या या आधुनिक जमान्यामध्ये धकाधकीच्या जीवनामध्ये एक से दो असलेले कधीही चांगले जसे की, आपण म्हणतो की नोकरीवाले दांपत्य असले तर ते अगदी आनंदात, सुखात राहू शकतात तसेच या गोष्टीदेखील आहेत. आपल्या पत्नीला आपण प्रत्येक योजनेमध्ये सहभागी करून घ्या, ती नक्कीच तुमच्या सुखाचा विचार करेल. आनंदाचा विचार करेल आणि आपल्यामुळे तिलाही आनंद मिळेल की, आपण तिच्यावर विश्वास दाखवला म्हणून....! दारावर जाऊन झाल्यानंतर आम्ही तिथून निघताना जवळपास ४० ते ४५ किलोमीटरच्या अंतरात एकही पेट्रोलपंप नसल्यामुळे मनात धाकधूक होती की, आपल्याला पेट्रोल मिळेल की नाही. आमचा स्ट्रेस वाढत होता पण थोडं शांत डोक्याने गाडी हळूहळू चालवत होतो... मग कुसुंबा गाव आले आणि आमची गाडी तिथपर्यंत अगदी टोकावर पोचली आणि आम्ही पेट्रोल भरलं. मग जरा आमच्या जीवात उसंत मिळाली... स्ट्रेस अगदी निवळून गेला... आणि एकदा टाकी फुल झाली आणि मग आम्ही नाशिकच्या रस्त्याने सुसाट निघालो... मध्ये चहापाणी घेतला तेवढाच... त्यामुळे काय झालं केतकीचा देखील ड्रायव्हिंगसाठी हात साफ झाला आणि आम्ही नाशिकला सुखरूप येऊन पोहोचलो. म्हणजेच काय की तुमच्याकडे कितीही ताणतणाव असला तरी शांत डोक्याने विचार केला तर कुठलाही स्ट्रेस कायम राहत नाही व स्ट्रेस निर्माण झाला तरी एकमेकांना साथ दिली तर एक से दो भलेही म्हण सार्थ वाटते...!

## आयुष्यात यश मिळविण्यासाठी काही टिप्स



१ दररोज माणसाला अनेक प्रकाराचे लोक भेटतात. हे खूप महत्त्वाचे आहे की, आपण त्या लोकांशी कसा व्यवहार ठेवता. कोणत्याही प्रकाराचा विवाद आपल्या यशाच्या मार्गात अडथळा निर्माण आणू शकतो. अशा परिस्थितीत वाद करणे नेहमी टाळावे.

२ असं म्हटले जाते की, नवे विचार एका नव्या क्रांतीला जन्म देतात. अशा परिस्थितीत नवे विचार आणि नवीन योजना तयार करायला मागे पडू नये.

३ जेव्हा आपण कोणतेही कामे करतो तर त्यासाठी सर्वांचा सल्ला घेतो. पण ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे म्हणजे आपल्या मनाचे ऐकूनच निर्णय घ्यावे.

# डोळ्यांची अशी घ्या काळजी



**आजकाल लहान वयातच डोळ्यांची दृष्टी कमकुवत होते आणि डोळ्यांशी संबंधित समस्या निर्माण होणे हे अगदी सामान्य झाले आहे. यामागे काही दैनंदिन सवयी आहेत, ज्या डोळ्यांना नुकसान पोहोचवतात. या सवयी वेळेतच बदलल्या नाही तर डोळ्यांना कमकुवत बनवतील.**

डोळे निरोगी ठेवण्यासाठी, काही दिवसांनी डोळ्यांची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. तुम्ही तुमच्या नियमित आरोग्य तपासणीमध्ये हे समाविष्ट करू शकता. यामुळे डोळ्यांची कोणतीही समस्या आधीच ओळखण्यास मदत होते आणि तुम्ही गंभीर आजार टाळू शकता. सध्या तरी, कोणत्या सवयी तुमच्या डोळ्यांना नुकसान पोहोचवू शकतात आणि त्या कशा सुधारायच्या ते जाणून घेऊया.

**स्क्रीन टाइम सवयी सुधारणे**

आजकाल प्रत्येक मुलेही तासन्‌तास मोबाइल फोन वापरत असतात, ज्यामुळे संपूर्ण शरीराचे नुकसान होते आणि त्याचा डोळ्यांवर खूप वाईट परिणाम होतो. तुम्ही तुमचा स्क्रीन टाइम कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि जर तुमच्या कामामुळे तुम्हाला लॅपटॉपवर तासन्‌तास बसावे लागत असेल तर दर वीस मिनिटांनी वीस सेकंदांचा ब्रेक घ्या आणि तुमच्यापासून काही अंतरावर असलेल्या एखाद्या गोष्टीकडे काळजीपूर्वक पहा आणि डोळे मिचकावा. तसेच डोळ्यांना आराम मिळावा यासाठी तुमचे तळवे डोळ्यांवर ठेवा.

**चष्मा न घालता बाहेर जाणे**

सूर्याचे अल्ट्राव्हायोलेट किरण केवळ त्वचेलाच नव्हे तर डोळ्यांनाही नुकसान पोहोचवतात. बहुतेक लोक चष्म्याशिवाय कडक सूर्यप्रकाशात बाहेर पडतात, ज्यामुळे तुमच्या डोळ्यांवर वाईट परिणाम होतो. जेव्हाही तुम्ही बाहेर जाता तेव्हा सनग्लासेस घाला किंवा छत्री सोबत ठेवा जेणेकरून तुमचे डोळे थेट सूर्याच्या संपर्कात येणार नाही.

**शरीराला योग्यरीत्या हायड्रेट न ठेवणे**

शरीराला हायड्रेट न ठेवल्याने संपूर्ण शरीराचे नुकसान होते आणि डोळ्यांमध्ये कोरडेपणा येतो. जर तुम्हाला कमी पाणी पिण्याची सवय असेल तर तुम्ही ती ताबडतोब सुधारली पाहिजे. जर तुम्ही जास्त पाणी पिऊ शकत नसाल तर ताक, लिंबू पाणी, उसाचा रस, सत्तू सरबत, सफरचंदाचे सरबत, असे आरोग्यदायी पेये प्या.

**संतुलित आहार न घेणे देखील हानिकारक**

लोक केवळ अनहेल्दी गोष्टी खातच नाहीत तर ते त्यांच्या दैनंदिन आहारात पुरेसे पोषण देखील समाविष्ट करत नाहीत, ज्यामुळे शरीराचे दुहेरी नुकसान होते. डोळ्यांना झिंक, व्हिटॅमिन ए, ल्युटीन, झेक्सॅन्थिन, ओमेगा ६ फॅटी सिड, कॉपर यांसारख्या पोषक तत्त्वांची आवश्यकता असते आणि जर तुम्ही हे सर्व घटक समृद्ध असलेले पदार्थ खाल्ले नाहीत तर डोळ्यांना त्रास होतो. म्हणून गाजर, मासे, अंडी, अक्रोड, बदाम, संत्री, द्राक्ष, ब्लूबेरी, पपई यांसारखे पदार्थ आहारात संतुलित पद्धतीने समाविष्ट करावेत.

**रात्री उशिरापर्यंत जागे राहणे**

आधुनिक जीवनशैली अशी आहे की, लोक अनेकदा रात्री उशिरापर्यंत कोणतेही काम न करता जागे राहतात, ज्यामुळे डोळ्यांवर वाईट परिणाम होतो. याशिवाय तुम्ही अनेक गंभीर आजारांना बळी पडू शकता. म्हणून रात्री किमान १० वाजेपर्यंत झोपायला जावे आणि ७-८ तासांची चांगली झोप घ्यावी.



## वारंवार फ्रीज उघडल्याने वीजबिल वाढतं का?

जवळजवळ सर्व घरांमध्ये विद्युत उपकरणं वापरली जातात. ज्यामुळे जीवन सोपं झालं आहे. परंतु त्यामुळे खर्चही वाढले आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. म्हणून फ्रीजचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. अशात फ्रीज उघडल्याने वारंवार बिल वाढतं.

१ जेव्हा तुम्हाला गरज असेल तेव्हा पाणी किंवा अन्नपदार्थ बाहेर काढण्यासाठी वारंवार फ्रीज उघडावा लागतो. पण वारंवार फ्रीज उघडल्याने विजेचा वापर वाढतो आणि तुमचे वीजबिल मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असते.

२ फ्रीज वारंवार उघडल्याने विजेचा वापर वाढतो आणि कंप्रेसरला जास्त काम करावं लागतं, ज्यामुळे कंप्रेसरचे आयुष्य कमी होऊ शकतं. याव्यतिरिक्त, फ्रीज सतत उघडल्याने आतील तापमान वारंवार बदलते. ज्यामुळे अन्न लवकर खराब होऊ शकतं.

३ जेव्हा तुम्ही रेफ्रिजरेटर उघडता तेव्हा गरम हवा आत जाते आणि रेफ्रिजरेटरला थंड होण्यासाठी जास्त ऊर्जा लागते. त्यामुळे जास्त वीज लागते आणि तुमचं बिलही वाढतं.

४ तज्ज्ञांच्या मते, जर फ्रीज वारंवार चालू आणि बंद केला तर कंप्रेसर देखील वारंवार चालू आणि बंद होतो. त्यामुळे त्याचं आयुष्य नक्कीच कमी होऊ शकतं.

# फॅशन म्हणजे फॉलो करणं नाही, फील करणं असतं!

ज्योती हांडगे
फॅशन डिझाइनर पुणे

ती जीन्स ट्रेंडमध्ये आहे, ती ड्रेस तिच्यासारखीच घालतेस आणि तो हायलाइटर पण सेमच मग तुला स्वतःसारखं काय वाटतं गं?

हा प्रश्न एकदा तुझ्या मनातही आला असेल, नाही? ट्रेंड्सचे नुसते फॉलोअर्स होणं हे म्हणजे फॅशन नाही - ती तर तुझ्या आतून येणारी, तुला शोभणारी आणि तुझ्या हसण्यासारखी नैसर्गिक गोष्ट असते!

**तुझा मूड = तुझा लूक**

फॅशन ही तुझ्या मूडची साऊंडट्रॅक असते. कधी तु रेट्रो फिलमध्ये असतेस, कधी सिंपल आणि क्लासिक, तर कधी बोल्ड आणि बिंदास! फील केलं तरच लूक उठून दिसतो. उगीच एखाद्या अभिनेत्रीने घातलं म्हणून आपणही घालायचं? नाही ना. ती दिसते तशी कारण ती तसं फील करते तसंच तुही.

**फॉलो नाही, फुलफिल कर**

ट्रेंड म्हणजे दिशा दाखवणारा सिग्नल. पण ड्रायव्हिंग तू करतेस. ट्रेंड म्हणजे नियम नाहीत, फक्त प्रेरणा असतात. फॅशनमध्ये ङ्गकॉपी-पेस्टफ ऐवजी 'कट-कस्टमाइज' हीच खास गोष्ट असते! तुझ्या अंगकाठीला, स्किनटोनला आणि ॲटीट्यूडला शोभणारं तुलाच माहिती असतं!

**तेच कपडे, पण तुझ्या स्टाइलनं**

एकच टी-शर्ट, पण तू घातलास की तो वेगळाच का वाटतो? कारण तू त्यात तुझं फील मिसळतेस. ते हसणं, चालण्याची स्टाईल, केस मागं घालण्याची अदा - या गोष्टी कुठल्याही ब्रँडमध्ये मिळत नाहीत!

तिचं तेच स्कार्फ तुझ्या गळ्यात येतं आणि नवीन वळण घेऊन स्टाइल स्टेटमेंट बनतं. कारण काय? कारण तू फील करतेस, फॉलो करत नाहीस!

**फॅशन हे व्यक्तिमत्त्वाचं एक्स्टेंशन असतं**

जेव्हा तू म्हणतेस हे माझ्यासाठी नाही, तेव्हा तू फॅशनची परिभाषा स्वतः ठरवतेस. पर्पल लिपस्टिक, धोती स्टाइल पॅन्ट्स, कुर्त्यावर डेनिम - जे काही तुला फील होतं, ते तुझं फॅशन आहे.

तू जेव्हा स्टाइलमध्ये व्यक्त होतेस, तेव्हा शब्द न वापरताच स्वतः बद्दल खूप काही सांगतेस.

ल ा े क काहीतरी म्हणतील - ओव्हरड्रेसिंग, अंडरड्रेसिंग, फार डेरिंग पण तुला काय वाटतं हेच खरं! फॅशन म्हणजे आत्मविश्वास - एकदा तुझा नजर भिडली ना, मग कुठलाही ड्रेस तुझ्या आत्मविश्वासाच्या पुढे फिकाच वाटतो!

फॅशनमध्ये फीलिंग असणं हेच तिचं सौंदर्य

कधी साडी नेसताना आईची आठवण आली असेल,

कधी जुना स्वेटर घालताना शाळेची आठवण झाली असेल,

तर कधी ती बांगडी घालताना त्याने दिलेलं गिफ्ट आठवलं असेल

हे असतं फॅशनचं फीलिंग.

कोणत्याही प्राईस टॅगपेक्षा, भावनांचा टच महत्त्वाचा असतो.

## फेस्टिव्ह फॅशन

आज काय फील करतेयस? तेच घाल!

जर आज तु थोडी शांत आहेस, तर न्यूट्रल कलर्स.

जर बिनधास्त आहेस तर ब्राईट आणि बोल्ड!

जर लाजरी आहेस, तर सटल ब्लश आणि फ्रेश लूक.

जर हिरोईन मोड ऑन आहे, तर रेड लिप्स आणि टॉप लेस किंवा नॉट असलेला!

तू काय फील करतेयस, त्यावर तुझा लूक ठरतो. आणि त्याच लूकवर तुझा दिवस रंगतो!

